

पुणे महापालिकेच्या 'रेटेबल व्हॅल्यू' वाढीचा पर्दाफाश P३

• पुणे, मंगळवार, १ जुलै २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 213 • वर्ष ४ थे, अंक २१३ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



१२ अल्काराझचे ध्येय जेतेपदाच्या हॅट्ट्रिकचे



# विरोधी पक्षनेताच नाही

## पावसाळी अधिवेशनातही विरोधकांना नेताच नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याच्या विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु झाले आहे. आजपासून विधानसभेमध्ये राजकीय खडाजंगी होताना दिसणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला हिंदी भाषेचे दोन्ही शासन आदेश महायुती सरकारने रद्द केले आहेत. यामुळे राजकीय घडामोडींना वेग आला आहे. यामुळे यंदाचे अधिवेशन हे गाजणार आहे. दरम्यान, यंदाचे पावसाळी अधिवेशन देखील विरोधी पक्षनेत्या शिवाय जाणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

मागील सात महिन्यांपूर्वी राज्यामध्ये विधानसभा निवडणूक पार पडली. यामध्ये महायुतीला भरघोस यश मिळाले तर महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. महाविकास आघाडीमधील कोणत्याच घटकपक्षाला विरोधी पक्षनेते पदावर दावा करता येईल असे बहुमत मिळालेले नाही.



### तालिका सभापतीपदी डॉ. प्रज्ञा सातव

• राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सभागृहाच्या कामकाजा दरम्यान विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या उपाध्यक्षा आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव यांची विधान परिषदेच्या तालिका सभापतीपदी निवड जाहीर केली. महाराष्ट्र विधीमंडळच्या पावसाळी अधिवेशनास आजपासून सुरुवात झाली असून, अधिवेशनासाठी विधान परिषदेच्या तालिक सभापती आ.डॉ. सातव यांची निवड जाहीर करण्यात आली. त्यांनी आपल्या आजवरच्या कार्यकाळात जिल्ह्यातील व राज्यातील जनसामान्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर सभागृहात आवाज उठवून सरकारचे लक्ष वेधले होते. तसेच अनेक प्रश्न मार्गीही लावले होते. त्यांनी आजपर्यंत सभागृहात केलेल्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल विविध पुरस्काराने त्यांना गौरविण्यातही आले होते. या निवडीबद्दल सभागृहाच्या सदस्यांनी निवडीनंतर आ. सातव यांचे अभिनंदन केले.

विधानसभेतील २८८ जागांपैकी १० टक्के जागा या विरोधी पक्षातील आहे.

विरोधातील कोणत्याही पक्षातील २९ जागा असल्यास विरोधी पक्षनेते पदावर दावा करता येतो. मात्र ठाकरे गट, शरद पवार गट आणि कॉंग्रेसकडे संख्याबळ नाही. यामुळे विधानसभेतील विरोधी पक्षनेते पदाचं घोंगड अजूनही भिजत राहिले आहे.

राज्यामध्ये आता पावसाळी अधिवेशन सुरु झाले तरी देखील विरोधी पक्षाला विरोधी पक्षनेता मिळालेला नाही. महायुती सरकार स्थापन झाल्यापासून तिसरे अधिवेशन सुरु झाले आहे. यापूर्वी हिवाळी अधिवेशन आणि अर्थसंकल्पीय अधिवेशन पार पडले. मात्र त्यावेळी देखील विरोधी पक्षनेता नसताना अधिवेशन पार पडले. यंदा देखील पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली असली तरी विरोधी पक्षनेता हे पद रिक्त » पान ७ वर

## संत सोपानकाका महाराज पालखी सोहळा

# पिंपळी येथे मेंढ्यांचे रिंगण उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** पिंपळी येथे दरवर्षी संत सोपानकाका महाराज पालखी सोहळ्याचे आगमन मारुती मंदिर या ठिकाणी होत असते. पिंपळीमध्ये बाळूमामा उत्सवानंतर अन्य कोणताही धार्मिक कार्यक्रम होत नसल्याने या सोहळ्यास अनन्यसाधारण असे महत्व पिंपळी येथील नागरिकांच्या दृष्टीने आहे.

पिंपळी गावात सोहळ्याचे आगमन होताच पालखी बैलजोडी रथाचे आश्वाचे आणि चोफदार महाराज यांचे स्वागत पिंपळी लिमटेक गावच्या सरपंच स्वाती अशोकराव ढवाण व मा.सरपंच मंगल हरिभाऊ केसकर आणि मा.उपसरपंच अश्विनी सुनिल बनसोडे यांच्या हस्ते औक्षण करून करण्यात आले. त्यानंतर काही अंतरावरती मेंढ्यांचे भव्य गोल रिंगण साकारण्यात आले हे मेंढ्यांचे रिंगण अलोबनीय डोळ्यांचे पारणे फेडणारे असे होते.



पालखी रथास मेंढ्यांचे रिंगण गावातील मेंढपाळ शेतकरी आप्पा केसकर, रमेश केसकर अर्जुन केसकर,यशवंत केसकर, तानाजी केसकर,कुंडलिक केसकर,आबासो केसकर, जयवंत केसकर आदी मेंढपाळांच्या मेंढ्यांनी गोल रिंगण करून स्वागत करण्यात आले. पालखी सोहळ्यास वारकरी संप्रदायाच्या सूचनेनुसार पिठलं भाकरी, वांगे मसाला, भात लोणचे या मेनूचे जेवण दिले जाते त्याचा आस्वाद घेऊन पुढे पालखी सोहळा पंढरपूरकडे काटेवाडी बारामती इंदापूर रस्त्याने मार्गस्थ झाला.

पालखी सोहळा पिंपळी येथील मारुती मंदिरात विसावल्यानंतर गावातील संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते.पालखी सोहळ्यास ग्रामस्थांनी शाश्रू नयनांनी निरोप दिला. पालखी सोहळा प्रमुखांचे आभार संचालक संतोषराव ढवाण पाटील यांनी मानले.

# महाराष्ट्रात भाजपला नवा प्रदेशाध्यक्ष

## रवींद्र चव्हाण यांच्या नावावर होणार आज शिक्कामोर्तब

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्षाला (भाजप) लवकरच नवा प्रदेशाध्यक्ष मिळणार आहे. माजी मंत्री आणि डोंबिवलीचे चार वेळा आमदार रवींद्र चव्हाण यांनी आज प्रदेशाध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्यातील अन्य प्रमुख नेते उपस्थित होते. उद्या (१ जुलै २०२५) संध्याकाळी चव्हाण यांच्या नावाची अधिकृत घोषणा होणार असल्याचे भाजपने जाहीर केले आहे. ही निवड आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चव्हाण यांच्या निवडीचे समर्थन करताना त्यांच्या राजकीय प्रवासाचा उल्लेख केला. "रवींद्र चव्हाण यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीला युवा मोर्चाचा कार्यकर्ता म्हणून सुरुवात केली. त्यानंतर ते नगरसेवक, आमदार आणि मंत्री झाले. त्यांनी नेहमीच पक्षासाठी प्रामाणिकपणे काम केले आहे," असे फडणवीस यांनी सांगितले. चव्हाण यांनी २००९ पासून डोंबिवली मतदारसंघातून सलग चार वेळा विधानसभा निवडणूक जिंकली आहे. याशिवाय, त्यांनी

### राजकीय समीकरणे बदलणार

• आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असताना, भाजपने रवींद्र चव्हाण यांच्यासारख्या मराठा समाजातील प्रभावी नेत्याला पुढे आणून पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न केला आहे. चव्हाण यांच्या नियुक्तीमुळे मराठा समाजाला एक सकारात्मक संदेश जाईल, अशी अपेक्षा पक्षाला आहे, विशेषतः मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून निर्माण झालेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर. रवींद्र चव्हाण यांच्या नियुक्तीमुळे भाजपला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत, विशेषतः मुंबई महानगरपालिका आणि अन्य महत्त्वाच्या स्थानिक संस्थांमध्ये आपली ताकद वाढवण्याची संधी आहे. चव्हाण यांनी यापूर्वी पक्षाच्या 'संघटन पर्व' मोहिमेत १.५ कोटी नवीन सदस्य जोडण्याचे यश मिळवले आहे.



महायुती सरकारमध्ये सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाची जबाबदारी सांभाळली आहे. आता त्यांच्यासमोर पक्षाची संघटना अधिक मजबूत करणे आणि २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत 'शत-प्रतिशत भाजप'चे उद्दिष्ट साध्य करण्याचे आव्हान आहे. या नियुक्तीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या घडामोडींना गती मिळणार असून, » पान ७ वर

## मुख्य सचिवपदी राजेशकुमार मीना यांची नियुक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राजेशकुमार मीना हे १९८८ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. पण राजेशकुमार यांना केवळ दोन महिन्यांचा कार्यकाळ मिळण्याची शक्यता आहे. याचे कारण म्हणजे ऑगस्ट २०२५ मध्ये ते निवृत्त होत आहेत. महाराष्ट्राला नवे मुख्य सचिवपदी आयएएस अधिकारी राजेशकुमार मीना यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. आज (३० जून) सायंकाळी चार वाजता ते आपला पदभार स्वीकारणार आहेत. मुख्य सचिव हे राज्याती सर्वोच्च आयएएस पद असून मुख्य सचिव मुख्यमंर्त्याचे मुख्य सल्लागार म्हणून काम करतात.

राज्याच्या विद्यमान मुख्य सचिव सुजाता सैनिक निवृत्त होत आहेत. सैनिक यांच्या निवृत्तीनंतर मुख्य सचिवपदाची सुत्रे राजेशकुमार मीना यांच्याकडे सुपूर्द » पान ७ वर

# स्कूल बसचालकांचा उद्यापासून बेमुदत बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील शाळकरी मुलांच्या सुरक्षित प्रवासासाठी कार्यरत असलेल्या शाळा बस चालकांनी २ जुलैपासून अनिश्चितकालीन संपाचा इशारा दिला आहे. शासनाकडून शालेय वाहतुकीच्या समस्यांकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत शाळा बस ऑनर्स असोसिएशनने हा निर्णय घेतला आहे.

शाळा बस ऑनर्स असोसिएशनने स्पष्ट केले की, गेल्या काही वर्षांपासून या व्यवसायात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. परवाने, विमा, इंधन दर, आरटीओ नियम, वाहतूक पोलिसांचे दंड, तसेच इतर शासकीय धोरणांमुळे या व्यवसायावर आर्थिक ताण वाढला आहे. संघटनेने वेळोवेळी शासनाच्या संबंधित विभागांकडे निवेदनाद्वारे मागण्या मांडल्या होत्या, मात्र त्याकडे दुर्लक्षच करण्यात आले, असा आरोप संघटनेने केला आहे.




"शाळा बस सेवा ही सामाजिक बांधिलकी समजून आम्ही अनेक अडचणींचा सामना करत सुरू ठेवली. मात्र, आता परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास २ जुलैपासून संप अनिवार्य ठरेल," अशी माहिती असोसिएशनच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी दिली.

या संपामुळे राज्यभरात लाखो विद्यार्थी शाळांपर्यंत पोहोचण्यासाठी वापरत असलेल्या बस सेवेला फटका बसेल. परिणामी, पालकांना पर्यायी वाहतुकीची व्यवस्था करावी लागणार आहे. अनेक कुटुंबे » पान ७ वर

## सिंहगड रस्त्यावर वाहनांची तोडफोड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड रस्त्यावर शनिवारी पहाटे तीनच्या सुमारास अज्ञात टोळक्याने गाड्यांच्या काचा फोडून दहशत माजविण्याचा प्रयत्न केला. यात नागरिकांचे नुकसान झाले आहे. याबाबत माहिती अशी की, सिंहगड रस्ता परिसरातील कालवा रस्ता, वडगाव परिसरातील रस्ता, ई-लर्निंग स्कूलजवळील रस्ता, माणिकबाग आणि मुख्य सिंहगड रस्ता या भागात असलेल्या चारचाकी गाड्यांच्या काचा फोडल्या. पाच ते सहा जणांच्या टोळक्याने हे काम केले असल्याचे प्रथमदर्शनी पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले.सतरा गाड्यांच्या काचा फोडल्या आहेत. अज्ञातांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून, तीन ते चार जणांना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप दाइंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## राज ठाकरे यांची घोषणा, जनतेचे मानले आभार

# ५ जुलै रोजी विजयी मेळावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** हिंदी सक्तीबाबतचे दोन जीआर रद्द करण्यासाठी सरकारला भाग पाडल्याबद्दल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील तमाम जनतेचे आभार मानले. पण मोर्चा रद्द झाला असला तरी ५ जुलै रोजी विजयी मेळावा होईल. त्यासाठी ठिकाण एकत्र मिळवून ठरवू. पण याला पक्षीय लेबल लावले जाणार नाही, असे राज ठाकरे यांनी सोमवारी (दि. ३० जून) स्पष्ट केले.

सर्व बाजूने तो रेटा आला. गरज नसताना विषय आले. त्याबाबत मराठी जनांचे, साहित्यिक, मोजके कलावंत, मराठी पत्रकार आणि



संपादकांचे आभार. हिंदीचा विषय श्रेयवादाचा नाही. सरकार पुन्हा या वाटेला जाणार नाही, अशी अपेक्षा आहे. मराठीच्या विषयात कोणतीही तडजोड होणार नाही. महाराष्ट्राचे लचके तोडण्याचे काम सुरु आहे. हे थांबयला पाहिजे, असा इशारा त्यांनी राज्य सरकारला दिला.

पत्र लिहिली. वातावरण तापले. सर्व राजकीय » पान ७ वर

### 'हे तर स्लो पॉयझन...'

• दादा भुसे आल्यावर म्हणाले की ऐकून घ्या. ऐकून घेणार पण ऐकणार नाही. या विषयात तडजोड नाही. हे स्लो पॉयझन आहे. त्यांनी समिती आता नेमावी आणि हे परत होणार नाही हे त्यांनी लक्षात घ्यावे. आमच्या अभ्यासात ५ वी नंतर हिंदी आणि संस्कृत असले विषय होते. आम्ही शिकलो. हिंदी ही राष्ट्रभाषा नाही तर प्रांतभाषा आहे. उत्तर भारतातील अनेक लोक जर महाराष्ट्रात नोकरीसाठी येत असतील तर तिथे त्यांनी मराठी शिकवायला हवे. १५० वर्षे जुनी भाषा ३ हजार वर्षे जुन्या भाषेला मारत असेल तर असे होणार नाही, असे त्यांनी सांगितले.

## शक्ती कायद्यावरून देशमुखांचा हल्लाबोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** "महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने २०२० मध्ये शक्ती कायदा तयार केला होता. त्यात गंभीर गुन्ह्यांसाठी फाशीची शिक्षा ठेवली होती. मात्र, सरकार बदलल्यानंतर या कायद्याची अंमलबजावणी प्रलंबित राहिली आहे. केंद्र सरकारने मागणी केल्यानंतरही एक वर्ष राज्य सरकारने समितीच गठीत केली नाही, यावरून महिला आणि मुलींच्या सुरक्षेबाबत सरकार किती गंभीर आहे, हे स्पष्ट होते," अशी घणाघाती टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केली आहे.

नागपूरच्या रविभवन येथे आयोजित पत्रकार » पान ७ वर

# मुंबईत काँग्रेसचा स्वबळाचा नारा?

## ठाकरेंच्या संभाव्य युतीने बदलली समीकरणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई:** आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्ष एक मोठा आणि धक्कादायक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. महाविकास आघाडीचा घटक म्हणून लढण्याऐवजी स्वबळावर निवडणूक लढवण्यासाठी पक्षाने चाचपणी सुरू केली आहे. राज आणि उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य युतीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने ही नवी रणनीती आखली असून, स्वतंत्र लढल्यास पक्षाला अधिक फायदा होईल, असा विश्वास मुंबईतील काँग्रेस नेत्यांना वाटत आहे.

काँग्रेसच्या मुंबईतील पदाधिकाऱ्यांच्या मते, महाविकास आघाडीत निवडणूक लढल्यास जागावाटपात पक्षाला मोठा फटका बसू शकतो. मुंबईतील उत्तर भारतीय, दलित आणि मुस्लीम मतदार हा काँग्रेसचा पारंपरिक मतदार मानला जातो. आघाडी झाल्यास या भागातील जागा मित्रपक्षांना सोडाव्या लागतील, ज्यामुळे पक्षाचे मोठे नुकसान होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

दुसरीकडे, जर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले, तर राज यांच्या भूमिकेवर नाराज असलेला मतदार वर्ग महाविकास आघाडीला मतदान करणार नाही, असे काँग्रेसचे गणित आहे. अशा परिस्थितीत काँग्रेसने स्वतंत्र निवडणूक लढल्यास हा नाराज मतदार आपल्याकडे वळवता येईल, असा पक्षाचा अंदाज आहे. » पान ७ वर

# रोहित पवारांना जामखेड बाजार समितीत झटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर :** कर्जत-जामखेडच्या राजकीय रणभूमीवर विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांना सातत्याने धक्के देण्याचा सपाटा लावला आहे. यावेळी त्यांनी जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीवर लक्ष केंद्रित करत पवारांचे समर्थक आणि बाजार समितीचे उपसभापती कैलास वराट यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल करून सहावा धक्का दिला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल झालेल्या अविश्वास प्रस्तावात बाजार समितीचे सभापती शरद कार्ले



यांच्यासह १२ सदस्यांनी कैलास वराट यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. यामध्ये वराट यांनी कायद्याचे उल्लंघन केल्याचा दावा करण्यात आला आहे.

त्यांच्यावर मनमानी कारभार, बाजार समितीच्या उपविधीप्रमाणे कामकाज न करणे, » पान ७ वर

# जुलै अखेर "विश्रामबागवाड्याचा दर्शनी भाग" खुला होणार


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्राचीन काळातील अत्यन्त नाजूक कलाकुसर असलेली लाकडी महिरप व सज्जा त्याच स्वरूपात पुन्हा उभारण्याचे काम अवघड होते व त्यावर मेहनत घेतल्यामुळे त्याचे मूळ स्वरूपात संवर्धन करणे शक्य झाले व म्हणूनच ह्या कामाला वाजवीपेक्षा जास्त वेळ लागला असेही सुनील मोहिते यांनी स्पष्ट केले. ह्या वाड्यातील दालन क्रमांक एक व दोन चे काम आधीच पूर्ण झाले आहे व ते आम्ही पर्यटकांसाठी खुले देखील केलं आहे. मात्र मुख्य दर्शनी भाग आता जुलै अखेर सुरु केला जाईल असे सुनील मोहिते यांनी स्पष्ट केले आहे.



### विश्रामबाग वाड्याची वैशिष्टे

• विश्रामबागवाडा हे पुण्याचे वैभव असून १७५० साली बाजीराव पेशवे ( दुसरे ) यांनी हरी पंत भाऊ फडके यांच्याकडुन विकत घेतली
• १८१० साली येथे भव्य विश्रामबागवाडा बांधला.
• १८२० मध्ये पेशव्यांनी वाडा खाली केला व तेथे पेशव्यांच्या दक्षिणा फंडातून वेद शाळा झाली
• पुढे येथे डेक्कन कॉलेज सुरु करण्यात आले.
• १८८० मध्ये वाड्याचा पूर्वेकडचा भाग जळाला.
• १९३० ते १९६० पुणे महानगरपालिका विश्रामबाग वाड्यात हलविल्याचे उल्लेख सापडतात.
• साधारण १९९० मध्ये वाड्याचे संवर्धन करून हा ऐतिहासिक वारसा जपण्यात आला.



> "सध्या येथे एक पोस्ट ऑफिस व पुणे मनपा परिवहन महामंडळाचे पास केंद्र सुरु असून संपूर्ण वाडा हा अत्यन्त प्रेक्षणीय असा आहे. आता मनपा प्रशासन आपला शब्द पूर्ण करून जुलै अखेर वाडा नागरिकांसाठी व पर्यटकांसाठी खुला करतील. तसेच हा "वाडा" अन्य वास्तूंप्रमाणे मनपा नेच चालवावा, राखावा किंवा पूर्वीप्रमाणे एखाद्या संस्थेस चालविण्यासाठी द्यावा याचा त्वरित निर्णय करावा व नागरिकांना हा अमूल्य ठेवा पाहण्यासाठी उपलब्ध करून द्यावा."
>
> **— संदीप खर्डेकर**

विश्रामबागवाड्याचा दर्शनी भाग हा ऊन वारा पावसामुळे क्षतीग्रस्त झाला होता, त्याला मूळ स्वरूपात आणण्यासाठी आम्ही प्रयत्नरत आहोत » पान ७ वर



## रोटरी क्लब प्राईडच्या अध्यक्षपदी कासोदेकर

**पुणे :** रोटरी क्लब प्राईडच्या अध्यक्षपदी अनिल कासोदेकर यांची निवड करण्यात आली.मावळत्या अध्यक्ष राधा गोखले यांच्याकडून त्यांनी सूत्रे स्विकारली. सचिवपदी संपदा कुंटे यांची निवड करण्यात आली. पीवायसी जिमखाना येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी नियोजित प्रांतपाल संतोष मराठे,सहाय्यक प्रांतपाल भूषण कुलकर्णी यांच्या बरोबरच विविध रोटरी पदाधिकारी,सदस्य व कुटुंबीय उपस्थित होते.या प्रसंगी बोलतांना नवनियुक्त अध्यक्ष अनिल कासोदेकर यांनी आगामी काळात रक्त संकलन व्हॅन,कॅन्सर डिटेक्षण व्हॅन असे मोठे प्रकल्प,शैक्षणिक प्रकल्प,सोलर पॉवर आदी प्रकल्प करणार असल्याचे सांगितले.

## वैष्णव पुरस्कार पं. रघुनाथ खंडाळकर यांना जाहीर

**पुणे :** ह. भ .प विश्वनाथ महाराज इंगळे यांच्या स्मृती प्रित्यर्थ जे व्ही इंगळे व त्यांच्या पत्नी मेघा इंगळे



यांच्या वतीने दरवर्षी प्रदान करण्यात येणारा 'वैष्णव पुरस्कार' यावर्षी अभिनव गंधर्व म्हणून ओळख असलेले गायक पं. रघुनाथ खंडाळकर यांना प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती इंगळे कुटुंबीयांनी कळविली आहे. रुपये २१ हजार रोख व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून येत्या ६ जुलै रोजी एरंडवणे येथील डॉ कलमाडी श्यामराव हायस्कूलच्या शकुंतला शेट्टी सभागृहात आयोजित करण्यात येणाऱ्या एका विशेष कार्यक्रमात सदर पुरस्कार खंडाळकर यांना प्रदान करण्यात येईल. याआधी पं. शौनक अभिषेकी, पं. आनंद भाटे, विदुषी देवकी पंडित, श्रीनिवास जोशी, पं. हेमंत पेंडसे, प्रसिद्ध कथक नर्तक गुरु डॉ नंदकिशोर कपोते आणि गायक, संगीतकार डॉ. भरत बलवल्ली यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

## हुंड्यासाठी विवाहितेच्या खूनाचा प्रयत्न

**पुणे :** हुंड्यासाठी पत्नीचा गळा दाबून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना वडगाव शेरी भागात घडली. याप्रकरणी पती, सासू, सासऱ्यांसह सहा जणांवर चंदननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत २४ वर्षीय पत्नीने चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पती प्रणिल निकुडे (वय ३२), सासरे उदय (वय ६०), सासू वैशाली (वय ५५), दीर प्रतीक (वय ३०, सर्व रा. वडगाव शेरी), चुलत दीर प्रमोद, चुलत सासरे माणिक (रा. कल्याणीनगर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

तक्रारदार तरुणीचा आरोपी प्रणिल याच्याशी ऑक्टोबर २०२३ मध्ये विवाह झाला होता. विवाहानंतर हुंड्यात काही वस्तू दिल्या नाहीत, त्यासाठी आई-वडिलांकडून पैसे घेऊन ये, असे पती प्रणिलने तिला सांगितले.

त्यानंतर पती, सासरे, सासू, दीर व चुलत सासरे यांनी तिला टोमणे मारून शारीरिक आणि मानसिक छळ सुरू केला. त्यानंतर २५ जूनला पती प्रणिलने तिला मारहाण केली. त्याने तिचा गळा दाबला, तसेच तिचा मोबाईल फोडला आणि पत्नीला फरफटत सदनिकेच्या गॅलरीत नेत तेथून ढकलून देण्याचा प्रयत्न केला.पोलिसांत तक्रार दिल्यास जिवे मारू, अशी धमकी सासरे उदय याने दिल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक स्वाती खेडकर या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

## तरुणाच्या खूनप्रकरणी दोघांना जन्मठेप

**पुणे :** अपघातात दुचाकीचे नुकसान झाल्याचा दावा करत दोन हजारांची मागणी करून युवकाला तळजाई परिसरात नेऊन त्याचा खून करणाऱ्या दोघांना न्यायालयाने जन्मठेपेसह सहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सत्र न्यायाधीश जे. जी. डोरले यांनी हा निकाल दिला.

सुमीत ऊर्फ सोन्या सुधीर काळे (वय २१, रा. ८६६ रविवार पेठ) व अक्षय ऊर्फ भीमा बाळू दिवटे (वय २२, रा. स. नं. ६५, तळजाई वसाहत, पद्मावती) अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत. १८ मार्च २०१७ ला सकाळी आठच्या सुमारास हा प्रकार घडला होता. रामअवतार बनवारीलाल जाटव (वय १९) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. मूळचा मध्य प्रदेशचा असलेला जाटव पुण्यात बांधकाम साइटवर फरशी बसविण्याचा काम करत होता. घटनेच्या दिवशी आरोपी त्यांच्या दुचाकीवरून मार्केट यार्ड येथे जात होते. यावेळी रामअवतार हा रस्त्यात आडवा आल्याने दोन्ही आरोपी रस्त्यावर खाली पडले. याबाबत त्यांनी रामअवतारकडे नुकसान भरपाईची मागणी केली. यादरम्यान आरोपींनी रामअवतार याला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून वनशिव वस्ती येथील मोकळ्या जागेत नेत त्याच्या नातेवाइकांशी संपर्क साधत रामअवतार याला सोडण्यासाठी दोन हजार रुपयांची मागणी केली. पैसे न मिळाल्याच्या कारणावरून त्यांनी संगनमत करत रामअवतार याचा दोरीने गळा आवळून व त्याच्या डोक्यात दगड घालून खून करत पळून गेले होते.

सरकार पक्षास न्यायालयीन कामकाजास हवालदार गणेश तेळकर यांनी मदत केली. दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागेल, असे निकालात नमूद केले आहे.

# अनोखी जनजागृती...!



पुणे आळंदी - पंढरपूर - कुर्डुवाडी ३५० किमी सायकलवारीतून विविध शाळा, कॉलेज, महाविद्यालयात संवाद साधत दि २९ जून ते १ जुलै दरम्यान होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एचएआरसी) चे अध्यक्ष डॉ पवन चांडक, कलाशिक्षक पांडुरंग पाटणकर , सेवानिवृत्त न्यायालयीन सेवानिवृत्त कर्मचारी राजेंद्र खापरे हे सायकलवर बॅक अप वाहन न घेता एकाकी प्रवास करणार आहेत.

## सायकलवारीतून वाचन संस्कृती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मोबाईलच्या अतिवापर मुळे लहान मुलांवर त्याचे दुष्परिणाम होत आहेत त्यामुळे मुले एकलकोंडी बनत असून कुटुंबातील संवाद हरवत चालला आहे. आजी आजोबा व नातवंडामध्ये गोष्टीतून होणारा संवाद व कौटुंबिक वाचन हरवत चालले आहे. घरा घरात होणाऱ्या कौटुंबिक वाचन ची जागा दुर्दैवाने मोबाईल व टीव्ही ने घेतली आहे. यासाठीच कौटुंबिक वाचन व वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी प्रसार व संवादाची गरज आहे. म्हणूनच पुणे - आळंदी - पंढरपूर - कुर्डुवाडी ३५० किमी सायकलवारीतून विविध शाळा, कॉलेज, महाविद्यालयात संवाद साधत दि २९ जून ते १ जुलै दरम्यान होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एचएआरसी) चे अध्यक्ष डॉ पवन चांडक, कलाशिक्षक पांडुरंग पाटणकर , सेवानिवृत्त कर्मचारी राजेंद्र खापरे हे सायकलवर बॅक अप वाहन न घेता एकाकी प्रवास करणार आहेत. सायकलवारीचा मार्ग : पुणे रेल्वे स्टेशन हुन २९ जून रोजी सकाळी सायकलिंग करत आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेऊन तुळापूर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधी चे दर्शन घेऊन लोणीकंद मार्गे उरली, यवत, चौफुला मार्गे पाटस कुरकुंभ मार्गे भिगवन येथील मुक्काम करतील.

# अनाहुत पाहुण्यांचे 'लॅन्डिंग'...!

## विमानतळाच्या धावपट्टीवर भटक्या कुत्र्यांचा वावर

विमानांचे लॅन्डिंग आणि टेकऑफ निर्विघ्नपणे व्हावे यासाठी विमानतळ प्राधीकरणाच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत, त्यातच लोहगाव विमानतळाची धावपट्टी लष्कराच्या हद्दीत असल्याने त्याबाबत लष्कराच्या वतीने विशेष दक्षता घेण्यात येत आहे. त्याशिवाय या परिसरातील बांधकामांवरही मोठ्या प्रमाणावर निर्बंध घालण्यात आले आहेत, हे वास्तव असतानाही या परिसरात अनाधिकृत बांधकामांमुळे प्राधीकरण आणि महापालिका प्रशासन त्रस्त झाले आहेत. त्यातूनच गेल्याच आठवड्यात या परिसरातील 'बफर झोन' मधील बांधकामांवर कारवाई करण्यात आली होती. या घटना ताज्या असतानाच आता थेट धावपट्टीवरच भटक्या कुत्र्यांचा वावर वाढू लागला आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भुवनेश्वरहून पुण्याकडे येणाऱ्या एअर इंडिया एक्सप्रेसच्या IX-1097 या विमानाच्या लँडिंगवेळी पुणे विमानतळावर मोठा अनुचित प्रकार घडला. विमान धावपट्टीवर उतरण्याच्या क्षणी, अवघ्या १०० ते १५० फूट उंचीवर असताना, वैमानिकाच्या नजरेस धावपट्टीवर कुत्रा पडला. तत्काळ दक्षता घेत वैमानिकाने लँडिंग थांबवले आणि विमान पुन्हा हवेत घेऊन गेले.

या प्रकारामुळे संभाव्य दुर्घटना टळली. धावपट्टीवरील कर्मचाऱ्यांनी कुत्र्याला हुसकावून लावल्यानंतर सुमारे एक तास उशिराने, संध्याकाळी ७.१२ वाजता विमान सुरक्षितपणे उतरले. या अचानक प्रकारामुळे प्रवाशांमध्ये काही काळ गोंधळाचे वातावरण होते.

या घटनेवर प्रवासी हितेंद्र कुरणे यांनी सांगितले, "विमान धावपट्टीवर उतरत असताना अचानक पुन्हा हवेत गेले. काही क्षण सगळे अचंबित झाले. नंतर वैमानिकाने उद्घोषणा करत सांगितले की, धावपट्टीवर कुत्रा आढळल्याने लँडिंग थांबवण्यात आले आहे."

पुणे विमानतळावर गेल्या काही महिन्यांपासून पक्षी, कुत्रे आणि बिबट्यांचा वावर वाढत चालल्याचे निरीक्षणात आले आहे. यामुळे विमानाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत आहे. विशेष म्हणजे, दोन महिन्यांपूर्वीही एका विमानाच्या लँडिंग गिअरमध्ये कुत्रा अडकल्याची घटना घडली होती. त्यावेळीही लँडिंग रद्द करण्यात आले होते.

प्रत्येक विमानतळावर पर्यावरणीय धोके टाळण्यासाठी 'विमानतळ पर्यावरण समिती' कार्यरत असते. ही समिती जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कार्य करते आणि ध्वनी प्रदूषण, प्राणी-पक्ष्यांच्या वावरासारख्या बाबींवर नियंत्रण ठेवण्याच्या उपाययोजना आखते. मात्र, पुणे विमानतळावर सतत होणाऱ्या घटनांमुळे या समितीच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेत वैमानिकाच्या सतर्कतेमुळे एक मोठा अपघात टळला असला तरी विमानतळ परिसरातील सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी अधोरेखित झाल्या आहेत. वारंवार होणाऱ्या अशा घटनांमुळे प्रवासी सुरक्षेबाबत चिंता वाढत असून, संबंधित यंत्रणांकडून ठोस उपाययोजना होणे अत्यंत गरजेचे आहे.

### सुचवलेले सुधार उपाय:

- कुत्रे व वन्य प्राणी प्रतिबंधासाठी अधिक सक्षम कुंपण व्यवस्था
- पक्ष्यांच्या वावरावर नियंत्रणासाठी ध्वनी व प्रकाश उपकरणे
- विमानतळ परिसरातील जैविक आकर्षण कमी करण्याचे धोरण
- नियमित गस्त व निगराणी यंत्रणा मजबूत करणे

# पुण्यातील २२ टेकड्यांना हायटेक सुरक्षा कवच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बोपदेव घाट परिसरात घडलेल्या धक्कादायक सामूहिक अत्याचाराच्या घटनेनंतर पुणे पोलिस आणि वन विभाग सतर्क झाले असून, शहरातील २२ महत्त्वाच्या टेकड्यांवर अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा बसवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची सुरुवात बोपदेव घाटातून पायलट प्रकल्पाच्या रूपात करण्यात आली आहे. पायलट प्रकल्पांतर्गत बोपदेव घाटात २५ हाय-रिझोल्यूशन आयपी सीसीटीव्ही कॅमेरे, फ्लडलाइट्स, सार्वजनिक सूचना देणारे आयपी स्पीकर्स आणि आपत्कालीन कॉल बॉक्स बसविण्यात आले आहेत. या सगळ्या प्रणाली नियंत्रण कक्षाशी थेट जोडल्या असून, संकटाच्या वेळी नागरिक त्वरित मदत मागवू शकतील. विशेषतः महिलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या पायलट प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री स्वतः करणार असल्याची माहिती पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. पुढील आठवड्यात यासंदर्भातील कार्यक्रम निश्चित होण्याची शक्यता असून, पोलीस आणि वन विभाग यांच्यात समन्वयाची प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकल्पामध्ये केवळ सुरक्षा व्यवस्थाच नव्हे, तर पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, दिशादर्शक फलक आदी मूलभूत सुविधांचा समावेशही करण्यात आला आहे. २४ तास कार्यरत राहणाऱ्या नियंत्रण कक्षातून प्रशिक्षित ऑपरेटर सर्व यंत्रणा नियंत्रित करतील. ही प्रणाली परस्परसंलग्न असणार असून, विविध घटकांमध्ये तत्काळ समन्वय साधता येणार आहे. बोपदेव घाटात ८.५ किमी लांब अंडरग्राउंड वीज आणि इंटरनेट फायबर लाइन टाकण्यात आली आहे. रात्रीच्या अंधारात कुणी लपून गुन्हा करू नये, यासाठी फ्लडलाइट्स बसवण्यात येत आहेत, आणि त्या देखील नियंत्रण कक्षातून ऑपरेट करता येणार आहेत. आपत्कालीन कॉल बॉक्समधून नागरिक एका बटणाद्वारे थेट मदतीसाठी संपर्क साधू शकतात.

### ७० कोटींचा निधी; २२ टेकड्यांचा समावेश

**● या प्रकल्पासाठी एकूण ७० कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. वेताळ टेकडी, पर्वती, चतुःश्रृंगी, तळजाई, लॉ कॉलेज टेकडी, सेनापती बापट रोड, पाषाण आणि बोपदेव घाट आदी २२ टेकड्यांचा त्यामध्ये समावेश आहे. या भागांमध्ये दररोज हजारो नागरिक फिरण्यासाठी, व्यायामासाठी, ट्रेकिंगसाठी येत असतात. याच भागांमध्ये पूर्वी अनेकदा छेडछाड, चोरी आणि बलात्कारासारख्या गंभीर घटना घडल्या आहेत.**

# कोणत्याही कंपनीसाठी स्थित्यंतराचा काळ कसोटीचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोणताही कर्मचारी तुमच्यासाठी नव्हे तर तुमच्या सोबत काम करू इच्छित असतो, कर्मचाऱ्यांची ही भावना लक्षात घेऊन 'माझी' कंपनी ते 'आपली' कंपनी हा प्रवास महत्त्वाचा असून कोणत्याही कंपनीसाठी स्थित्यंतराचा हा काळ कसोटीचा असतो, असे मत पर्सिस्टंट सिस्टम्सचे संस्थापक-संचालक डॉ. आनंद देशपांडे यांनी व्यक्त केले.

सेटको स्पेंडल्स इंडिया आणि साकेत प्रकाशनातर्फे प्रसिध्द उद्योजक राजेश मंडलिक लिखित 'ॲन इंजिनिअर्स जर्नी टू अन्त्रप्रनरशीप' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. आनंद देशपांडे यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ उद्योजक मनीष गुप्ता, लेखक आणि उद्योजक राजेश मंडलीक , साकेत प्रकाशनाच्या प्रतिमा भांड आणि डॉ. वैभवी मंडलिक उपस्थित होते.

यावेळी उद्योजक मधुरा कॉम्प्रेसर प्रा.लि. चे बी. एस. कदम, रॅपटेक इंजिनिअर्स प्रा. लि. चे कार्यकारी संचालक नितीन बोराडे आणि श्री मॅन्युफॅक्चरिंगच्या व्यवस्थापकीय संचालक मनिषा पाठक या तीन उद्योजकांचा विशेष सन्मान करण्यात आला.



पुणे सेटको स्पेंडल्स इंडिया आणि साकेत प्रकाशनातर्फे प्रसिध्द उद्योजक राजेश मंडलिक लिखित 'ॲन इंजिनिअर्स जर्नी टू अन्त्रप्रनरशीप' या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. आनंद देशपांडे. यावेळी (डावीकडून) डॉ. वैभवी मंडलिक, मनिष गुप्ता, देशपांडे आणि राजेश मंडलिक.

# गुरु म्हणजे अंत:करण जागृत करणारा शक्तीस्त्रोत




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गुरुचरित्र म्हणजे केवळ ग्रंथ नाही तर संपूर्ण जीवनाचे मार्गदर्शन आहे. गुरु म्हणजे फक्त ग्रंथ शिकविणारा नाही, तर अंत:करण जागृत करणारा एक शक्तीस्त्रोत आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, समर्थ रामदास स्वामींनी दाखविलेली गुरुभक्ती हेच गुरुपौर्णिमेचे सार आहे, असे मत श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदीच्या पहिल्या महिला विश्वस्त ॲड. डॉ. रोहिणी पवार यांनी व्यक्त केले.

श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे गुरुपौर्णिमा सप्ताहाचा शुभारंभ श्री दत्त मंदिर प्रांगणात श्री दत्त कला मंच या उत्सव मंडपात झाला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शिवराज कदम जहागिरदार, कार्यकारी विश्वस्त ॲड. रजनी उकरंडे, कोषाध्यक्ष युवराज गाडवे, उत्सव प्रमुख महेंद्र पिसाळ, विश्वस्त सुनिल रुकारी, राजेंद्र बलकवडे, अंजली काळकर आदी उपस्थित होते. उत्सवाचे यंदा १२८ वे वर्ष आहे.

बाल कल्याण संस्था पुणे च्या वतीने गंध फुलांचा गीतांचा हा दिव्यांग मुलांचा संगीतमय कार्यक्रम यावेळी सादर झाला. चैतन्य सिंदाळकर, साकेत देऊचके, सोनल कदम, श्लोक चावीर, श्रेयस जगदाळे, प्रकाश माळी, सिद्धी कुंजीर यांना संगीत शिक्षक दत्तात्रय भावे, वाद्य शिक्षक संजीव हेबाळे, गायन शिक्षक संकेत लोहकरे यांनी साथ दिली.

ॲड. डॉ. रोहिणी पवार म्हणाल्या, गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आपण एक संकल्प करुया. गुरुंच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवा, भक्ती आणि एकात्मितेचा संकल्प घेऊया. दरवर्षी लाखो भाविक पंढरपूरला चालत जातात, हेच विठ्ठलाच्या भक्तीसाठी गुरुसमर्पण आहे असेही त्यांनी सांगितले.

> धार्मिक स्थळी समाजाकडून आलेल्या निधीतून धर्मसेवेसोबतच वंचितांच्या विकासासाठी समर्पण भाव जागृत ठेवणे हे सर्व विश्वस्तांचे सामुहिक कर्तव्य असायला हवे. त्यानुसार ट्रस्टचे सामाजिक कार्य अविरतपणे सुरु आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त शुक्रवार, दि ११ जुलै २०२५ पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.
>
> **-ॲड. शिवराज कदम जहागिरदार;** अध्यक्ष; श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्ट

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांची 'जीवघेणी थट्टा'...!

## येरवड्याचे वसतीगृह रातोरात हलविले : नव्या ठिकाणी सुविधांची वाणवा; विद्यार्थी बैचैन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** येरवडा येथील समाज कल्याण विभागाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतिगृहाचे विश्रांतवाडी येथे अचानक स्थलांतर करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. 'हा निर्णय अन्यायकारक असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी थट्टा करणारा आहे," अशा तीव्र प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

नवीन वसतिगृहात या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरच स्थलांतर केले जाईल, असे काही महिन्यांपूर्वी सांगण्यात आले होते. मात्र, सद्यःस्थितीत विश्रांतवाडी येथील वसतिगृहात कोणत्याही प्रकारची सोय नाही.

याविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता, नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर त्यांनी सांगितले की, "या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचा प्रवासाचा वेळ आणि खर्च वाढणार आहे. बुधवारी (ता. २५) रात्री झालेल्या बैठकीनंतर विद्यार्थ्यांना कोणतेही स्पष्टीकरण न देता वसतिगृह रिकामे करावे लागेल, असे सांगण्यात आले. यासंदर्भात आम्ही वारंवार गृहप्रमुख आणि गृहपाल यांच्याशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी तक्रारींकडे दुर्लक्ष केले." यासंदर्भात समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

"येरवड्याच्या वसतिगृहात अभ्यासासाठी शांतता, सुविधा आणि वेळ मिळतो. आता ते विश्रांतवाडीला स्थलांतरित केलं तर प्रवासात वेळ जाईल. त्यामुळे हे स्थलांतर थांबवावे, ही विनंती.

**- एक विद्यार्थी**

"इथे अभ्यासासाठी शांत वातावरण, वाहतुकीची सोय आणि सुरक्षित परिसर आहे. चार दिवसांत स्थलांतराचा आदेश म्हणजे आमच्या शिक्षणावर आघात आहे.

**- एक विद्यार्थी**



"शासन अशा पध्दतीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या हक्कावर गदा आणत आहे; नियमानुसार या विद्यार्थ्यांना शिक्षणासह आरोग्य आणि आहाराच्या सुविधा पुरविणे बंधनकारक असतानाही शासन जाणुनबुजुन त्यांची जबाबदारी झटकत आहे. शासनाने त्यांच्याशी सुरु केलेला हा जीवघेणा खेळ थांबवावा अन्यथा शासनाच्या विरोधात अॅट्रॉसिटी गुन्हा दाखल करावा लागेल; याबाबत आयुक्तांची भेट घेऊन त्यासंदर्भात चर्चा करण्यात येणार आहे.

**-हुलगेश चलवादी,** प्रदेश महासचिव, बहुजन समाज पार्टी

### असा होणार त्रास...!

- अभ्यासासाठी लागणाऱ्या सुविधा कमी
- प्रवासाचा खर्च व वेळ वाढल्याने आर्थिक व मानसिक त्रास
- अभ्यासिका, ग्रंथालय, जीम, बाग यांसारख्या सुविधांचा अभाव
- नवीन परिसरात असुरक्षित वातावरण
- जेवणाचा दर्जा व वेळ व्यवस्थापनात अडचण



## फसवणूक प्रकरणी गोसावी मायलेकी फरारी घोषित

**पुणे :** मंगळवार पेठेतील व्यापाऱ्याला १५ लाख रुपयांचा गंडा घातलेल्या गोसावी मायलेकीला समर्थ पोलिसांनी फरारी घोषित केले आहे. एप्रिल २०२५ मध्ये त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे.

पल्लवी गोसावी व तिची आई किरण गोसावी यांच्यासह आणखी दोघांवर गुन्हा दाखल आहे. शेअर ट्रेडिंग बरोबर आयपील सट्टा व रेसकोर्स व्यवसायात करोडो रुपयांच्या फायद्याचे आमिष गोसावी मायलेकीने व्यापाऱ्याला दिले. पल्लवी गोसावी फायनान्स कन्सल्टंट म्हणून काम करत होत्या. नरपतगिरी चौकात त्यांचे कार्यालय होते. व्यापाऱ्याची ओळख झाल्यानंतर त्यांनी भरपूर फायद्याचे आमिष दाखवत व्यापाऱ्यांकडून २१ लाख रुपये उकळले. त्यापैकी सहा लाख रुपये परत केले. त्यानंतर पैसे देण्यास टाळाटाळ करून व्यापाऱ्याला दिलेला धनादेश ही वठवला नाही.त्यांच्या अन्य दोन साथीदारांनी व्यापाऱ्याला धमकी दिली. त्यानंतर त्यांनी पोलिसात धाव घेऊन तक्रार दिली. तेव्हा पासून त्या फरार आहेत. कोणाला आढळून आल्यास समर्थ पोलिस ठाण्याशी अथवा सहायक पोलिस निरीक्षक गजानन जाधव यांच्याशी 9822742333 या क्रमांकावर संपर्क साधावा.



## पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी ब्रिजमोहन पाटील

**पुणे :** पुणे श्रमिक पत्रकार संघ २०२५-२६ या वर्षाच्या निवडणुकीत अध्यक्ष पदी सकाळचे ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीसपदी दिव्य मराठीचे मंगेश फल्ले तर खजिनदार पदी केसरीचे दिलीप तायडे, उपाध्यक्ष पदी राजा गायकवाड (महाराष्ट्र टाईम्स), सागर आव्हाड (साम टीव्ही) निवडून आले आहेत.तर चिटणीस पदी तनिष्का डोंगरे (सकाळ) आणि निलेश चौधरी (पुण्यनगरी) यांची निवड झाली आहे.

कार्यकारणी सदस्य पुढील प्रमाणे: लक्ष्मण खोत (भास्कर),राजाराम पवार (सामना),दत्ता अढागळे (सामना),अतुल चिंचली (लोकमत),नरेंद्र साठे (सकाळ),आशिष देशमुख (पुढारी),समीर सय्यद (नवभारत),विक्रांत कुलकर्णी (प्रभात),तेजस टवलारकर (महाराष्ट्र टाईम्स),सज्जाद सय्यद (ई मराठी). मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अॅड. प्रताप परदेशी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अॅड. स्वप्निल जोशी यांनी काम पाहिले.

## मंगेश पांडे यांचे निधन



**पुणे :** श्री क्षेत्र लोहगाव येथील श्री गवळी गणेश प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष आणि नाभिक महामंडळाचे सक्रीय कार्यकर्ते मंगेश किशोर पांडे यांचे रविवारी (दि. २९) पहाटे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, भावजय असा परिवार आहे. नाभिक महामंडळाचे कार्यकर्ते संदेश पांडे यांचे ते मोठे बंधू तर लोहगाव नाभिक महामंडळाचे अध्यक्ष सतीश पांडे यांचे ते पुतणे होत.



## ४ जुलै रोजी संपन्न होणार 'संतवाणी

**पुणे :** भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांनी अजरामर केलली 'संतवाणी' येत्या ४ जुलै रोजी रसिकांना अनुभवता येणार आहे, निमित्त आहे आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'संतवाणी' या संत रचनांचा विशेष कार्यक्रमाचे. येत्या शुक्रवार दि. ४ जुलै रोजी भरत नाट्य मंदिर येथे सायं. ६ वाजता हा कार्यक्रम संपन्न होणार असून त्यासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर सर्वांना विनामूल्य प्रवेश देण्यात येईल. कार्यक्रम स्थळी काही जागा या निमंत्रितांसाठी राखीव असतील याची कृपया नोंद घ्यावी. 'संतवाणी' या कार्यक्रमादरम्यान भारतरत्न पं भीमसेन जोशी यांचे शिष्य व किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक पं उपेंद्र भट, भारतरत्न पं भीमसेन जोशी यांचे सुपुत्र श्रीनिवास जोशी, नातू विराज जोशी आणि भारतरत्न पं भीमसेन जोशी यांचे शिष्य व गायक आनंद भाटे हे सादरीकरण करतील. यावेळी पांडुरंग पवार (तबला), अविनाश दिघे (संवादिनी), राहुल गोळे (ऑर्गन), गंभीर महाराज (पखवाज), माऊली टाकळकर (टाळ) हे साथसंगत करतील. कार्यक्रमाचे निरुपण उल्हासदादा पवार करणार आहेत.

## प्रा. प्रदीप कदम यांचा सन्मान

**पुणे :** शांतिदूत परिवाराच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा शांतीदूत सेवारत्न पुरस्कार प्रसिद्ध व्याख्याते प्रा. प्रदीप कदम यांना प्रदान करण्यात आला. उद्योजक रामदास माने, पुणे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे, जीएसटी आयुक्त शिवकुमार साळुंखे, निवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. विठ्ठल जाधव, अप्पर पोलीस आयुक्त प्रवीण पाटील यांच्या हस्ते डॉ. कदम यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी शांतीदूत परिवार संस्थेच्या अध्यक्षा विद्याताई जाधव, संत तुकाराम महाराजांचे वंशज हभप. प्रशांत महाराज मोरे, प्राचार्य रामदास चौरे, गझल गायक भीमराव पांचाळे आदी उपस्थित होते.

# 'स्वच्छतादूता' चा नवा 'आदर्श'...!

## पाषाण तलावाची स्वच्छतेकडे वाटचाल: प्रकल्प पूर्ण

भारतीय संस्कृतीत नद्यांना विशेष महत्त्व आहे; त्यामुळेच नद्यांचे पाणी म्हणजे पवित्र जल समजले जात आहे, पवित्र कामासाठी तर याच नद्यांच्या पाण्याचा वापर केला जातो. मात्र हे वास्तव असले तरीही गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहरातून वाहात असलेल्या नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सांडपाणी सोडले जात आहे; त्यातूनच या नद्या म्हणजे अक्षरश: 'गटारगंगा' झाल्या आहेत. शहरातील तलावही त्याला अपवाद राहिलेले नाहीत; त्याचा विपरीत परिणाम हा नागरिकांच्या आरोग्यावर होत असून विविध आजारांनी नागरिकांना पछाडले आहे. त्यामुळेच केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा यांच्या खास संकल्पनेतून पाषाण तलावाला एक आगळेवेगळे रुप देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



"या प्रकल्पामुळे शहरासमोर एक नवा आदर्श निर्माण होणार आहे. या तलावात सोडलेल्या सांडपाण्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत होता, त्यातूनच परिसरात डासांचे साम्राज्य निर्माण झाले होते. त्यामुळे साथीच्या आजारांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला होता, आता मात्र या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

**-चंद्रकांतदादा पाटील,** उच्च व तंत्र शिक्षणमंत्री



### प्रकल्पाचे वैशिष्ट्ये व फायदे :

- दररोज १० लाख लिटर सांडपाणी प्रक्रिया होणार
- शुद्ध झालेले पाणी उद्यान, बांधकाम इ. उपयोगासाठी पुनर्वापरता येणार
- तलावातील डास, दुर्गंधी, जलपर्णीवर नियंत्रण
- जैवविविधतेला चालना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बावधन आणि पाषाण परिसरातील नागरिकांची दीर्घकाळची प्रतीक्षा अखेर संपली आहे. पाषाण तलावात सांडपाण्यामुळे होत असलेल्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी उभारण्यात आलेला अत्याधुनिक मैलापाणी शुद्धीकरण प्रकल्प पूर्णत्वास आला आहे. सध्या केवळ काही किरकोळ कामे बाकी असून, लवकरच प्रकल्पाची चाचणी घेऊन उद्घाटन करण्यात येणार आहे.

पाषाण परिसरातील भूगाव ते बावधनपर्यंत असलेल्या सोसायट्यांमधून येणारे सांडपाणी थेट रामनदीमार्गे पाषाण तलावात मिसळत होते. परिणामी, तलावात डासांचा उपद्रव, जलपर्णी वाढ, दुर्गंधी आणि जैवविविधतेला धोका निर्माण झाला होता. नागरिकांनी वेळोवेळी याविरोधात आवाज उठवत सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याची मागणी केली होती.

ही मागणी लक्षात घेऊन पुणे महापालिकेने १५व्या वित्त आयोगाच्या ५.५ कोटी रुपये निधीतून २०२३ मध्ये प्रकल्पाचे काम सुरू केले. एक दशलक्ष लिटर क्षमतेचा हा प्रकल्प आयएफएफएएस (इंटिग्रेटेड फिक्स्ड फिल्म अॅक्टिव्हेटेड स्लज) या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून, सांडपाण्यावर प्रभावी प्रक्रिया करून जलप्रदूषण रोखले जाणार आहे.

या प्रकल्पासाठी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे सहकार्य लाभले आहे. आता या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कार्यान्वयनाची उत्सुकता परिसरातील नागरिकांमध्ये पाहायला मिळत आहे.

# महापालिकेच्या 'रेटेबल व्हॅल्यू' वाढीचा पर्दाफाश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे महापालिकेने २०१८ साली नागरिकांच्या 'मिळकत कर' बिलांमध्ये केलेल्या अनैतिक वाढीचा प्रकार समोर आला असून, कर संकलन विभागाने संगणक प्रणालीत बेकायदेशीररीत्या 'रेटेबल व्हॅल्यू' (मूल्यांकन दर) वाढवून हजारो पुणेकरांची आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकाराविरोधात माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी मनपा आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

२०१६-१७ पर्यंत पुणेकरांना नियमित व सुसंगत रक्कमेची मिळकत कर बिले मिळत होती. मात्र २०१८ पासून ही बिले अचानक वाढली. तक्रारींची शहानिशा केल्यानंतर असे स्पष्ट झाले की, २०१६ साली नियुक्त केलेल्या एका खाजगी एजन्सीकडून मिळकत कराचे पुनर्मूल्यांकन करून सादर करण्यात आलेला अहवाल चुकीचा व बेकायदेशीर होता. महापालिकेने सदर एजन्सीला निलंबित करत काळ्या यादीत टाकले असले तरी, कर संकलन विभागाने त्याच अहवालावर आधारित माहिती संगणक प्रणालीत अपलोड करून नवीन रेटेबल व्हॅल्यू प्रमाणे बिले पाठवली.

सदर बाब नागरिकांच्या लक्षात न आल्याने त्यांनी वाढीव रकमेची बिले भरली. मात्र अलीकडेच मूळ आणि सध्याच्या बिलांची तुलना केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी संबंधित पुरावे मिळकत कर विभागाला सादर करण्यात आले असून, काही प्रकरणांमध्ये विभागाने चुकीची रेटेबल व्हॅल्यू सुधारून मूळ स्वरूपातील बिले नागरिकांना दिली आहेत.

मात्र अशा प्रकाराने हजारो नागरिकांची फसवणूक झाल्याने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक व विरोधी पक्षनेत्यांनी केली आहे. तसेच ज्या नागरिकांनी वाढीव बिले भरली आहेत, त्यांना योग्य ते परतफेडीचे धोरण राबवावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# श्री वरदेंद्र तीर्थ स्वामीजी यांच्या आराधना महोत्सवाला सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जगत्गुरू श्रीमान मध्वाचार्य मूळ महासंस्थानतर्फे श्री वरदेंद्र तीर्थ स्वामीजी यांच्या २४० व्या आराधना महोत्सवाला आज भक्तीरसपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. या महोत्सवानिमित्त श्री राघवेंद्र स्वामी महासंस्थानचे मंत्रायल (आंध्रप्रदेश) पिठाधीश्वर श्री श्री १०८ श्री सुबुधेंद्रतीर्थ श्रीपादा: पिठाधीपतिगुलू नंजनगुड्ड यांचे आगमन झाले आहे.

आराधना महोत्सवानिमित्त मठाच्या आवारातील श्री वरदेंद्र तीर्थ स्वामीजी यांच्या समाधीस विशेष महापूजेने पुष्पालंकारित करण्यात आले आहे.

सदाशिव पेठेतील लक्ष्मी रोडवरील नंजनगुड्ड श्री वरदेंद्र श्री राघवेंद्र स्वामी मठ येथे या तीन दिवसीय आराधना महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आराधना महोत्सवानिमित्त रविवारी सायंकाळी ध्वजारोहण, प्रार्थनाउत्सव, गौपूजा आणि धनधान्य पूजा करण्यात आली. तर आज (दि. ३०) पहाटे साडेपाच पासून सुप्रभात, निर्माल्यसेवा, पंचामृतपूजा, अलंकारपूजा अशा विविध धार्मिक कार्यक्रमांनी आराधना महोत्सवाला सुरुवात झाली. पिठाधीश्वर श्री श्री 108 श्री सुबुधेंद्रतीर्थ श्रीपादा: पिठाधीपतिगुलू नंजनगुड्ड यांची पाद्यपूजा करण्यात आली तसेच तप्त मुद्रा धारण सोहळा झाला. श्री श्री १०८ श्री सुबुधेंद्रतीर्थ श्रीपादा: पिठाधीपतिगुलू नंजनगुड्ड यांच्या हस्ते सभामंडपात श्री मूलरामाची साग्रसंगीत पूजा करण्यात आली. सायंकाळी कुमारी अभिज्ञा रघुनंदन यांनी दासवाणी सेवा रुजू केली.



**पुणे** जगत्गुरू श्रीमान मध्वाचार्य मूळ महासंस्थानतर्फे श्री वरदेंद्र तीर्थ स्वामीजी यांच्या २४० व्या आराधना महोत्सवाला आज भक्तीरसपूर्ण वातावरणात सुरुवात झाली.आराधना महोत्सवानिमित्त मठाच्या आवारातील श्री वरदेंद्र तीर्थ स्वामीजी यांच्या समाधीस विशेष महापूजेने पुष्पालंकारित करण्यात आले आहे.

# तुळशीबाग मंडळ यंदा साकारणार 'मथुरेतील वृंदावन'



**सजावट**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मानाचा चौथा महागणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्टचे यंदाचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष (१२५) असून यंदाच्या गणेशोत्सवात मथुरेतील वृंदावन साकारण्यात येणार आहे. या सजावटीचा शुभारंभ केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले.

बिबवेवाडी येथील सरपाले फ्लॉवर मर्चंट येथे झालेल्या कार्यक्रमाला आमदार हेमंत रासने, स्वागताध्यक्ष व प्रसिद्ध उद्योजक कृष्णकुमार गोयल, मंडळाचे अध्यक्ष विकास पवार, कोषाध्यक्ष नितीन पंडित, उपाध्यक्ष विनायक कदम, पुष्प सजावटकार सुभाष सरपाले, मंडळाचे पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या तसेच गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, पुण्यातील गणेशोत्सवात सार्वजनिक स्वरूपातील विधायक उपक्रम नेहमीच राबवले जातात. परंतु त्याची दखल घेतली जात नाही. याउलट, एखादी वाईट घटना घडली, तर मात्र तिची लगेच दखल घेतली जाते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची सुरुवात केली होती. परंतु स्वातंत्र्यानंतरही पुण्यातील गणेशोत्सव मंडळांनी विधायक उपक्रमांची परंपरा जपली आहे. हा उत्सव केवळ दहा दिवसांचा नसतो, तर गणेशोत्सव मंडळांच्या वतीने वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्याचे देशभरातून कौतुक होते, असेही त्यांनी सांगितले. कोषाध्यक्ष नितीन पंडित म्हणाले, सन १९५२ सालापासून गणेशोत्सवात धार्मिक व पौराणिक देखाव्यांची परंपरा असणारे श्री तुळशीबाग मंडळ यंदाच्या वर्षीही आकर्षक मथुरेतील वृंदावन या संकल्पनेतून देखावा सादर करणार आहे.



"स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची सुरुवात केली होती. परंतु स्वातंत्र्यानंतरही पुण्यातील गणेशोत्सव मंडळांनी विधायक उपक्रमांची परंपरा जपली आहे. हा उत्सव केवळ दहा दिवसांचा नसतो, तर गणेशोत्सव मंडळांच्या वतीने वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्याचे देशभरातून कौतुक होते.

**-मुरलीधर मोहोळ,** केंद्रिय नागरी उड्डाण राज्यमंत्री



## घराचे कुलुप तोडून सव्वादोन लाखांचा ऐवज लंपास

**पुणे :** सदनिकेचे कुलूप तोडून दोन लाख २० हजारांचा ऐवज चोरल्याची घटना लोहगाव परिसरात घडली. याबाबत एकाने विमानतळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, यानुसार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार लोहगावमधील संतनगर भागातील राहिवासी आहेत. चोरट्यांनी मध्यरात्री सदनिकेचे कुलूप तोडले. शयनगृहातील कपाट उचकटून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण दोन लाख २० हजार रुपयांचा ऐवज लांबवून चोरटे पसार झाले. याबाबत पोलिस उपनिरीक्षक राठोड पुढील तपास करत आहेत.

## धायरीतील गंभीर समस्यांसाठी 'अंतिम लढा

**पुणे :** धायरी परिसरातील दीड लाख नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत नागरी समस्यांनी त्रस्त असून, आता या प्रश्नांवर तोडगा निघावा यासाठी 'अंतिम लढ्याचा' इशारा देण्यात आला आहे. खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांच्याशी नुकतीच बैठक घेऊन, येत्या ३० जूनपासून सुरू होणाऱ्या विधानसभेत धायरीतील समस्यांवर आवाज उठवावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

पण केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी यासाठी, धायरीकरांनी आमदार, महापालिका व शासनाला १०० तासांची अंतिम मुदत दिली आहे. या मुदतीत संबंधित सर्व विभागांची बैठक घेऊन निर्णय घेण्यात यावा, अन्यथा पुढील टप्प्यातील आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.या सर्व समस्यांबाबत नागरिकांनी कायदेशीर मार्गाने अनेक वर्षांपासून पाठपुरावा केला असूनही कोणतेही ठोस उपाय झालेले नाहीत. अनेक आंदोलने, उपोषण, निवेदने आणि पत्रव्यवहार करूनही सरकार आणि प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## वाहन खरेदी आजपासून महागणार

**पुणे :** राज्यातील वाहन खरेदीदारांसाठी एक महत्त्वाची आणि आर्थिक भार वाढवणारी बातमी आहे. १ जुलै २०२५ पासून इंधनावर चालणाऱ्या तसेच महागड्या इलेक्ट्रिक वाहनांवर अतिरिक्त कर आकारण्यात येणार आहे. यासंदर्भातील आदेश परिवहन आयुक्त कार्यालयाकडून जारी करण्यात आले आहेत.

नवीन निर्णयानुसार, पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या वाहनांवर सध्या लागू असलेल्या करामध्ये १ टक्का वाढ करण्यात आली आहे. तर, अद्यापपर्यंत टॅक्स फ्री असलेल्या इलेक्ट्रिक वाहनांमध्येही बदल करत, ३० लाखांपेक्षा अधिक किमतीच्या ई-वाहनांवर आता ६ टक्के कर आकारला जाणार आहे.

या बदलाबाबत माहिती देताना उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले म्हणाले, "प्राप्त आदेशानुसार, १ जुलैपासून नव्या कर दरांची अंमलबजावणी होणार आहे. इंधनावर चालणाऱ्या वाहनांवर १ टक्का अधिक कर लागेल. तर, ३० लाखांहून अधिक किमतीच्या ई-वाहनांवर ६ टक्के कर आकारला जाईल.



## ई-पिंक रिक्षा योजनेचा शुभारंभ

**पुणे :** आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि गरजू महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने राबवलेली ई-पिंक रिक्षा योजना आता प्रत्यक्षात अंमलात आली आहे. पुणे शहरात या योजनेची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, २,८०० महिलांना ई-रिक्षा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड परिसरासह एकूण ३,४०० महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

या योजनेचा उद्देश महिलांना स्वबळावर उभं राहण्याची संधी देणे हा असून, गरजू, विधवा, एकल, अपंग आणि घटस्फोटित महिलांना प्राधान्य दिले जाणार आहे. महिला व बालविकास विभागाच्या सहकार्याने ही योजना राबवली जात आहे. महिलांना ई-रिक्षा खरेदीसाठी ९० टक्के आर्थिक मदत दिली जाणार असून, त्यात ७० टक्के कर्ज आणि २० टक्के अनुदानाचा समावेश आहे. उर्वरित १० टक्के रक्कम लाभार्थींनी भरायची आहे.

# 'पीएमपी'ची 'लेडीज स्पेशल' बससेवा सुसाट...!

## ३३ मार्गावर सेवा सुरु : महिलांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित; पोलीसांचीही गस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महिला प्रवाशांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, त्यांचा प्रवास कोणत्याही त्रासाविना व्हावा म्हणून 'पीएमपी' प्रशासनाने निवडक मार्गांवर गर्दीच्या वेळेत महिला विशेष बससेवा सुरू केली. त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

महिला प्रवाशांचा प्रतिसाद लक्षात घेता सेवेचा विस्तार होण्याची शक्यता आहे. 'पीएमपी' प्रशासन महिलांच्या सुरक्षेबाबत अधिक गंभीर झाले आहे. बसमध्ये चोरी व छेडछाडीच्या प्रकारांमध्ये वाढ झाल्याने यावर उपाययोजना म्हणून 'पीएमपी'ने काही मार्गांवर पोलिसांची गस्त सुरू केली.

महिला विशेष बससेवा सुरुवातीला केवळ दोन आगारांपुरती मर्यादित होती. आता ही सेवा १४ आगारांमधून सुरू आहे. सकाळी व संध्याकाळी प्रत्येकी दोन तास अशा मर्यादित वेळेत सेवा असली तरी चांगला प्रतिसाद लाभत आहे. पहिल्या टप्प्यात १७ मार्गांवर ही सेवा सुरू होती. आता ३३ मार्गांवर याचा विस्तार झाला आहे. परिणामी महिला प्रवाशांची सोय होत आहे. त्यांच्यात आता काही प्रमाणात सुरक्षेची भावना तरी वाढीस लागत आहे. याशिवाय छेडछाडीच्या त्रासापासून त्यांची सुटका झाली आहे.




**अशी मिळतेय सेवा...!**
- सेवा कालावधी : १२ ते २७ जून
- दिवस : १६
- फेऱ्या : ९९५
- महिला प्रवासी : ३८,७८९
- उत्पन्न : ८,३२,१४५
- मार्ग : ३३

वेळ : सकाळी ९ ते ११, सायंकाळी ५ ते ७
सरासरी महिला प्रवासी : दर फेरीस सुमारे ३९

### या मार्गाला कमी प्रतिसाद

- कोथरूड आगार ते पुणे स्टेशन या मार्गाला सर्वांत कमी प्रतिसाद आहे. या मार्गावर सहा फेऱ्या झाल्या असून, यातून केवळ एक हजार २४० रुपयांचे उत्पन्न मिळाले. यातून केवळ ९८ महिलांनी प्रवास केला.

### या मार्गांवर सर्वाधिक प्रतिसाद

- 'पीएमपी'च्या क्र. ८२ या मार्गावर मार्गावर दोन हजार ६०२ महिलांनी प्रवास केला. यातून ४९ हजार ६४५ रुपयांचे उत्पन्न मिळाले. हा मार्ग वर्तुळाकार बससेवेचा आहे. एनडीए गेट क्रमांक १० ते एनडीए गेट क्रमांक १० या मार्गावर मनपा भवन, कोंढवा, वारजे, शिवणे, कर्वे रस्ता, कोथरूड स्थानक आदी प्रमुख ठिकाणांचा समावेश आहे.

# मार्केटयार्डात ठेकेदारीचा 'बाजार'...!

### ठेका मिळविण्यासाठी राजकीय चढाओढ : गुंडगिरीचे सावट गडद

पुण्याची बाजार समितीतील उलाढालीमुळे ही बाजार समिती जगाच्या नकाशावर जाऊन पोहोचली आहे; त्यातूनच या बाजार समितीच्या उत्पन्नाचा उच्चांकही वाढला आहे. त्यामुळेच ही बाजार समिती आशिया खंडातील सर्वात 'श्रीमंत' म्हणून ओळखली जाते; त्यातूनच येथील ठेकेदारीलाही वेगळेच स्वरुप प्राप्त झाले असून त्यातूनच सातत्याने संघर्षही निर्माण होत आहे. त्याचा फटका प्रामाणिकपणे काम करत असलेल्या व्यापारी बांधवांना सहन करावा लागत आहे; हे वास्तव असतानाच संचालक मंडळाचेच हात भ्रष्टाचाराने बरबटलेले असल्याने त्यांचाही या ठेकेदारांवर कसलाच वचक राहिलेला नाही. त्यामुळे या संघर्षाला अधिकच बळ मिळत आहे.



> बाजार समितीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून त्याची पाळेमुळे खोलवर रुजली आहेत; या भ्रष्टाचारामध्ये अधिकारी आणि राजकीय कार्यकर्ते यांचेही हात बरबरटलेले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे याची इंत्यभूत माहिती असतानाही प्रशासन आणि शासन स्तरावर त्याची कोणतीही गंभीर दखल घेतली जात नाही; ही बाब निश्चितच खेदजनक अशीच आहे.
>
> **-चंद्रकांत वारघडे पाटील,** संस्थापक अध्यक्ष माहिती सेवा समिती



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये वाहनतळाच्या ठेक्यावरून मोठा संघर्ष निर्माण झाला असून, ठेका मिळवण्यासाठी सत्ताधारी पक्षाच्या दोन वरिष्ठ लोकप्रतिनिधींनी थेट हस्तक्षेप केल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर संचालक मंडळावर राजकीय दबाव वाढला असून, बाजार समिती परिसरात गुंडगिरीचे सावट गडद होत असल्याची गंभीर चर्चा सुरू आहे.

विश्वासार्ह सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सध्या बाजार समितीच्या आवारातील विविध ठिकाणी ठेके देण्याचे सत्र सुरू आहे. काही संचालकांनी वेगवेगळ्या भागांवर कब्जा मिळवून अनौपचारिक मालकी हक्क गाजवण्यास सुरुवात केली आहे. वाहनतळासाठीची रिकामी जागा हेच नवे लक्ष्य बनले असून, यासाठी सत्ताधाऱ्यांचे पाठबळ लाभलेले काही कार्यकर्ते थेट बाजार समितीत दाखल होत, प्रशासकीय अधिकाऱ्यांवर दबाव आणत आहेत. परिणामी, प्रशासनाची अडचण वाढली असून, कारभार पारदर्शक राहण्याबाबत शंका व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर, पुणे महापालिकेत देखील अलीकडेच एका कामगार नेत्याने गावगुंडांसह महिला अधिकाऱ्यांवर अरेरावी केल्याची घटना घडली होती. त्यानंतर महापालिका आयुक्तांनी संबंधित नेत्याला महापालिकेच्या आवारात प्रवेशबंदी केली. आता बाजार समितीत गुंडगिरी करणाऱ्यांवर अशीच कारवाई होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

"बाजार समित्या शेतकऱ्यांचे खरेदी-विक्री केंद्र राहता राहता कत्तलखाने बनल्या आहेत," असा आरोप अनेक नेत्यांनी केला आहे. काही वर्षांपूर्वी एका शेतकऱ्याला जिवंत जाळल्याची आणि मुंबईतील बाजार समितीत एका अधिकाऱ्याचा गोळी झाडून खून झाल्याची प्रकरणे अजूनही चर्चेत आहेत.

संचालक संतोष नांगरे यांच्या कामगार संघटनेने देखील बाजार समिती प्रशासनाकडे पत्र देत, रात्रीच्या वेळेस बाजार आवारात बाहेरून आलेल्या टोळक्यांकडून कामगार आणि वाहनचालकांना धमकी देण्यात येत असल्याचा आरोप केला आहे.

### मुळशी पॅटर्न'चे वास्तवात रूपांतर?

'मुळशी पॅटर्न' या प्रसिद्ध मराठी चित्रपटाचे काही भाग याच बाजार समिती आवारात चित्रीत करण्यात आले होते. त्या चित्रपटात दाखवलेली गुंडगिरी आणि राजकीय हस्तक्षेप सध्या प्रत्यक्षात घडताना दिसत असल्याची चर्चा बाजार समिती परिसरात रंगली आहे. ठेकेदारीच्या माध्यमातून गुन्हेगारीला खतपाणी घालण्याचे प्रकार उघड होत असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

# रसिकांनी अनुभवला सुरांचा 'मृदगंध'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पावसाच्या सरींनी अल्हाददायक झालेल्या चिंब वातावरणात संगीताच्या वैविध्यपूर्ण प्रकारांचा आस्वाद घेत पुणेकरांनी स्वर आणि सुरांचा अतुलनीय 'मृदगंध' अनुभवला.

निमित्त होते विद्या हॉस्पिटॅलिटी, सुदित डेव्हलपर्स आणि रुई यूनिवर्सल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रसिध्द शास्त्रीय गायक पंडित आनंद भाटे आणि प्रसिध्द बासरीवादक अमर ओक यांच्या 'मृदगंध' या मैफलीचे.

यावेळी विद्या हॉस्पिटॅलिटीचे गौरव भिडे, सुदित डेव्हलपर्सचे सुदित तावरे आणि रुई यूनिवर्सलचे नकुल देशपांडे यांच्या हस्ते कलाकारांचे स्वागत करण्यात आले.

या मैफलीत प्रारंभी आनंद भाटे यांनी एकल शास्त्रीय गायन, तर अमर ओक यांनी एकल बासरी वादन सादर केले. शास्त्रीय, उपशास्त्रीय, भावसंगीत, भक्तीसंगीत आणि सिनेसंगीत अशा वैविध्यपूर्ण गायन-वादनाने ही मैफल रंगत गेली. पहाडी आणि सिंध भैरवी रागावर आधारित ठुमरीने मैफलीचा कळस गाठला. राग मेघ आणि वृंदावनी सारंग यांचा सुंदर कोलाज अनुभवताना रसिकांना निसर्गाशी असलेल्या अद्वैताची अनुभूती आली. शास्त्रीय गायन आणि बासरी वादनाच्या




जुगलबंदीचे साक्षीदार होत रसिकांनी मनोरंजनी रागाचा देखील आनंद घेतला. मैफलीच्या उत्तरार्धात आनंद भाटे यांनी नाट्यगीते सादर केली. 'संगीत सौभद्र' या संगीत नाटकातील 'प्रिये पहा...' यासह अनेक अजरामर नाट्यगीतांनी वाहवा मिळवली. विठुमाऊलीच्या ओढीने संतांच्या लेखणीतून पाझरलेल्या अभंगवाणीने अवघे वातावरण भक्तमय होऊन गेले होते. श्रीरामाच्या आरतीत तल्लीन झालेल्या रसिकांबरोबर विठूचा गजर करीत मैफलीचा समारोप झाला.

या मैफलती प्रसाद जोशी (पखवाज आणि तबला), पांडुरंग पवार (तबला), अमृता ठाकुरदेसाई (कीबोर्ड), उद्धव कुंभार (तालवाद्य), सुयोग कुंडलकर (हार्मोनियम) या वादक कलाकारांनी सुरेल साथसंगत केली. या मैफलीचे निवेदन मिलिंद कुलकर्णी यांनी केले

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्या हॉस्पिटॅलिटीचे गौरव भिडे यांनी स्वागत केले.

# संत परंपरेमध्ये सामाजिक सुधारणावादाची बीजे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राला संतांच्या माध्यमातून सुधारणावादी विचारांची मोठी परंपरा लाभली असून संतांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमांतून समता आणि विश्व बंधुत्वाची मूल्ये रुजवली. अशा विचारी बुद्धीप्रामाण्यवादी महाराष्ट्रात 'भक्त' हा नवीन 'संप्रदाय' अस्तित्वात येऊ शकतो, याचे आश्चर्य वाटते असे मत अलाहाबाद विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजन हर्षे यांनी व्यक्त केले. साधना प्रकाशनातर्फे डॉ. अभिजित वैद्य यांच्या 'पुरोगामी जनगर्जना'मधील निवडक संपादकीय लेखांचा समावेश असलेल्या 'शब्दांचीच शस्त्रे' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.राजन हर्षे बोलत होते. या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर माजी शिक्षक आमदार आणि राष्ट्र सेवा दलाचे माजी कार्यकारी विश्वस्त कपिल पाटील, लेखक डॉ. अभिजित वैद्य आणि साधना प्रकाशनाचे संपादक विनोद शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.राजन हर्षे म्हणाले की, अस्मितेचे राजकारण सर्वात घातक राजकारण असते. अस्मितेच्या राजकाणात तिटकारा आणि द्वेष पेरलेला असतो.



पुणे — साधना प्रकाशनातर्फे डॉ. अभिजित वैद्य यांच्या 'पुरोगामी जनगर्जना'मधील निवडक संपादकीय लेखांचा समावेश असलेल्या 'शब्दांचीच शस्त्रे' या पुस्तकाचे प्रकाशन करताना माजी शिक्षक आमदार आणि राष्ट्र सेवा दलाचे माजी कार्यकारी विश्वस्त कपिल पाटील. यावेळी (डावीकडून) विनोद शिरसाठ, डॉ.राजन हर्षे, पाटील आणि वैद्य.

# 'क्लिन सायन्स' आणि 'निरंजन' तर्फे १५०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट प्रदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चिमुकल्यांच्या आयुष्यात शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करीत त्यांच्या पंखांना बळ देण्याकरिता क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि.,पुणेच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून व निरंजन सेवाभावी संस्थेने पुढाकार घेतला आहे. पुणे शहरासह ग्रामीण भागातील ३० शाळांतील तब्बल १५०० गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व घेत त्यांना १६ प्रकारच्या शैक्षणिक वस्तू असलेले किट प्रदान करण्यात आले. केवळ पैशाअभावी शिक्षणापासून वंचित राहणा-या या विद्यार्थ्यांच्या



भविष्याच्या वाटा उज्ज्वल व्हाव्या, याकरिता हा प्रयत्न.

गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित कार्यक्रमाला क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे कार्यकारी संचालक कृष्णकुमार बूब, तौरल इंडिया प्रा.लि. चे संचालक भरत गीते, मुंबई उपनगरचे माजी जिल्हाधिकारी व महसूल प्राधिकरण सदस्य राजेंद्र क्षीरसागर, संगम कृषी सेवा संस्थेचे चेअरमन दिलीप शिंदे, राष्ट्रीय खो खो खेळाडू व म्हाडा अधिकारी संजय नाईक, संस्थेचे अध्यक्ष डॉ. नवनीत मानधनी, सचिव सीए दुर्गेश चांडक यांसह क्लिन सायन्सचे पदाधिकारी देखील उपस्थित होते. क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे व्यवस्थापकीय संचालक अशोककुमार बूब यांचे उपक्रमाकरिता विशेष मार्गदर्शन मिळाले.

भरत गीते म्हणाले, युरोप सारख्या ठिकाणी नागरिकांची संख्या कमी होत चालली आहे. भारताकडे युवा पिढी सर्वाधिक असून संपूर्ण जगाला भारताकडून आशा आहे. आपले विद्यार्थी हेच देशाचे भविष्य आहे, तेच भारताचा झेंड सर्वत्र नेणार आहेत. केवळ परिस्थितीच नाही, तर विद्यार्थ्यांच्या मनातील शंका आणि अपयशाची भिती हाच खरा अडथळा असतो. त्यामुळे कोणतेही क्षेत्र निवडले, तरी मनापासून काम करा. आम्ही कायम तुमच्या पाठिशी आहोत, असा सल्ला त्यांनी दिला.

राजेंद्र क्षीरसागर म्हणाले, आयुष्यात काय करायचे हे लवकर ठरवायला हवे. आपल्यासमोर स्वप्न असेल, तर ते साकार करण्यासाठी लवकर वाटचाल सुरु होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वप्न बघून ते पूर्ण करण्याकडे झेपावले पाहिजे. यासाठी चांगले मित्र, आई-वडिल आणि स्वत:चा निश्चय असणे आवश्यक आहे.

डॉ. नवनीत मानधनी म्हणाले, महाराष्ट्रातील २५०० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व पुण्यातील निरंजन सेवाभावी संस्थेने घेतले आहे. दुष्काळग्रस्त बीड सह अहिल्यानगर आणि पुण्यासह आजूबाजूच्या ग्रामीण भागात शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करुन गरजू व गरीब मुलांचे शैक्षणिक पालकत्त्व घेण्याचे कार्य संस्था अनेक वर्षे करीत आहे. संजय नाईक, दिलीप शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. सर्व विद्यार्थी व पालकांना खाऊच्या बॅग देण्यात आल्या. अभय जाजू यांनी सूत्रसंचालन केले.

> सामाजिक कार्याला आर्थिक पाठबळ लागते. मात्र, केवळ आर्थिक पाठबळावर नाही, तर ते काम मनापासून केल्यास यशस्वी होते. कोणतेही काम करताना आपण लाज बाळगता काम नये. तरुणांनी निरंजन सेवाभावी संस्थेचा आदर्श घ्यावा. प्रत्येक काम आत्मियतेने केल्यास ते पूर्ण होते. त्यामुळे निरंजन सारख्या सेवाभावी संस्थेच्या पाठिमागे आम्ही कायम आहोत.
>
> **-कृष्णकुमार बूब;** कार्यकारी संचालक क्लिन सायन्स



## मराठी साहित्य संमेलन संपन्न

**पिंपरी :** 'मानवतेची भूमिका हाच बुद्धिवादी माणसांसमोर एकमेव पर्याय आहे; तसेच बुद्धाला स्वीकारण्यासाठी प्राचीन पाली भाषेकडे वळले पाहिजे!' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी शनिवारी आष्टा, तालुका वाळवा येथे केले. लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान, पिंपरी - पुणे आणि संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या पाली - मराठी साहित्य संमेलनात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. ज्येष्ठ कविवर्य डॉ. विठ्ठल वाघ, स्वागताध्यक्ष अण्णा डांगे, लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. तारा भवाळकर यांनी, 'मातृभाषेचा पाया भक्कम असेल तर जगातील कोणतीही भाषा पंधरा दिवसांत शिकता येते!' असे मत मांडले. याप्रसंगी डॉ. सुनीलकुमार लवटे (लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार), ॲड. चिमण डांगे (अहिल्याबाई होळकर पुरस्कार), डॉ. पल्लवी बनसोडे (लोकशिक्षक बाबा भारती स्नेहबंध पुरस्कार), सुधीर सूर्यगंध, श्रीकांत आढाव, डॉ. कामायनी सुर्वे, डॉ. संगीता अहिवळे, प्रकाश कांबळे (लोकशिक्षक बाबा भारती साहित्य पुरस्कार) प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पुरस्काराला उत्तर देताना डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी, 'अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असताना मराठी आणि पाली या दोन्ही भाषांचे आकलन अन् विकास यासाठी हे संमेलन महत्त्वाची भूमिका पार पाडते आहे!' अशी भावना व्यक्त केली.

## यशस्वी भव !



## गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** कुदळवाडी गावामध्ये गेली अनेक वर्षे अखंडपणे सुरु असलेली आणि एक प्रेरणादायी परंपरा बनलेली गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम यंदाही अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वरूपात पार पडला. हा कार्यक्रम रविवारी विठ्ठल मंदिर, यादवनगर, कुदळवाडी येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे आयोजन आमदार महेशदादा लांडगे युवा मंच, इंद्रायणी महिला प्रतिष्ठान कुदळवाडी, तसेच श्री. दिनेश लालचंद यादव मित्र परिवार यांच्या वतीने करण्यात आले होते. १० वी व १२ वी परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, आणि शुभेच्छा भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. हा सन्मान विद्यार्थ्यांना आत्मविश्वास देणारा ठरला असून, त्यांना भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते न्यायाधीश रमेश संभाजीराव उमरगे (शिवाजीनगर कोर्ट, पुणे) यांचे सखोल व विचारप्रवर्तक मार्गदर्शन. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणात सातत्य, कठोर परिश्रम, योग्य दिशा व सामाजिक जबाबदारी या बाबतीत प्रभावी विचार मांडले.

# 'ईएसएल' उपक्रम ठरतोय उपयुक्त

## सरकारी शिक्षणातील शिक्षक संचालित बदलांचे प्रभावी उदाहरण

### उपक्रमाची पार्श्वभूमी (ठळक वैशिष्ट्ये)

- इंग्रजी शिक्षण बळकट करण्यासाठी २०२२ मध्ये सुरूवात
- २०० हून अधिक शिक्षकांना मासिक प्रशिक्षण
- ३०० पानी शिक्षक निर्मित इंग्रजी प्रॅक्टिस बुक: इयत्ता पहिली व दुसरीमधील २७,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांद्वारे त्याचा वापर
- पुस्तकातील तीन टप्पे: अक्षर ओळख, शब्द वाचन, वाक्य वाचन तसेच परिच्छेद वाचन
- मास्टर ट्रेनर्सद्वारे सहकार्यांना मार्गदर्शन व साधने निर्मिती: उपक्रमाच्या शाश्वततेस बळ
- क्युसीआयच्या थर्ड पार्टी मूल्यांकनात सुधारलेली इंग्रजी शैक्षणिक गुणवत्ता
- शिक्षकांचा आत्मविश्वास वाढून विद्यार्थ्यांचा तणाव कमी होऊन सार्वजनिक शिक्षणात नवचैतन्य



> पिंपरी चिंचवड महापालिका शाळांमधील शिक्षकांचा आत्मविश्वास वाढविणे हा या उपक्रमामागचा उद्देश आहे. जेव्हा शिक्षकांना योग्य प्रशिक्षण आणि संधी दिली जाते, तेव्हा शाळांमध्ये सकारात्मक बदल घडू शकतात. या ईएसएल उपक्रमामुळे शिक्षक, विद्यार्थी यांच्या इंग्रजीमध्ये सुधारणा तर झालीच, शिवाय पालकांचा महापालिका शाळांवरील विश्वासही दृढ झाला आहे. या उपक्रमाच्या सातत्यासाठी आणि विस्तारासाठी महापालिकेने मास्टर ट्रेनर्सची टीम तयार केली आहे. हे प्रशिक्षक आपल्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन तर करतातच शिवाय नवीन सामग्री तयार करून दर्जेदार अध्यापन पद्धती देखील शाळांमध्ये रुजवत आहेत.
> **-शेखर सिंह,** आयुक्त

> पिंपरी चिंचवड महापालिकेचा इंग्लिश एज सेकंड लँग्वेज या उपक्रमाच्या यशाची टक्केवारी पाहून आगामी काळात तो ३ री ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्याचे नियोजन आहे. आता हा केवळ एक प्रकल्प राहिला नसून ती विद्यार्थ्यांच्या प्रगतीची एक चळवळ बनली आहे. विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे.
> **-प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेने २०२२ साली इयत्ता पहिली आणि दुसरीच्या वर्गापासून सुरू केलेल्या इंग्लिश एज सेकंड लॅंग्वेज (ईएसएल) उपक्रमामुळे शाळांमध्ये एक सकारात्मक बदल घडतो आहे. या उपक्रमामुळे इंग्रजी हा विषय शिक्षक तसेच विद्यार्थ्यांसाठी आत्मविश्वास, अभिव्यक्ती आणि आनंदाचे माध्यम ठरत आहे. आजपर्यंत २७ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलेला हा उपक्रम सरकारी शिक्षणातील शिक्षक संचालित बदलांचे प्रभावी उदाहरण आहे.

या उपक्रमाअंतर्गत सुमारे २०० प्राथमिक शिक्षकांना मासिक कार्यशाळांमधून प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामध्ये फॉनिक्स, परस्परसंवाद, आणि प्रिंट-समृद्ध वर्गखोल्यांच्या निर्मितीवर भर देण्यात आला. हा उपक्रम शिक्षकांचा आत्मविश्वास वाढवणारा ठरत आहे. याबाबत छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालयाच्या शर्मिष्ठा बाबर म्हणाल्या, 'या उपक्रमात सहभागी झाल्यानंतर जेव्हा मला इंग्रजी प्रॅक्टिस बुक मिळाले, तेव्हा सुरूवातीपासूनच मला बदल दिसू लागला. माझ्या वर्गातील इयत्ता पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांचे वाचनकौशल्य आणि शब्दसंपत्तीमध्ये वाढ झाली आहे. हे प्रशिक्षण कृतीवर आधारित असल्यामुळे आणि वर्गखोल्यांच्या गरजेनुसार रचना केल्यामुळे आम्हालाही इंग्रजी शिकवताना आनंद वाटत आहे.

**उपक्रमाचा विस्तार आणि परिणाम..**

उपक्रमाच्या यशामुळे आता इयत्ता ३, ४ आणि ५ मध्येही त्याचा विस्तार करण्यात आला आहे. नवीन प्रॅक्टिस बुक्स आणि प्रशिक्षण पद्धती तयार करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये २० हून अधिक शिक्षक, टीच फॉर इंडियाचे फेलोज, विद्यार्थी आणि अधिकारी यांचे योगदान आहे.

ईएसएल तंत्रज्ञानाचा उपयोग आता इंग्रजीपुरताच न राहता मराठी व पर्यावरणशास्त्रासारख्या विषयांतही केला जात आहे. शिक्षक आता प्रश्नोत्तर पद्धती, ग्रुप स्टडी अशा विविध गोष्टींचा वापर करून शिकवण्याच्या पद्धतीत बदल करत आहेत.

**उपक्रमामुळे झालेले परिवर्तन..**

सुरूवातीला इंग्रजीला घाबरणाऱ्या ते आत्मविश्वासाने गोष्टी सांगणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंतचा प्रवास या उपक्रमामुळे शक्य झाला आहे. शिक्षकांवर विश्वास ठेवून त्यांना आवश्यक साधने व स्वातंत्र्य दिल्यास, सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेत देखील परिवर्तन घडू शकते, हे या उपक्रमातून सिद्ध झाले आहे.

## मालमत्ताकर वसुलीसाठी व्यापक मोहीम




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेने १ जुलै २०२५ पासून मालमत्ता कर वसुलीची मोहीम अधिक व्यापक स्वरुपात राबवण्याचे नियोजन केले आहे. वारंवार आवाहन करून तसेच जप्तीची नोटीस देऊन देखील कर न भरणाऱ्या थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करण्याची मोहीम महापालिकेकडून हाती घेतली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत कर तात्काळ भरावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

अद्यापही ज्या थकबाकीदारांनी मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांना जप्तीपूर्व नोटीस बजावण्यात येणार असून यापूर्वी ज्यांना अशी नोटीस दिली आहे, त्यांच्यावर केव्हाही जप्तीची कारवाई केली जाऊ शकते. यामध्ये निवासी मालमत्ता धारकांचे वाहन, टीव्ही, फ्रिजसारख्या वस्तू जप्त करण्यात येणार आहे, अशी माहिती कर संकलन आणि कर आकारणी विभागातून देण्यात आली. तरी नागरिकांनी आपला चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत कर भरून या सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेचा मालमत्ता कर न भरणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. वारंवार आवाहन करून देखील मालमत्ता कराची थकबाकी न भरणाऱ्यांवर जप्ती सारखी कठोर कारवाई करण्याचे नियोजन आहे. आज १ जुलैपासून यासाठी व्यापक मोहीम हाती घेणार आहोत. त्यामुळे जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी तात्काळ मालमत्ता कर भरून भविष्यात होणारी कारवाई टाळावी.
> **— प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त

## पालिकेची शहरात विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील विविध प्रभागांमध्ये विशेष साप्ताहिक स्वच्छता मोहीम राबवली गेली. धार्मिक स्थळे, सार्वजनिक जागा, रस्ते आणि बागा याठिकाणी स्वच्छता उपक्रम प्रभावीपणे पार पडले. या उपक्रमाला नागरिक, स्वयंसेवी संस्था व खासगी कंपन्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शहर स्वच्छ, सुंदर आणि कचरामुक्त ठेवण्यासाठी महापालिकेने सीएसआर प्रकल्पांतर्गत खासगी क्षेत्रातील कंपन्यांबरोबर आणि स्थानिक नागरिक, सामाजिक संस्था यांच्यासमवेत संयुक्तपणे साप्ताहिक स्वच्छता मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ही मोहीम आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत आहे. याच अनुषंगाने आज पिंपरी चिंचवड महापालिका, महिंद्रा लॉजिस्टिक्स व क्रिएटिव्ह कुटीर फाऊंडेशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने अप्पू घर पार्किंग ते दुर्गा देवी मंदिर, सेक्टर २३ दुर्गा देवी टेकडी परिसरात विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. या उपक्रमात महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, आरोग्य निरीक्षक लक्ष्मण साळवे, महिंद्रा लॉजिस्टिक्सचे वरिष्ठ अधिकारी निंबा भांबरे, क्रिएटिव्ह कुटीर फाऊंडेशनचे शीतल उगले, विक्रम उगले, डॉ. सोनल बोंद्रे तसेच महापालिकेचे अन्य कर्मचारी देखील सहभागी झाले होते. याशिवाय शहरातली इतर प्रभागात देखील स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे.

## आनंद बुद्ध विहारात अभ्यासिकेचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रहाटणी :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त रहाटणीतील आनंद बुद्ध विहार येथील तक्षशिला ग्रंथालयात नव्याने उभारण्यात आलेल्या अभ्यासिकेचे उद्घाटन माजी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यासाठी आमदार शंकर जगताप आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

यापूर्वी आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते आनंद बुद्ध विहार याठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात आले होते. त्याच ग्रंथालयात या अभ्यासिकेचे उद्घाटन करण्यात आले. या अभ्यासिकेसाठी आमदार जगताप यांच्या वतीने ५०० स्पर्धा परीक्षेची पुस्तके भेट देण्यात आली आहे. तर अरुण पवार यांच्या वतीने संविधानाच्या प्रती भेट देण्यात आल्या आहेत.

> छत्रपती शाहू महाराज यांनी शिक्षण, समता आणि सामाजिक सुधारणांसाठी केलेल्या कार्याचा गौरव करत, या अभ्यासिकेच्या माध्यमातून स्थानिक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा आणि त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा देण्याचा उद्देश आहे. ही अभ्यासिका आधुनिक सुविधांनी सुसज्ज असून, विद्यार्थ्यांना शांत आणि प्रेरणादायी वातावरणात अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करून देईल.
> **— बाबासाहेब त्रिभुवन**



# ‘स्माईल सायक्लोथॉन’द्वारे व्यसनमुक्तीचा संदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथक आणि स्माईल व्यसनमुक्ती केंद्र, उर्से यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्माईल सायक्लोथॉन' सायकल रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले. या उपक्रमात ४०० हून अधिक सायकलस्वारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत व्यसनमुक्त जीवनाचा संदेश दिला.

सकाळी ६:३० वाजता पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयापासून रॅलीला सुरुवात झाली. सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे-१) विशाल हिरे यांनी हिरवा झेंडा दाखवत सायक्लोथॉनचे उद्घाटन केले. एकूण २१ किलोमीटरचा प्रवास करत ही रॅली स्माईल फाउंडेशन, उर्से गाव, पुणे येथे समाप्त झाली.



सायक्लोथॉनमध्ये नागरिक, सामाजिक संस्था प्रतिनिधी, व्यसनमुक्ती क्षेत्रातील कार्यकर्ते आणि फिटनेसप्रेमी सायकलस्वार यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. रस्त्यावरून जनजागृती करत व्यसनमुक्त जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले.

या उपक्रमास पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहआयुक्त शशिकांत महारनवर, अपर आयुक्त सारंग आवाड, उपायुक्त संदीप डोईफोडे, डॉ. शिवाजी पवार यांचे मार्गदर्शन लाभले. या अभियानात स्माईल व्यसनमुक्ती केंद्राचे संस्थापक हर्षल पंडित, सायकलिस्ट सुरज भाट, आयर्न मॅन कझाकस्तान धनराज हेळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राम गोमारे यांचे सहकार्य लाभले.

- कार्यक्रमाचा मुख्य उद्देश समाजात अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकू न देता, आरोग्यदायी आणि सशक्त जीवनाकडे लोकांचा कल वळविणे हा होता. पोलीस विभागाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, अशा उपक्रमांद्वारे पोलीस आणि नागरिक यांच्यातील संवाद आणि सहकार्य अधिक बळकट होत असल्याचे दिसून येते.

संपादकीय विशेष

# हिंदीविरोध जिंकला, पण...

२६ जून १९७५ रोजीच हिंदी ही राजभाषा प्रस्थापित करण्यासाठी स्थापन केलेल्या राजभाषा विभागाचा पन्नासावा वर्धापन दिन होता. त्याच वेळी महाराष्ट्र आणि कर्नाटकसह अनेक राज्यांमध्ये राजभाषेबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. लोकमान्य टिळक, काका कालेलकर आणि विनोबा भावे यासारख्या महान व्यक्तींनी राष्ट्रीय एकतेचा धागा हिंदीमध्ये पाहिला होता; मात्र आता त्यांच्याच महाराष्ट्रात हिंदीला विरोध करण्यासाठी साहित्यिक, नेते, कलावंत एकवटले आहेत. अर्थात त्यात त्यांचाही दोष आहे असे नाही. अगोदर त्रिभाषा सूत्राचा स्वीकार, नंतर हिंदीची सक्ती आणि आता ऐच्छिक अशा कोलांट उड्या सरकारने मारल्या. राज्यात हिंदीविरोधी वातावरण पेटण्यामागे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि गेल्या काही वर्षांमध्ये उत्तर भारतीयांची मुंबईत वाढलेली मुजोरी ही महत्त्वाची कारणे आहेत. दक्षिण भारतातील अन्य राज्यांमध्ये हिंदीला केवळ द्रविड आणि आर्य यांच्यातील भेदातून विरोध होत आहे. इतिहासाची मढी किती दिवस उकरून काढायची आणि देशाला जोडणारी किमान एक भाषा देशातील सर्वच राज्यांनी का स्वीकारू नये, असे प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात. दक्षिण भारतात जाणाऱ्या नागरिकांना इंग्रजी तसेच त्या राज्यांमधील कन्नड, तेलुगु, तमिळ अशा भाषा येत नसल्यास अडचण होते. रेल्वे स्थानके, बस स्थानक, विमानतळ, रिक्षा, हॉटेल, पर्यटनस्थळावर संबंधितांशी संवाद कसा साधायचा, असा प्रश्न पडतो. त्यामुळे अनेकदा लोक या राज्यांमध्ये जायचे टाळतात. त्याचा परिणाम या राज्यांच्या अर्थव्यवस्थेवर होतो.

महाराष्ट्रात तर पाचवीपासून हिंदी शिकवली जातेच. मग, आताच एवढे अकांडतांडव करण्याचे कारण नाही. उलट, हिंदी आणि मराठीची देवनागरी लिपी सारखीच असल्याने शिकायलाही सोपी आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रीय माणूस लवकर हिंदी शिकू शकतो. महाराष्ट्रातील लोक देशाच्या कानाकोपऱ्यात सहज विहार करतात. याचे कारण त्यांना समजत असलेली आणि मोडकी तोडकी का होईना, बोलता येत असलेली हिंदी हेच आहे. अर्थात महाराष्ट्रातील लोकांना हिंदी येते म्हणून त्यांच्याशी मराठीत संवादच साधायचा नाही, अशी मग्रूरीही सहन करता कामा नये. आपण जातो, व्यवसाय करुन पोट भरतो, राहतो, तिथली भाषा आली पाहिजे ही साधी अपेक्षा वावगी म्हणता येणार नाही. अलीकडेच, हिंदी दिवसानिमित्त, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले की देशाला एक करण्यासाठी काम करू शकणारी आणि सर्वात जास्त बोलली जाणारी हिंदी भाषाच आहे. ही टिप्पणी भारताच्या प्राचीन संस्कृतीचे जतन करताना आणि इंग्रजीला लादलेला वसाहतवादी वारसा म्हणून संबोधित करताना करण्यात आली होती. यामुळे 'एक राष्ट्र एक भाषे'च्या निमित्ताने हिंदी वापरण्यावर अलिकडे पुन्हा वाद सुरू झाला. भारतीय संविधान सभेने १४ सप्टेंबर १९४९ रोजी कलम ३४३(१) अंतर्गत इंग्रजीसह देवनागरी लिपीत लिहिलेली हिंदी देशाची अधिकृत भाषा म्हणून स्वीकारली.

कलम ३५१ केंद्र सरकारला हिंदी भाषेच्या विकासासाठी निर्देश जारी करण्याचा अधिकार देते. भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचीतील २२ भाषांपैकी हिंदी एक आहे. हिंदी भाषा लादण्यास अनेक बिगर-हिंदी भाषिक राज्यांमध्ये, विशेषतः दक्षिणेकडील तामिळनाडू राज्यात विरोध झाला. दक्षिण भारतात हिंसक निदर्शने झाली. त्यामुळे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी १९६३ मध्ये अधिकृत भाषा कायदा आणला. या कायद्याने भारतीय संघाच्या अधिकृत भाषा म्हणून इंग्रजीसह हिंदी चालू ठेवण्याची हमी दिली. १९६५ च्या हिंदीविरोधी निदर्शनांनी भारताच्या अधिकृत भाषा धोरणात एक महत्त्वाचा टप्पा गाठला. १९६७ मध्ये अधिकृत भाषा कायद्यात सुधारणा करण्यात आली. भारताची भाषिक विविधता पाहता कोणतीही राष्ट्रीय भाषा नाही, कारण सर्व राज्ये त्यांची स्वतःची अधिकृत भाषा निवडण्यास स्वतंत्र आहेत. २०११ च्या जनगणनेत देशात १,३६९ मातृभाषा होत्या. त्यापैकी हिंदी एक आहे. हिंदीवर प्रामुख्याने फारसी आणि नंतर इंग्रजीसह इतर भाषांचा प्रभाव पडला आहे. भाषांची गणना केली गेली, तेव्हा हिंदीमध्ये भोजपुरी समाविष्ट होती. ती पाच कोटींहून अधिक लोक बोलतात. जनगणनेनुसार भोजपुरी हा हिंदीचा एक उपसंच मानला जातो. भारतातील मोठ्या संख्येने लोक हिंदी बोलतात, हे खरे असू शकते; परंतु बरेच भारतीय ती बोलत नाहीत हेदेखील खरे आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की भाषिक विविधतेच्या तत्त्वाचे समर्थन करून संविधानाने आठव्या अनुसूचीमध्ये २२ भाषांना स्थान दिले आहे. राष्ट्रीय चळवळीतील अनेक नेत्यांनी हिंदीसाठी एक विशेष भूमिका मांडली होती. त्यापैकी बहुतेकांनी आजच्या काळात प्रसारित होणाऱ्या शुद्ध हिंदीऐवजी मिश्रित हिंदुस्तानी भाषेला पाठिंबा दिला; परंतु हे स्पष्ट होते, की ती लादली जाऊ शकत नाही. केंद्र सरकारच्या २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील त्रिभाषा सूत्रावरून आता देशभर, त्यातही महाराष्ट्रात वादंग माजले आहे; परंतु १९८६ च्या कोठारी आयोगाच्या शिफारशीतही त्रिभाषा सूत्राचा समावेश होता, याचा आपल्याला विसर पडला आहे. आज देशात सुमारे 35 टक्के लोक दररोज कामासाठी स्थलांतर करत आहेत. म्हणूनच आज मोठ्या शहरांसाठी बहुभाषिक ठिकाणे संपवणे आणि एकभाषिक वसाहती मिसळणे योग्य नाही. हिंदी किंवा इंग्रजी या एकाच दुव्याच्या भाषेची कल्पना भारतासाठी आर्थिकदृष्ट्या विनाशकारी ठरेल. यामुळे स्थलांतर कमी होईल आणि भांडवल प्रवाह आटेल. त्या वेळच्या पूर्व पाकिस्तानमध्ये बंगाली भाषिकांवर उर्दू लादण्याविरुद्धची भाषा चळवळ पाकिस्तानच्या दोन राष्ट्रांमध्ये फाळणीचे प्रमुख कारण बनली. त्यामुळे भारतातही भाषा लादण्याऐवजी स्वखुशीने स्वीकारली जाईल, यासाठी प्रयत्न करायला हवा. केरळने शेजारच्या राज्यांपेक्षा वेगळी भूमिका घेऊन हिंदीचा केलेला अंगीकार एक आदर्श म्हणून घ्यायला हवा.

कोठारी आयोगाने मांडलेल्या त्रिभाषा सूत्रातील शिफारशीनुसार बिगर-हिंदी भाषिक राज्यांमध्ये सुरुवातीपासूनच हिंदी भाषा लागू करावी आणि हिंदी भाषिक राज्यांनी बिगर-हिंदी भारतीय भाषा सुरू करावी. काही बिगर-हिंदी भाषिक राज्यांनी हिंदी भाषा सुरू केली असली, तरी दुर्दैवाने हिंदी भाषिक राज्यांनी बिगर-हिंदी भाषा शिकवण्याची गरज दुर्लक्षित केली. त्रिभाषा सूत्र हे एक चांगले सूत्र आहे; परंतु भाषेची निवड सरकारवर नाही, तर नागरिकांवर सोपवली पाहिजे. तसेच, भाषा लादण्यापेक्षा राष्ट्रीय एकता वाढवण्याचे मार्ग अवलंबले पाहिजेत.

# केरळचा आदर्श

**प्रत्येक राज्यातील धोरणकर्त्यांना आणि प्रशासनाला केरळच्या यशोगाथेतून शिकण्याची आणि स्वतःच्या राज्यात डिजिटल साक्षरता वाढवणारे कायदे, धोरणे आणि कार्यक्रम अंमलात आणण्याची प्रेरणा घेणे शक्य आहे. केरळने साक्षरतेपाठोपाठ घालून दिलेला डिजिटल साक्षरतेचा मापदंड देशाने राष्ट्रीय पातळीवर अनुकरणात आणण्याची गरज आहे. केरळने या क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा हा परिचय.**

राज्यरंग

व्ही. त्यागराजन

भारत हे एक विशाल आणि वैविध्यपूर्ण राष्ट्र आहे. ते डिजिटल युगाकडे वेगाने वाटचाल करत आहे. सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या 'डिजिटल इंडिया' सारख्या मोहिमा भारताला तांत्रिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. असे असले, तरी आजही देशातील बहुतेक ग्रामीण आणि मागास भागात डिजिटल साक्षरतेचा अभाव हा एक मोठा अडथळा आहे. केरळने मात्र पूर्ण डिजिटल साक्षरता प्राप्त करून या दिशेने एक अभूतपूर्व पाऊल टाकत देशासमोर एक उदाहरण ठेवले आहे. त्याची अधिकृत घोषणा अद्याप झाली नसली, तरी हे लक्षात घेण्यासारखे आहे की या मोहिमेत केरळ राज्याने सुमारे 21 लाख लोकांना डिजिटल साक्षर केले आहे. ही कामगिरी केवळ तांत्रिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर सामाजिक, आर्थिक, औद्योगिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे. केरळ राज्याचे हे मॉडेल संपूर्ण भारतात लागू केल्यास दूरगामी परिणाम दिसू शकतील आणि विकसित भारताच्या आपल्या स्वप्नाला पंख देऊ शकतील, असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. केरळने डिजिटल साक्षरता ही समाजातील प्रत्येक घटकाला सामावून घेणारी एक व्यापक आणि समावेशक मोहीम म्हणून हाती घेतली. हे काम स्वयंमदत गटांनी सुरू केले. ते डिजी केरळ प्रकल्पापासून सुरू झाले. त्याला देशातील पहिली ग्रामीण डिजिटल साक्षरता योजना म्हणता येईल. या योजनेअंतर्गत राज्यभरात 21 लाखांहून अधिक डिजिटल निरक्षर नागरिकांची ओळख पटवण्यात आली आणि त्यांना संगणक, इंटरनेट आणि डिजिटल सेवांमध्ये यशस्वीरित्या प्रशिक्षण देण्यात आले.

या अतुलनीय प्रयत्नातून राज्याच्या कानाकोपऱ्यात केवळ डिजिटल शिक्षण दिले जात नाही, तर सरकारच्या ई-गव्हर्नन्स सेवा सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यातही महत्त्वपूर्ण योगदान दिले जात आहे. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या मोहिमेत महिलांचा सहभाग लक्षणीय आहे. 'कुडुम्बश्री'सारख्या महिला सक्षमीकरण गटांना डिजिटल प्रशिक्षण देण्यात आले आणि त्यांच्या समुदायांमध्ये डिजिटल साक्षरता पसरवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. यामुळे केवळ तांत्रिक ज्ञान पसरले नाही, तर महिलांची सामाजिक भूमिकाही बळकट झाली. याशिवाय केरळने प्रत्येक वयोगटातील लोकांना हे ज्ञान आणि कौशल्ये मिळतील हे सुनिश्चित केले, मग ते विद्यार्थी असोत, गृहिणी असोत, मनरेगा कामगार असोत, शेतीत गुंतलेले तरुण असोत किंवा वृद्ध; केरळच्या या यशाचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्याचा उच्च साक्षरता दर आणि शिक्षणव्यवस्थेत तंत्रज्ञानाचा स्वीकार. निःसंशयपणे, राज्य सरकारच्या राजकीय इच्छाशक्तीनेही या मोहिमेला गती देण्यात मोठी भूमिका बजावली आहे. याशिवाय, सामाजिक सहभाग आणि तांत्रिक पायाभूत सुविधांची सहज उपलब्धता यामुळे या मोहिमेला जनआंदोलनाचे स्वरूप मिळाले. स्थानिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांनीही या प्रयत्नात उत्साहाने भाग घेतला.

आता प्रश्न असा आहे की हे मॉडेल संपूर्ण भारतात कसे राबवता येईल. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात एकच मॉडेल थेट राबवणे शक्य होणार नाही आणि योग्यही होणार नाही.

या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम प्रत्येक राज्याला त्यांच्या स्थानिक परिस्थितीनुसार हे मॉडेल तयार करावे लागेल. काही राज्यांमध्ये भौगोलिक अडथळे आहेत तर काहींमध्ये सामाजिक-कौटुंबिक परंपरा आहेत. हे सर्व लक्षात घेऊन डिजिटल शिक्षण कार्यक्रम तयार करावे लागतील. ग्रामीण भारतात अजूनही इंटरनेटची सुविधा मर्यादित आहे. त्यामुळे डिजिटल पायाभूत सुविधा आणखी मजबूत करणे आवश्यक आहे. त्यासाठी 'भारतनेट'सारख्या योजना जलद गतीने राबवाव्या लागतील. त्यामुळे प्रत्येक पंचायत स्तरावर ब्रॉडबँड सुविधा सहज उपलब्ध होईल. यासोबतच प्रत्येक जिल्हा आणि ब्लॉकमध्ये स्थानिक डिजिटल प्रशिक्षण केंद्रे स्थापन करावी लागतील. महिला, युवक आणि शेतकऱ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. विशेषतः महिला स्वयंसहाय्यता गट आणि अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करून त्यांच्या समुदायांमध्ये प्रशिक्षण कार्यात सहभागी करून घेता येईल. यामुळे समाजात डिजिटल जागरूकतेचे वातावरण निर्माण होईल आणि तंत्रज्ञानाचा समावेश जलद होईल. या मोहिमेत शैक्षणिक संस्थांचा सक्रिय सहभाग क्रांतिकारी ठरू शकतो. स्थानिक तांत्रिक संस्था वेळोवेळी त्यांच्या विद्यार्थ्यांना जवळच्या ग्रामीण भागात प्रशिक्षणासाठी प्रेरित करू शकतात. यामुळे तरुण विद्यार्थ्यांना त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव होईल. खासगी संस्था आणि गैरसरकारी संस्थांच्या सहकार्याने सार्वजनिक-खासगी भागीदारीअंतर्गत ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सरकारला दररोज नवोपक्रम करण्यासाठी जोरदार प्रयत्न करावे लागतील.

या मोहिमेसाठी तांत्रिक कौशल्ये, ज्ञान, सामग्री आणि संसाधनांच्या स्वरूपात खासगी क्षेत्र महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते. याशिवाय, डिजिटल साक्षरतेची सामग्री आणि संसाधने स्थानिक भाषांमध्ये उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे; जेणेकरून सामान्य नागरिक ते सहज समजू आणि वापरू शकतील. या प्रयत्नांमध्ये अंमलबजावणीचे निरीक्षण आणि मूल्यांकन करण्याची एक मजबूत व्यवस्था तयार करणे आवश्यक आहे. कोणत्याही राज्यात ही योजना तुलनेने मंद गतीने सुरू असल्यास वेळेत सुधारणात्मक पावले उचलण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. इतकेच नाही, तर लोकांच्या सामाजिक मानसिकतेत बदल घडवून आणण्याचीही गरज आहे. असे झाल्यास ते तंत्रज्ञान सहजपणे स्वीकारू शकतील. या प्रयत्नात निश्चितच काही आव्हाने असतील. काही राज्यांना संसाधनांचा अभाव जाणवू शकतो तर कुठे तरी तांत्रिक प्रशिक्षकांची उपलब्धता ही समस्या असू शकते. अनेक समुदायांमध्ये, वडीलधारी आणि रूढीवादी विचारसरणीमुळे तंत्रज्ञान स्वीकारण्यात अडचण येऊ शकते; परंतु सरकार, समाज, खासगी आणि इतर भागधारकांनी नियोजनबद्ध प्रयत्न केल्यास हे काम अशक्य नाही. केरळचे डिजिटल साक्षरता मॉडेल देशासाठी एक आदर्श उदाहरण आहे. 'डिजिटल इंडिया'च्या स्वप्नाला मूर्त स्वरूप द्यायचे असल्यास इतर राज्यांना केरळकडून शिकावे लागेल, स्थानिक गरजांनुसार योजना आखाव्या लागतील आणि समाजातील प्रत्येक घटकाच्या सहभागाने देशभर डिजिटल साक्षरतेच्या चळवळीचा प्रसार करावा लागेल. तरच भारत एक मजबूत आणि समावेशक डिजिटल राष्ट्र म्हणून पुढे जाऊ शकेल.

केरळने हे कसे साध्य केले, हा ही अभ्यासाचा विषय आहे. हे एकाएकी झाले नाही. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील महिलांवर विशेष भर देऊन विद्यार्थ्यांच्या साक्षरतेचे प्रमाण वाढवण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. आठ जिल्ह्यांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यात सुरू करण्यात आलेला हा व्यापक डिजिटल साक्षरता उपक्रम या उपेक्षित समुदायांना भेडसावणाऱ्या शैक्षणिक आणि सामाजिक-सांस्कृतिक असमानता दूर करण्यासाठी समर्पित आहे. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था आणि राज्य मुक्त आणि जीवनभर शिक्षण परिषद यासारख्या संस्थांचा सक्रिय सहभाग या प्रकल्पांमध्ये स्वीकारल्या जाणाऱ्या व्यापक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित करतो. पूर्ण डिजिटल साक्षरता साध्य करण्याच्या दिशेने केरळची प्रगती केवळ शिक्षणाप्रती असलेले त्यांचे समर्पण दर्शवत नाही, तर डिजिटल युगात व्यक्तींना सक्षम बनवण्यात तंत्रज्ञानाची महत्त्वाची भूमिकादेखील अधोरेखित करते. विधानसभेचे सदस्य केरळच्या यशोगाथेपासून प्रेरणा घेऊन आपल्या राज्यात डिजिटल साक्षरता वाढवणारी धोरणे आणि कार्यक्रम तयार करून अंमलात आणू शकतात. त्यामुळे डिजिटल सक्षमीकरणाच्या व्यापक राष्ट्रीय ध्येयात योगदान मिळेल. पूर्ण डिजिटल साक्षरता साध्य करण्याच्या केरळच्या वचनबद्धतेचा केवळ भारतातील मंत्री आणि आमदारांवरच नव्हे, तर संपूर्ण देशावर मोठा प्रभाव पडतो.

केंद्र सरकार विविध राज्यांच्या विविध गरजा लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणात डिजिटल असमानता दूर करणारे उपक्रम आखण्यासाठी केरळच्या मॉडेलपासून प्रेरणा घेऊ शकते. डिजिटल साक्षरता ही आर्थिक संधींशी आंतरिकरित्या जोडली आहे. डिजिटल कौशल्ये वाढवून व्यक्ती ई-कॉमर्स, ऑनलाइन फ्रीलान्सिंग आणि रिमोट वर्कसह डिजिटल अर्थव्यवस्थेत सहभागी होण्यासाठी अधिक सुसज्ज असतात. केरळच्या उपक्रमांची प्रतिकृती बनवून राज्यातील नेते अशा आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देऊ शकतात. डिजिटल साक्षरतेवर अधिक लक्ष केंद्रित केल्याने भारतातील शैक्षणिक क्षेत्राला लक्षणीय फायदा होईल.

खेचाखेची

## नुकतंच शिकलोय!

कुणाला हार्टचं ऑपरेशन कमी खर्चात करायचं असेल तर सांगा...

.

.

.

.

मी कालच 'यू ट्युब' वर बघून शिकलोय!

सुप्रभात

वेगळं काही

अमेरिकेतल्या कंसासमधल्या गुडमॅन दांपत्याने आपल्या पाच वर्षांच्या मुलाला एका लग्नाच्या रिसेप्शनला नेलं. या ठिकाणी ठेवलेली एक एक मूर्ती सुंदर आणि मौल्यवानही होती. ही मूर्ती या मुलाला खूप आवडली. त्यामुळे तो तिला स्पर्श करण्याचा प्रयत्न करत होता. या प्रयत्नात ती जमिनीवर पडली आणि फुटली. यावेळी मुलालाही थोडं लागलं. हे प्रकरण त्याच्या पालकांच्या अंगावर चांगलंच शेकलं आहे. या घटनेनंतर विमा कंपनीने त्याच्या पालकांकडून एक लाख ३२ हजार अमेरिकन डॉलर भरपाईची मागणी केली आहे. आई-वडिलांच्या चुकीमुळे हे घडल्याचं विमा कंपनीचं म्हणणं आहे. तर आई-वडिलांनी आयोजकांना दोषी ठरवलं आहे.


फॅशन पॅशन

## मेकओव्हर जुन्या कुर्त्यांचा



वॉर्डरोबमध्ये वापरात नसणारे कुर्ते पडून राहिले असतील तर हुशारीने ते वापरायोग्य बनवता येतील.

* दोन कुर्त्यांचं कॉंबो- पडून असलेले दोन कॉंट्रास्ट रंगांचे कुर्ते घ्या. एका कुर्त्याचा कमरेच्या वरचा भाग उसवून घ्या तर दुसऱ्या कुर्त्याच्या कमरेचा खालचा भाग उसवून घ्या. हे दोन्ही वेगळे केलेले भाग एकत्र करा. अशा प्रकारे एक नवा कुर्ता तयार होईल. कॉंट्रास्ट कॉम्बिनेशन नसेल तर एकमेकांना शोभतील अशा रंगांच्या कुर्त्यांची निवड करा. * शॉर्ट ड्रेस- कुर्त्यापासून शॉर्ट ड्रेसही बनवू शकता. यासाठी शक्यतो कॉटन किंवा सिल्कचे कुर्ते उपयोगी पडतात. यासाठी स्लिट्स किंवा साईड कट नसणारे कुर्ते उपयोगी पडतात. या ड्रेसवर बेल्टचा वापर करून एलिगंट लूक देऊ शकता. * स्टायलिश ब्लाऊज- आजकाल ब्लाऊजसोबत अनेक एक्सपिरिमेंट केले जात आहेत. शर्टब्लाऊज हा त्यातलाच लोकप्रिय प्रकार आहे. तुमचा शॉर्ट कुर्ताही या कामी उपयोगात येऊ शकतो. कलेक्शनमधील स्ट्रेट फिट कुर्ता या कामी उपयोगी पडू शकतो. * जॅकेट बनवा- जुन्या कुर्त्यापासून स्टायालिश जॅकेट बनवून तुम्ही वेगळा लूक मिळवू शकता.




राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या बाबीचा साक्षात्कार होईल. उत्पन्नात मनाजोगी वाढ होत राहील. प्रवास लाभदायक ठरेल.
- **वृषभ** : अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. इतरांकडून फार अपेक्षा ठेवू नका. मानसिक तणाव राहील.
- **मिथुन** : अडकलेली रक्कम वसूल होईल. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. शारीरिक थकवा जाणवेल.
- **कर्क** : किंमती वस्तुंची काळजी घ्यावी. महत्त्वाच्या योजना मार्गी लागतील. कार्यक्षेत्रात प्रगती साधाल.
- **सिंह** : उत्तम धनप्राप्ती होईल. एखाद्या धार्मिक स्थळाची यात्रा घडेल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कन्या** : हितशत्रूंपासून सावध रहावं. वाहन, मशिनरी, आगीपासून सावध असावं. प्रकृतीची काळजी घ्या.
- **तूळ** : सरकारी कामात यश मिळेल. उद्योग-व्यवसायात अनुकूलता राहील. भावंडांचं योग्य सहकार्य राहील.
- **वृश्चिक** : अडचणींचा सामना करावा लागेल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात काळजी घ्यावी. विचारानं रहावं.
- **धनु** : पार्टी किंवा पिकनिकचा बेत ठरू शकेल. बौध्दीक कार्यात यश मिळेल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मकर** : बोलताना शब्दांचा वापर जपून करा. मोठी समस्या निर्माण होऊ शकते. प्रवास शक्यतो टाळावा.
- **कुंभ** : लाभाच्या संधी प्राप्त होतील. महत्त्वाच्या कामांना अनुकूलता राहील. अनुभवींचा सल्ला अवश्य घ्या.
- **मीन** : नव्या ओळखी होतील. घरात पाहुण्यांची वर्दळ राहील. अपेक्षित वार्तेन समाधान लाभणार आहे.

स्किन केअर

## पावसाळ्यात घ्या पावलांची काळजी

* लिंबाचा रस- लिंबू पदार्थाला चव देण्यापासून ते सौंदर्यवर्धनापर्यंत अनेक भूमिका बजावतं. कोमट पाण्यात लिंबाचा रस मिसळावा. या मिश्रणात काही वेळ पाय बुडवून ठेवावेत. काही वेळाने रगडून साफ करावेत. यामुळे पाय स्वच्छ होण्यास मदत होईल.

* संत्र्यांचा रस- हा रस केवळ सेवनासाठीच नाही तर त्वचेच्या आरोग्यासाठीही उपयुक्त आहे. यामुळे पायाला काही काळ संत्र्यांचा रस लावावा. सुकल्यावर कोमट पाण्याने धुवून टाकावा. यामुळे पायाला येणारी दुर्गंधी दूर होण्यास मदत होते.

* मध- पायाची त्वचा कोरडी असेल तर भेगा पडून संसर्ग होण्याची शक्यता बळावते. अशा वेळी पायाची त्वचा हायड्रेट ठेवण्यासाठी मधाचा वापर करता येणं शक्य आहे.

* मीठ- घरात मोठं मीठ किंवा खड्याचं मीठ असेल तर त्याने पावलांना मसाज करावा. त्यामुळे पावलांना आराम मिळतोच याशिवाय स्वच्छ होण्यास मदत होते.

## १ जुलै

दिनविशेष

१९८९ : शिक्षणतज्ज्ञ ग. ह. पाटील यांचं निधन.
२०१३ : आशियाई ॲथलेटिक्स संघटना अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सुरेश कलमाडी यांचा पराभव.
२०१७ : देशभरात वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू.
२०१८ : चीनलाही माऱ्याच्या टप्प्यात आणणारी 'अग्नी ५' ही आंतरखंडीय बॅलेस्टिक क्षेपणास्त्र यंत्रणा लष्करात समाविष्ट करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आल्याची माहिती.

स्टडी टिप्स

## अशा काढा नोट्स

छोट्या मित्रमैत्रिणींनो, नोट्स काढण्याच्या दोन पद्धती आहेत. पहिली म्हणजे कॉर्नेल पद्धत आणि दुसरी म्हणजे मॅपिंग पद्धत. कॉर्नेल पद्धतीत नोट्सची विभागणी तीन विभागांमध्ये केलेली असते. पहिल्या विभागात वर्गात शिकवताना काढलेल्या नोट्स असतात. दुसऱ्या भागात नोट्स वाचल्यानंतर लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे नमूद करायचे असतात. तिसऱ्या आणि सर्वात मोठ्या भागात नोट्सचं सार लिहायचं तसंच मुख्य मुद्दे अधोरेखित करायचे असतात. मॅपिंग पद्धतीत विविध विषयांचे एकमेकांशी असलेले संबंध जाणून घेता येतात. या पद्धतीत विषयानुसार पान लावावं लागतं. इथे मुख्य विषयांची विभागणी उपविषयांमध्ये केली जाईल. इथे सविस्तर माहिती लिहिली जाईल. या पद्धतीने नोट्स काढण्यासाठी वर्गात मुख्य विषयाने मॅपची सुरूवात करा. त्यानंतर त्याची विभागणी उपविषयांमध्ये करा. प्रत्येक विषयाला हेडिंग द्या. त्यानंतर त्या खाली नोट्स आणि विषयाशी संबंधित महत्त्वाची माहिती लिहा. या पद्धतीने काढलेल्या नोट्स परीक्षेत नक्कीच उपयुक्त ठरतील.

पंचांग

**मंगळवार, १ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
आषाढ शु. ६, नक्षत्र : पू. फाल्गुनी
चंद्रराशी : सिंह, योग : व्यतिपात
सूर्योदय: ६.०७, सूर्यास्त: ७.१८

फॉरवर्डस

**उड़ ग़ये परिन्दें उनका मलाल क्यों करता हैं...**

**यहाँ तों पाले हुयें भीं ग़ैरों क़ी छतों पर उतरतें हैं....!**

आरोग्यमंत्र

## गुडघे कुरकुरतात?



वैद्यकशास्त्रातील प्रगतीमुळे सध्या गुडघ्यावरील उपचार यशस्वी होण्याचं प्रमाण वाढू लागलं आहे. प्रगत उपचारांमुळे आता पूर्ण सांधा बदलणंही शक्य झालेलं आहे. यापैकी काही शस्त्रक्रिया दुर्बिणीच्या मदतीने केल्या जातात. प्रत्यक्ष शस्त्रक्रियेपूर्वी गुडघ्याच्या आतला आणि बाहेरचा असे दोन प्रमुख भाग तपासले जातात. गुडघ्याच्या वाटीतला अंतर्भाग खराब झाला असेल तर सांधेबदलाच्या शस्त्रक्रियेला पर्याय नसतो. मात्र गुडघ्याच्या अंतर्भागातील वरचा थर सुस्थितीत असेल तर रशियनपद्धतीची शस्त्रक्रिया करून गुडघा वाचवता येतो. एखाद्या प्रसंगी सांधेबदलाची शस्त्रक्रिया करावी लागते. मात्र, अत्याधुनिक रशियन तंत्रामुळे सांधेबदलानंतर रुग्ण तिसऱ्याच दिवशी हिंडू-फिरु लागतो. गुडघ्यावरील शस्त्रक्रिया करण्याच्या दोन पद्धती आहेत. एका पद्धतीत गुडघ्याभोवती प्लॅस्टर घातलं जातं तर दुसऱ्या पद्धतीत रशियन फिक्सेटर या उपकरणाचा वापर केला जातो. या उपकरणाच्या साह्याने वाकडा पाय सरळ करणंही शक्य होत आहे. विशेष म्हणजे रशियन फिक्सेटरच्या मदतीने केलेल्या शस्त्रक्रियेनंतर गुडघ्याभोवती प्लॅस्टर घालावं लागत नाही. उपचार पार पडल्यानंतर तिसऱ्या-चौथ्या दिवशीच रुग्णाला गुडघ्यात पाय वाकवणं शक्य होतं. वाकडा पाय सरळ करण्याची प्रक्रिया शस्त्रक्रियेनंतर पार पडत असल्याने उपचारात अधिक नेमकेपणा येतो. गुडघ्यावरील उपचारात टिश्यू इंजिनिअरिंगचं तंत्र अवतरलं आहे. त्याच्या साह्याने गुडघ्यावरील आवरण नव्याने निर्माण करणं शक्य होत आहे.

फॅशन पॅशन

दोस्तांनो, व्हाईट स्नीकर्स घेऊन या. पांढरा रंग दुसऱ्या कोणत्याही रंगासोबत चालून जातो. तसंच फॅशनबाबत तुमच्याकडून कोणतीही चूक होत नाही. त्यामुळे बेसिक व्हाईट स्नीकरची किमान एक जोडी तुमच्याकडे असायलाच हवी. व्हाईट स्नीकर्स कोणत्या आउटफिटसोबत कसे कॅरी करायचे याबाबतच्या टिप्स...


* प्लेन व्हाईट टी शर्ट, ग्रे डेनिमसोबत व्हाईट स्नीकर्स घाला. आपला लूक खूपच साधा आहे याचा विचार करू नका. कारण आजच्या जगात साधेपणालाच जास्त महत्त्व आलंय. **क्रमशः**

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांना दिलासा



**नवी दिल्ली :** इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भ्रष्टाचाराच्या प्रकरणात केलेल्या टिप्पणीनंतर, इस्रायलच्या न्यायालयाने पंतप्रधान नेतन्याहू यांच्याविरुद्धची सुनावणी पुढे ढकलली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी सोशल मीडियाद्वारे याची पुष्टी केली आहे. बेंजामिन नेतान्याहू यांच्याविरुद्धचा हा खटला गेल्या ४ वर्षांपासून सुरू आहे. नेतन्याहू यांच्यावर तीन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये लाचखोरी, फसवणूक आणि विश्वासघाताचा आरोप आहे. सध्या, अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी हा खटला बंद करण्याची मागणी केल्यानंतर काही तासांनी न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलली आहे. जेरुसलेमच्या जिल्हा न्यायालयाने एका टिप्पणीत,"नेतान्याहू यांना पुढील दोन आठवड्यांसाठी साक्ष देण्यापासून सूट देण्यात आली आहे, याचे कारण राजनैतिक आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या चिंता" असल्याचे सांगितले आहे. न्यायाधीशांनी इस्रायली पंतप्रधानांची सुनावणी पुढे ढकलण्याची वारंवार केलेली मागणी फेटाळून लावल्यानंतर दोन दिवसांनी हा आदेश आला.

# हा करार भारताच्या हिताचाच : सीतारामन

## अमेरिकेच्या आश्वासनावर दिली प्रतिक्रिया

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या आठवड्यात नवी दिल्लीसोबतचा अंतरिम द्विपक्षीय व्यापार करार (बीटीए) भारतीय बाजारपेठ अमेरिकेसाठी 'उघडा' करेल या विधानावर प्रतिक्रिया देताना, अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी "हो, आम्हाला एक मोठा, चांगला, सुंदर करार करायला आवडेल का नाही?" असे म्हटले आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेत येताच जगभरात परस्पर शुल्क लादून खळबळ उडवून दिली. परंतु कर युद्धाचा अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आणि वेगवेगळ्या देशांच्या सरकारांशी वाटाघाटी झाल्यानंतर, या शुल्काच्या अंमलबजावणीची तारीख वाढवण्यात येऊन ट्रम्प यांनी काही काळासाठी दिलासा दिला. भारतासाठी परस्पर शुल्काची अंतिम मुदत ९ जुलै होती. आता अमेरिकेचा परस्पर शुल्क टाळण्यासाठी ९ जुलैची अंतिम मुदत जवळ येत असताना, भारत सरकारने जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेशी एक निर्बाध करार करण्याचे संकेत दिले आहेत. परंतु त्याच वेळी, भारतातील शेतकरी आणि पशुपालकांचे सर्वोत्तम हित सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या लाल रेषा आखण्याची स्पष्ट वचनबद्धता देखील व्यक्त केली आहे.

माध्यमांशी बोलताना अर्थमंत्री सीतारामन म्हणाल्या, "आपण ज्या टप्प्यावर आहोत, आणि २०४७ पर्यंत विकसित भारत बनण्याची आपली विकासाची उद्दिष्टे आणि महत्त्वाकांक्षा पाहता, मजबूत अर्थव्यवस्थांसोबत आपण जितक्या लवकर असे करार करू तितकेच ते आपल्याला चांगले सेवा देतील." अर्थमंत्र्यांच्या मते, कृषी आणि दुग्धव्यवसाय ही "खूप मोठ्या लाल रेषांपैकी" एक आहे जिथे अमेरिकेसोबत वाटाघाटी दरम्यान उच्च पातळीची खबरदारी घेतली गेली आहे.

खासगी क्षेत्राकडून गुंतवणुकीत मंदावल्याच्या कथित घटनेवर, त्या म्हणाल्या की, "गोष्टी चांगल्यासाठी बदलू लागल्या आहेत. "किमान गेल्या सहा महिन्यांत, खाजगी गुंतवणूक आणि क्षमता विस्तार होत असल्याचे स्पष्ट संकेत आहेत..." खाजगी कंपन्यांकडे निश्चितच अतिरिक्त रोख रक्कम आहे आणि त्या कदाचित निष्क्रिय उत्पन्न मिळवत आहेत. परंतु आपल्याला बदलाची चिन्हे दिसत आहेत." शहरी मंदी दूर करण्यासाठी सरकार काय करणार आहे असे विचारले असता, सीतारमण म्हणाल्या की, भावना निश्चितच बदलत आहे. "एप्रिलपासून, (सकारात्मक ग्राहक) भावना (आयकर सवलतींमुळे) स्पष्टपणे दिसून येत आहेत," असे त्या म्हणाल्या.



# लष्कराने दहशतवाद्यांचा मोठा कट हाणून पाडला

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दोन महिन्यांनंतर लष्कराने दहशतवाद्यांचा मोठा कट हाणून पाडला आहे. पूंछ आणि राजौरी जिल्ह्यांच्या सीमेवर नियंत्रण रेषेवर घुसखोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका पाकिस्तानी नागरिकाची ओळख दहशतवाद्यांचा मार्गदर्शक म्हणून करण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी सोमवारी ही माहिती दिली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहम्मद आरिफ असे या व्यक्तीचे नाव असून तो जैश-ए-मोहम्मदच्या चार दहशतवाद्यांसह भारताच्या हद्दीत घुसखोरी करण्याच्या प्रयत्नात होता.

लष्कराच्या जवानांनी रविवारी दुपारी या व्यक्तीला अटक केली. त्याचवेळी त्याच्यासोबत असलेल्या दहशतवाद्यांनी एका उंच टेकडीवरून उडी मारली आणि जखमी अवस्थेत पाकिस्तानी सीमेवर परतले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरिफ हा पाकव्याप्त काश्मीरमधील दातोटे गावचा रहिवासी आहे. आरिफच्या ताब्यातून एक मोबाइल फोन आणि सुमारे २० हजार रुपये पाकिस्तानी चलन जप्त करण्यात आले आहे.

चौकशीदरम्यान त्याने आपण पाकव्याप्त काश्मीरचा रहिवासी असून त्याला या भागाचे चांगले भौगोलिक ज्ञान असल्याचे सांगितले. पाकिस्तानी लष्कराच्या सांगण्यावरून तो दहशतवाद्यांना भारतात घुसखोरी करण्यास मदत करत होता. अधिकाऱ्यांनी सांगितले की, दहशतवाद्याची सविस्तर चौकशी केली जात आहे. चौकशीत काही महत्त्वाची गुप्तचर माहिती मिळू शकते.

तत्पूर्वी, घनदाट जंगलात संशयास्पद हालचाली अधिकाऱ्यांना दिसल्या होत्या, जिथून काही दहशतवादी घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत होते. आरिफला लष्कराने पकडले, तर अन्य चार दहशतवादी लष्कराच्या जवानांना पाहून पळून गेले आणि नो मॅन्स लँडमार्गे पाकिस्तानच्या बाजूने परतले. ड्रोनमधून काढलेल्या व्हिडिओमध्ये रक्ताचे डाग दिसत आहेत, ज्यावरून असे दिसून येते की, उंच टेकडीवरून उडी मारून आणि पडून दहशतवादी जखमी झाले आहेत.

### भारतीय लष्कराचे यश

● या मोहिमेच्या यशानंतर लष्कराने म्हटले आहे की, घुसखोरीविरोधी ही यशस्वी मोहीम भारतीय लष्कराचा अदम्य निर्धार आणि कार्यक्षमता दर्शवते. आपल्या सीमेचे रक्षण करण्यासाठी घुसखोरीचे सर्व प्रयत्न हाणून पाडण्याची भारताची वचनबद्धता अविरत पणे सुरू राहील, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

# राहुरीत ७० लाखांच्या बनावट नोटा जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राहुरी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी पोलिसांनी बनावट नोटा प्रकरणाचे रॅकेट उघड केले आहे. या मोठ्या कारवाईत तिघा आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून बनावट नोटा तयार करण्याचे साहित्य, मशिन्स आणि एकूण ७० लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राहुरीत बनावट नोटांचा सापडल्याने एकच खळबळ उडाली असून पोलिसांच्या या कारवाईचे कौतुक होत आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, २८ जून रोजी रात्री राहुरी शहर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना गोपनीय माहिती मिळाली की काही संशयित व्यक्ती होंडा शाईन दुचाकी नंबर एम एच ४५ वाय ४८३३ही मोटरसायकल घेऊन अहिल्यानगरकडून राहुरीकडे भारतीय चलनाच्या नकली नोटा बाळगून येत आहे. त्यानुसार पोलिसांनी राहुरी शहरातील संत गाडगेबाबा विद्यालय समोर सापळा लावला.

संशयित इसम पप्पू उर्फ प्रतीक भारत पवार, राजेंद्र कोंडीबा चौगुले, तात्या विश्वनाथ हजारे यांना ताब्यात घेऊन दोन शासकीय पंचांसमक्ष झडती घेतली असता त्यांच्या अंगझडतीत मोबाईल व भारतीय चलनाच्या हुबेहूब दिसणा-या नोटा मिळून आल्या आहेत. पोलिस निरीक्षक यांनी लगेच ॲक्सिस बँक मॅनेजर कैलास वाणी यांना बोलावून सदर नोटा तपासल्या असता त्या बनावट असल्याचे निष्पन्न झाले.

# हे लोक दहशतवाद्यांना संरक्षण देणारे

## सुधांशू त्रिवेदींचा इंडिया आघाडीवर निशाणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भाजप खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी 'इंडिया' आघाडीवर निशाणा साधला आहे. त्रिवेदी यांनी नुकतेच तेजस्वी यादव यांनी वक्फ सुधारणा कायद्यावरील विधानावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. सुधांशु त्रिवेदी यांनी,"बाबा साहेबांच्या संविधानाची खिल्ली उडवली जात आहे. हा राम मनोहर लोहिया, जयप्रकाश यांचा समाजवाद होता का? भाजप आणि जेडीयू समाजवादाच्या बाजूने उभे आहेत. आरजेडी आणि सपा सारखे पक्ष नमाजवादाच्या बाजूने उभे आहेत. जर त्यांचे सरकार आले तर ते शरिया लागू करतील. हे लोक दहशतवाद्यांना संरक्षण देणार आहेत." असे म्हणाले आहेत.

काँग्रेस सरकारने शरियाला संविधानापेक्षा वर ठेवले होते. याद्वारे ते मागास दलित, वंचित आणि शोषितांचे आरक्षण खाऊ इच्छितात. एएमयू, जामियामध्ये एससी एसटी ओबीसीचे आरक्षण रद्द करण्यात आले. जम्मू आणि काश्मीरमध्ये कलम ३७० लागू करून एससी, एसटी, ओबीसीचे आरक्षण रद्द करण्यात आले. हे पक्ष मागच्या दाराने आरक्षण तोडण्याचे काम करत आहेत. बंगालमध्ये मुस्लिम जातींना ओबीसीमध्ये समाविष्ट करण्यात आले. कर्नाटकातही मुस्लिमांना ओबीसी आरक्षण दिले जात आहे. ही मुल्ला मौलवींची नमाज आहे.

सुधांशू त्रिवेदी यांनी, "तेजस्वी यादव यांनी वक्फबद्दल सांगावे, त्यांनी संसदेत लालूजींचे विधान पहावे. वक्फच्या जमिनीवर किती रुग्णालये, महाविद्यालये, संस्था आहेत ते सांगा. ते कोणता अल्पसंख्याक आहे हे मोजतात. आम्ही त्यानुसार बोलतो. वक्फ बोर्डाने यमुना नगरमधील गुरुद्वारावर दावा केला होता, कोणीही काहीही सांगितले नाही." असे म्हटले आहे.

भाजप खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी सोमवारी माध्यमांशी बोलताना,"थेट विरोधकांवर हल्ला चढवला आणि म्हटले की वक्फ दुरुस्ती कायदा आता संसदेने मंजूर केलेला आणि राष्ट्रपतींनी मंजूर केलेला कायदा आहे. तो आता सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे आणि अलाहाबाद आणि कलकत्ता उच्च न्यायालयाचे अनेक निर्णय या कायद्याच्या समर्थनार्थ आहेत." असे म्हटले आहे.

## मान्यवरांचा सन्मान...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**मुंबई** महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या प्रारंभी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा राज्य शासनातील मान्यवर मंत्र्यांनी सन्मान केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही पुष्पगुच्छ देत सभापती आणि उपसभापती यांना औपचारिक शुभेच्छा दिल्या.

पान १ वरून

### महाराष्ट्रात भाजपला नवा प्रदेशाध्यक्ष

चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजप कशी वाटचाल करेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्याचेही कौतुक केले. "बावनकुळे यांनी पक्षाची संघटना मजबूत केली. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने १.५ कोटी नवीन सदस्य जोडले आणि विधानसभा निवडणुकीत दणदणीत यश मिळवले," असे फडणवीस म्हणाले. बावनकुळे यांना महायुती २.० सरकारमध्ये महसूलमंत्री म्हणून नियुक्ती झाल्याने प्रदेशाध्यक्षपद रिक्त झाले होते. यानंतर चव्हाण यांना जानेवारी २०२५ मध्ये कार्यकारी प्रदेशाध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले होते, जे आता पूर्णवेळ प्रदेशाध्यक्षपदाकडे वाटचाल करत आहेत.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांची या निवड प्रक्रियेसाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. रिजिजू यांच्या उपस्थितीत चव्हाण यांनी आज आपला अर्ज दाखल केला. पक्षाच्या परंपरेनुसार, प्रदेशाध्यक्षपदासाठी अर्ज मागवले जातात आणि निवडणूक प्रक्रियेनंतर उमेदवाराच्या नावावर शिक्कामोर्तब केले जाते. येत्या १ जुलै रोजी मुंबईत होणाऱ्या समारंभात चव्हाण यांच्या नावाची अधिकृत घोषणा होईल, अशी माहिती पक्षाने दिली आहे.

### रोहित पवारांना जामखेड बाजार...

शेतकऱ्यांच्या सुविधांकडे दुर्लक्ष करणे आणि समितीच्या आर्थिक उन्नतीसाठी कोणतीही उपाययोजना न करणे असे आरोप आहेत. विशेषतः, सरकारने ठरवलेल्या किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने खरेदी-विक्री होऊ नये यासाठी कोणतेही प्रयत्न न केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या प्रस्तावात शरद कार्ले, सचिन घुमरे, नंदकुमार गोरे, अंकुश ढवळे, विष्णू भोंडवे, गौतम उतेकर, गणेश जगताप, वैजिनाथ पाटील, राहुल बेदमुथ्था, रवींद्र हलगुंडे, सीताराम ससाणे आणि नारायण जायभाय यांनी सहभाग घेतला आहे. त्यांनी वराट यांनी सदस्यांचा विश्वास गमावल्याचे सांगत त्यांना उपसभापतीपदावरून हटवण्यासाठी विशेष सभा बोलावण्याची मागणी केली आहे.

कायदेशीर प्रक्रिया काय?

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ नुसार, जिल्हाधिकाऱ्यांना अविश्वास प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विशेष सभा आयोजित करून सदस्यांच्या मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल. यामुळे जामखेड बाजार समितीतील राजकीय घडामोडींना आणखी वेग येण्याची शक्यता आहे.

### शक्ती कायद्यावरून देशमुखांचा हल्लाबोल

परिषदेत ते बोलत होते. देशमुख म्हणाले, "मी गृहमंत्री असताना २०२० मध्ये शक्ती कायदा तयार केला होता. यामागे उद्देश महिलांना आणि मुलींना संरक्षण देण्याचा होता. मात्र, नंतर आमचे सरकार गेले. केंद्र सरकारने राज्य सरकारला सांगितले होते की, कायदा मंजूर करण्यासाठी समिती तयार करावी आणि अहवाल पाठवावा. मात्र, महायुती सरकारने वर्षभर या विषयाकडे दुर्लक्ष केले. आता सरकारने समिती गठीत केली असली तरी अहवाल पाठवायला अजून वेळ लागू नये." देशमुख म्हणाले, "महाराष्ट्राचे गृहमंत्री हेच मुख्यमंत्री आहेत. अशा महत्त्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष करणे हे दुर्दैवी आहे. समितीचा अहवाल केंद्र सरकारला लवकरात लवकर पाठवावा, जेणेकरून राज्यात कायदा लागू करता येईल आणि महिला अत्याचाराच्या घटना कमी होतील. शक्ती कायद्याच्या संदर्भात तात्काळ बैठक घेऊन निर्णय घ्यावा."

### मुंबईत काँग्रेसचा स्वबळाचा नारा?

गरज पडल्यास आघाडी

या सर्व शक्यता लक्षात घेता, काँग्रेसने निवडणुकीपूर्वी स्वतंत्रपणे लढून आपली ताकद आजमावण्याचा आणि निकालानंतर गरज पडल्यास आघाडी करण्याचा विचार सुरू केला आहे. विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी मुंबईतील पदाधिकाऱ्यांना स्वबळावर लढण्याच्या तयारीला लागण्याचे निर्देश दिले आहेत.

### विरोधी पक्षनेताच नाही

आहे. विधानसभेतील विरोधी पक्षनेतेसंदर्भात विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर हे निर्णय घेऊ शकतात. यामुळे विरोधकांची नार्वेकरांकडे वा-या वाढल्या आहेत. पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ठाकरे गटाच्या नेत्यांनी राहुल नार्वेकर यांची भेट घेतली आहे. शिवसेनेकडून पक्ष कार्यालय देण्याची मागणी राहुल नार्वेकर यांच्याकडे केली आहे. त्याचबरोबर विरोधी पक्षनेते पदाबाबत देखील ठाकरे गटाने अध्यक्ष नार्वेकर यांच्याकडे मागणी केली का याची सर्वांना उत्सुकता लागली आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते पद देखील ठाकरे गटाकडे आहे. ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे हे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आहेत. विरोधी पक्षनेता हा जनतेचे प्रश्न आक्रमकपणे भूमिका मांडून सोडवण्याचे प्रयत्न करत असतो. सत्ताधारी नेत्यांकडून योग्य निर्णय आणि कामकाज करुन घेण्यासाठी विरोधी पक्षनेता महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. मात्र महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये अद्याप विरोधी पक्षनेता ठरवण्यात आलेला नाही. यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला एकतर्फी असे प्रचंड बहुमत मिळाले असल्याने अद्याप याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही. सुदृढ लोकशाहीसाठी आणि जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी विरोधी पक्षनेता पद महायुती सरकारने सामंजस्याने हे पद देण्याची आवश्यकता होती.

### ५ जुलै रोजी विजयी मेळावा

पक्ष, उद्धव ठाकरेंची शिवसेना, शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांनीदेखील पाठिंबा दिला. आधी ६ तारीख होती मग ५ तारीख केली. न भूतो असा मोर्चा निघाला असता. पण आता मोर्चा रद्द झाला असून विजयी मेळावा होईल. सरकार परत अशा भानगडीत पडणार नाही, अशी आशा बाळगतो, असेही राज ठाकरे म्हणाले.

मला संजय राऊत यांचा कॉल आला की विजयी मेळावा करावा. तो मेळावा जरी झाला तरी त्यात राजकीय लेबल लावायचे नाही. कारण तो मराठी माणसांचा मेळावा आहे. मराठी भाषा या विषयावर कोणाकडूनही तडजोड होता कामा नये. त्यासाठी सतर्क राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

# ठाकरे बंधूंनी एकत्र यावं, क्रिकेट खेळावं

**मुंबई :** राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्यासंदर्भात काढण्यात आलेले शासन निर्णय राज्य शासनाने रद्द केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली होती. या निर्णयामुळे ठाकरे बंधूंनी या विषयावर काढलेला मोर्चा रद्द झाला असून, आता ते विजयी मोर्चा काढणार असल्याची माहिती उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत दिली होती. यावेळी उद्धव ठाकरे यांनी फडणवीसांवर जोरदार टीका केली. तसेच, संजय राऊतांनीही सरकारला धारेवर धरले होते. तसेच, दोन भाऊ एकत्र येत आहेत तर तुमच्या पोटात का दुखतंय, असंही म्हटलं होतं.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत म्हणाले की, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांच्या जवळच्या नेत्यानेच हिंदी भाषेची सक्ती करण्याची शिफारस केली होती.

### मुख्य सचिवपदी राजेशकुमार...

केली जातील. सैनिक यांच्या निवृत्तीनंतर सचिवपदासाठी मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगरानी, गृह विभागाचे अपर सचिव इक्बालसिंग चहल यांच्या नावाची चर्चा होती. पण सेवा ज्येष्ठतेनुसार, राजेशकुमार मीना यांना संधी मिळाली आहे. राजेशकुमार मीना हे १९८८ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. पण राजेशकुमार यांना केवळ दोन महिन्यांचा कार्यकाळ मिळण्याची शक्यता आहे. याचे कारण म्हणजे ऑगस्ट २०२५ मध्ये ते निवृत्त होत आहेत. राज्य सरकारकडून मुदतवाढ मिळाली तर ते त्या पदावर कायम राहू शकतात.

### जुलै अखेर "विश्रामबागवाड्याचा दर्शनी...

व यांस यश आले असून येत्या जुलै अखेर वाड्याचा दर्शनी भाग पूर्णपणे नागरिकांसाठी खुला करण्यात येईल असे सुनील मोहिते यांनी वाड्याच्या भेटी दरम्यान स्पष्ट केले. असा सोनेरी ऐतिहासिक वारसा असलेल्या वाड्याचे विगत दोन वर्षे जतन व संवर्धनाचे काम पुणे मनपाच्या प्रकल्प विभागांतर्गत येणाऱ्या हेरिटेज सेलच्या माध्यमातून सुरु असल्याचे क्रिएटिव्ह फाउंडेशन चे अध्यक्ष संदीप खर्डेकर यांच्या निदर्शनास आले. आणि हे काम पूर्ण होण्यास होणारा विलंब बघता याबाबत आता आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल असे त्यांनी प्रशासनास कळविले.

### स्कूल बसचालकांचा उद्यापासून बेमुदत...

या सेवेवर अवलंबून असल्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामकाजावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने शाळा बस चालक संघटनांशी संवाद साधावा, अशी मागणी शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि पालकांकडून करण्यात येत आहे. संवाद आणि सहकार्यातून योग्य तोडगा निघाल्यासच विद्यार्थ्यांच्या सुरक्षित आणि नियमित प्रवासाची हमी देता येईल.


**ग्रामपंचायत कापुरव्होळ**
**ता. भोर जि. पुणे बी निविदा सूचना**
**खुली निविदा सूचना सन २०२४-२५**

ग्रामपंचायत कापुरव्होळ, ता. भोर जि.पुणे खालील कामांचे सीलबंद निविदा जिल्हा परिषद पुणे ग्रामपंचायत कापुरव्होळ १५ वित्त आयोग व ग्रामनिधी खालील बंदिस्त गटार काम करण्यात येत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून पाकीट पद्धतीने मागवीत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत कापुरव्होळ ता. भोर जि. पुणे यांच्याकडून दिनांक २-७-२०२५ ते ७-७-२०२५ पर्यंत सार्वजनिक कामाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत देण्यात येतील. भरून पाठवलेल्या मोहोर निविदा दिनांक २/७/२०२५ ते ७-७-२०२५ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कापुरव्होळ, ता. भोर, जि. पुणे येथे स्वीकारण्यात येतील. निविदा दिनांक ८-७-२०२५ रोजी सकाळी ११ वाजता उघडण्यात येतील.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | कोरी निविदा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १) | अक्षय सिताराम गाडे ते दत्तात्रय रघुनाथ गाडे | ३ लक्ष | रु.०१% | १०० | ३ महिने |
| २) | दत्तात्रय रघुनाथ गाडे ते रामदास सोनाबा गाडे | ३ लक्ष | रु.०१% | १०० | ३ महिने |
| ३) | रामदास सोनाबा गाडे ते ओढापर्यंत | ३ लक्ष | रु.०१% | १०० | ३ महिने |
| ४) | गणेश गाडे ते शाळापर्यंत | ३ लक्ष | रु.०१% | १०० | ३ महिने |

**टीप :** १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा नमुन्यांची फी (टेंडर फॉर्म फी) ग्रामपंचायत कापुरव्होळ ता. भोर जि. पुणे येथे भरून निविदा उपलब्ध होतील.३) इसारा रक्कम कोणत्याही बँकेच्या धनादेशाद्वारे (एफ.डी.आर ) ग्रामपंचायत कापुरव्होळ ता. भोर जि. पुणे नावाने काढून तो रेखांकित करून सदर डी. डी/ लिफाफा नं. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्रं 2 उघडला जाणार नाही.

शिक्का

सही
**(सरपंच)**
ग्रामपंचायत कापुरव्होळ
**ता. भोर जि. पुणे**



## जाहीर जाणीव

तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिनेश वसंतराव व्यवहारे, रा. सी ३० रुणवाल पॅराडाईज उजवी भुसारी कॉलनी कोथरुड पुणे ३० हे असुन त्यांनी सदरील मिळकत मे. मुथा असोसिएटस यांजकडून खरेदी केलेली आहे. त्याप्रमाणे करारनामा दस्त नोंदणीकृत केलेला आहे. सदरील करारनामा मा. दुय्यम निबंधक हवेली क्र. २ यांचेसमोर दि. २७/०१/१९८८ रोजी दस्त नं. १९३/१९८८ प्रमाणे नांदविलेला आहे. सदरील दस्ताची मुळ पत्र गहाळ झालेली असल्याबाबत नुकतेच मला समजलेले असुन त्याप्रमाणे मी पुणे शहर पोलिस, कोथरुड पोलिस ठाणे यांच्या संप्रेषण नेटवर्क द्वारे (इंटरनेट) च्या माध्यमातुन पुणे पोलिस या संकेतस्थळावरुन सदरील फिर्याद नोंदविलेली आहे. सदरील फिर्याद दि. ३१/०५/२०२५ रोजी ९६४७५/२०२५ प्रमाणे नोंदविलेली आहे. सदरील करारनामा दस्ताचा कोणीही गैरउपयोग करून फसवणुक होऊ नये म्हणुन मी या लोकांना जाणीव होण्याच्या उद्देशाने जाहिर जाणीव करून देत आहे.

मिळकतीचे वर्णन : तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका हवेली, में दुयाम निबंधक हवेली यांच्या कार्यक्षेतील तसेच पुणे महानगरपालिका यांच्या कार्यक्षेतील गाव मौजे कोथरुड मधील स. नं. १३० भाग मधील आनंदनगर येथील बिल्डींग न. २१ फ्लॅट नं. १२ पहिला मजला यांसी क्षेत्र ६९० चौ. फुट येणेप्रमाणे मिळकत येणेप्रमाणे नोटीस असे.

पुणे
दि. १५/०६/२०२३

श्री. दिनेश वसंतराव व्यवहारे
सी ३० रुणवाल पॅराडाईज
उजवी भुसारी कॉलनी कोथरुड
पुणे ४११०३०
मो. नं. ९८२२०७०३१५

# कैलास मानसरोवर यात्रेला प्रारंभ

## ५ वर्षांनंतर भाविकांसाठी दर्शनाची पर्वणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कैलास मानसरोवर यात्रा सोमवार म्हणजेच ३० जून पासून सुरुवात होत आहे. तब्बल पाच वर्षांनंतर ही यात्रा सुरू होत आहे. कैलास मानसरोवर हिंदू, जैन, बौद्ध आणि शीख धर्मियांसाठी पवित्र स्थळ आहे. ही यात्रा जगभरातील सर्वात अवघड यात्रेंपैकी एक आहे. दरवर्षी केवळ ७५० भाविकांना कैलास मानसरोवर प्रवासाची परवानगी मिळते.

कैलास मानसरोवर यात्रेचा मार्ग भारतातील उत्तराखंड आणि सिक्कीममधून जातो. पहिला मार्ग उत्तराखंडमधील लिपुलेख आणि दुसरा सिक्कीमच्या नाथुला पासमधून जातो. सिक्कीमहून जाणारे भाविक कैलास मानसरोवर भवनातून बसमधून दिल्ली एअरपोर्टला जातात. तेथून ते गंगटोकला जातात आणि त्यानंतर पुढच्या प्रवासाला सुरुवात होते. लिपुलेखच्या मार्गावरुन येणारे प्रवासी बसमधून उत्तराखंडला येतात आणि पुढचा प्रवास सुरू करतात.

कैलास मानसरोवर यात्रा सुरू करण्यापूर्वी भाविकांना चार ते पाच दिवस कैलास मानसरोवर भवनात थांबावं लागतं. येथून त्यांना दिल्लीच्या हार्ट अँड लंग्स इन्स्टिट्यूटमधून आरोग्य तपासणी करावी लागते. जे यात्री फिट असतात त्यांना यात्रेला पुढे जाण्याची परवानगी मिळते. कैलास मानसरोवर यात्रेबाबत परराष्ट्र मंत्रालयाकडून माहिती दिली जाते. कैलास मानसरोवर यात्रा अत्यंत उंचावर असते. यासाठी तुम्हाला १९,५०० फूट उंचीवर ट्रेकिंग करावी लागते.

कैलास मानसरोवर यात्रेसाठी साधारण दोन ते तीन लाखांपर्यंत खर्च येतो. ज्यात फिटनेस टेस्ट, चीन व्हिसा, इमिग्रेशन शुल्क, घोड्याचे शुल्क, जेवण, सामानाची ने-आण करण्यासाठीचे शुल्क, मानसरोवर आणि मंदिरातील प्रवेश तिकीटसह तिबेटमध्ये राहण्याचं भाडं यांचा समावेश आहे. याशिवाय तिबेटमध्ये जेवण, कपडे, फूट स्टोअर, फिरणं आणि अन्य खर्च वेगळा धरावा लागेल. कैलास मानसरोवर यात्रेसाठी परराष्ट्र मंत्रालयाच्या वेबसाइटवर ऑनलाइन नोंदणी करावं लागतं. यासाठी एक पासपोर्ट साइज फोटो, पासपोर्टचं पहिलं आणि शेवटचं पान, फोटो, फोन नंबर आणि ईमेल आवश्यक असतं.

**यात्रेचा नेमका कालावधी**

कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण करण्यासाठी २२ दिवस लागतात. ज्यातील १४ दिवस आपण भारतात आणि आठ दिवस तिबेटमध्ये असतो. या यात्रेत सुरक्षेची जबाबदारी तिबेट सीमा पोलिसांची असते. कैलास मानसरोवर यात्रा ४,६०० मीटर उंच तारबोचे खोऱ्यापासून सुरू होते. यादरम्यान, कैलास पर्वताची प्रदक्षिणा करावी लागते. ज्यामध्ये ५२-५५ किलोमीटर चालावे लागते. ही यात्रा ३ दिवसांत पूर्ण होते. प्रवासादरम्यान, सरोवराची प्रदक्षिणा देखील करावी लागते.

## सर्वोच्च न्यायालयाने ललित मोदींना फटकारले

फेमा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) ठोठावलेला १०.६५ कोटी रुपयांचा दंड भरण्याचे निर्देश बीसीसीआयला द्यावेत, अशी मागणी करणारी ललित मोदीची याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळून लावली. मात्र, न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने मोदींना कायद्यानुसार उपलब्ध असलेल्या उपायांचा लाभ घेण्याचा अधिकार असेल, असे म्हटले आहे.





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** परकीय चलन व्यवस्थापन कायद्याचे (फेमा) उल्लंघन केल्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) ठोठावलेला १०.६५ कोटी रुपयांचा दंड भरण्याचे आदेश बीसीसीआयला द्यावेत, अशी मागणी करणारी ललित मोदीला गेल्या वर्षी १९ डिसेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाने एक लाख रुपयांचा दंड ठोठावला होता.

फेमा अंतर्गत न्यायालयीन प्राधिकरणाने ललित मोदीला दंड ठोठावला असल्याने ही याचिका पूर्णपणे दिशाभूल करणारी असल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले होते. ललित मोदी यांनी आपल्या याचिकेत म्हटले आहे की, त्यांची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती, त्या काळात ते इंडियन प्रीमियर लीगच्या गव्हर्निंग बॉडीचे, बीसीसीआयच्या उपसमितीचे अध्यक्षही होते.

बीसीसीआयने त्याला बायलॉजनुसार नुकसान भरपाई द्यावी, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे. तथापि, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला दिला, ज्यात म्हटले होते की बीसीसीआय घटनेच्या अनुच्छेद १२ नुसार 'राज्य' या व्याख्येत येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश देऊनही मोदीयांनी २०१८ मध्ये ही याचिका दाखल केली होती, असे उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले आहे.

याचिकाकर्त्याला (ललित मोदी) ईडीने ठोठावलेल्या दंडाच्या अनुषंगाने याचिकाकर्त्याच्या कथित नुकसान भरपाईच्या प्रकरणात कोणतेही सार्वजनिक कार्य पार पाडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही आणि म्हणूनच बीसीसीआयला यासाठी कोणतीही रिट जारी केली जाऊ शकत नाही, असे उच्च न्यायालयाने म्हटले होते. कोणत्याही परिस्थितीत दिलासा देणे पूर्णपणे चुकीचे आहे, असे न्यायालयाने म्हटले होते. ही याचिका निरर्थक असून त्यानुसार आम्ही ही याचिका फेटाळून लावतो. ललित मोदी यांनी टाटा मेमोरियल हॉस्पिटलला चार आठवड्यांत एक लाख रुपयांची रक्कम अदा करावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.



## तेलंगणा: संगारेड्डी येथील केमिकल फॅक्टरीत स्फोट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हैदराबाद :** तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील एका रासायनिक कारखान्यात झालेल्या स्फोटात ८ कामगारांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या दुर्घटनेत १५ जण गंभीर जखमी झाले आहेत. स्फोटाचे कारण अद्याप समजू शकलेले नाही, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाच्या ११ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. अनेक कामगार आत अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडली. मायक्रोक्रिस्टलाइन सेल्युलोज आणि इतर फार्मा एक्झिपिएंट्स ची निर्मिती करणाऱ्या सिगाची इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या युनिटमध्ये अचानक स्फोट झाला. या अपघातात पाच मजुरांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती पाटणचेरू पोलिस ठाण्याशी संबंधित एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. यात पाच मजुरांचा जागीच मृत्यू झाला. अन्य तिघांचा पाटणचेरू येथील रुग्णालयात मृत्यू झाला. तर अन्य दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोटामुळे औद्योगिक शेडचे तुकडे झाले. हा स्फोट इतका जोरदार होता की, काही कामगार सुमारे १०० मीटर अंतरावर पडले. जवळपास सर्व कामगार कारखान्यातून बाहेर आले असले तरी अजूनही काही कामगार आत अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या दुर्घटनेत आजूबाजूच्या इमारतींचेही मोठे नुकसान झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. स्फोटानंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती. आजूबाजूच्या परिसरात काळा धूर पसरल्याने लोकांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याच्या तक्रारीही नागरिकांनी केल्या आहेत. खबरदारी म्हणून आजूबाजूच्या परिसरातून लोकांना बाहेर काढण्यात येत आहे.

## जम्मू-काश्मीरमध्ये नवीन युती स्थापन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जम्मू आणि काश्मीर पीपल्स कॉन्फरन्स (जेकेपीसी) चे अध्यक्ष सज्जाद लोन यांनी श्रीनगरमध्ये एका नवीन राजकीय आघाडीची घोषणा केली. या आघाडीचे नाव 'पीपल्स अलायन्स फॉर चेंज' असे आहे. या आघाडीमध्ये सज्जाद लोन यांचे जम्मू काश्मीर पीपल्स कॉन्फरन्स (जेकेपीसी), हकीम मोहम्मद यासीन यांचे पीपल्स डेमोक्रॅटिक फ्रंट (पीडीएफ) आणि जस्टिस अँड डेव्हलपमेंट फ्रंट (जेडीएफ) यांचा समावेश आहे.

आघाडीची घोषणा करताना सज्जाद लोन यांनी,"आज आम्ही ज्या आघाडीची घोषणा करत आहोत ती आमच्यावर राज्य करणाऱ्या राजकीय आघाडींना पर्याय असेल. ही निवडणूक आघाडी आहे आणि जनतेचे सर्व प्रश्न उपस्थित करेल" असे म्हटले आहे. सज्जाद लोन हे हंदवाडाचे आमदार आहेत. ते २०१४-२०१८ पर्यंत भाजप-पीडीपी युती सरकारमध्ये मंत्री होते. आजकाल लोन उमर अब्दुल्ला सरकारवर हल्ला करत आहेत.

काँग्रेस आणि डावे पक्ष काश्मीरमधील सरकारला पाठिंबा देत आहेत. दुसरीकडे, मेहबूबा मुफ्ती यांचे पीडीपी आणि जेकेपीसी विरोधी पक्षात आहेत. आता सज्जाद लोन यांच्या नवीन युतीनंतर कोणत्या प्रकारची राजकीय परिस्थिती निर्माण होते हे पाहणे मनोरंजक असेल.



**वेस्ट बँक** इस्रायलच्या ताब्यातील वेस्ट बँकमधील काफर मलिक येथे इस्रायलच्या हल्ल्यानंतर मोठे नुकसान झाले असून, यात एका कारच्या झालेल्या नुकसानीची पाहणी करताना पॅलेस्टिनी.

## भारताला शह देण्यासाठी पाक-चीनची नवी खेळी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**नवी दिल्ली :** भारताबरोबरच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान आणि चीन प्रादेशिक पातळीवर नवा गट तयार करत आहेत. मात्र, याबाबत अधिकृतपणे काहीही सांगण्यात आलेले नाही. त्यात भारताच्या इतर शेजाऱ्यांचाही समावेश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सार्क गटाच्या जागी नवा गट तयार करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे वृत्त आहे. विशेष म्हणजे सार्कमध्ये भारताचाही समावेश होता.

माध्यमांनी दिलेल्या वृत्तात म्हटले आहे की, चीन आणि पाकिस्तानमध्ये नवीन ब्लॉकवर चर्चा वेगाने सुरू आहे. चीनमधील कुनमिंग येथे १९ जून रोजी झालेल्या बैठकीत बांगलादेशचाही सहभाग होता. त्यावेळी नव्या गटाबाबत चर्चा सुरू होती. १९ जून रोजी कुनमिंग येथे होणाऱ्या बैठकीचा मुख्य उद्देश सार्कमध्ये सामील झालेल्या इतर दक्षिण आशियाई देशांना नव्या गटात सामील होण्याचे आमंत्रण देणे हा होता.

श्रीलंका, मालदीव आणि अफगाणिस्तानसह सार्क देशही या नव्या गटात सामील होऊ शकतात, असेही या अहवालात म्हटले आहे. राजनैतिक सूत्रांच्या हवाल्याने या वृत्तात असेही म्हटले आहे की, भारताला सामील होण्याचे आमंत्रण दिले गेले असते, परंतु "भिन्न हितसंबंध लक्षात घेता, ते सकारात्मक प्रतिसाद देतील अशी शक्यता नाही.

सार्कची स्थापना ८ डिसेंबर १९८५ रोजी झाली. तेव्हा त्याचे ७ सदस्य होते आणि २००७ मध्ये अफगाणिस्तान सामील झाला. मात्र, २०१६ पासून हा गट सक्रिय झालेला नाही. २०१४ मध्ये काठमांडू शिखर परिषदेनंतर पक्षाच्या नेत्यांची भेट झालेली नाही. २०२० मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदा सार्क देशांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जोडले होते आणि कोविड-१९ निधीचा प्रस्ताव ठेवला होता. विशेष म्हणजे २०२० मध्ये इस्लामाबादमध्ये १९ वी शिखर परिषद होणार होती, ज्यावर भारताने बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता.

## कर्जाला कंटाळून कुटुंबासह आत्महत्या



**लखनौ :** कर्जबाजारीपणाला कंटाळून येथील एका व्यावसायिकाने पत्नी आणि अल्पवयीन मुलीसह विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना सोमवारी उघडकीस आली. पोलिस उपायुक्त विश्वजीत श्रीवास्तव यांनी दिलेल्या माहितीनुसार, लखनौमधील अशरफाबाद भागातील त्यांच्या वडिलोपार्जित निवासस्थानी ही घटना घडली. शोभित रस्तोगी (४८), त्यांची पत्नी सुचिता रस्तोगी (४४) आणि मुलगी ख्याती रस्तोगी (१६) अशी मृतांची नावे आहेत.

## सिमल्यात पाच मजली इमारत कोसळली



**शिमला :** हिमाचल प्रदेशात मान्सून सक्रिय होताच पावसामुळे होणारे नुकसान, इमारत कोसळणे, दरड कोसळणे आणि रस्ते अडवण्याच्या बातम्या सोमवारी आल्या. सिमल्याच्या उपनगरातील भट्टाकुफर येथे सोमवारी सकाळी एक पाच मजली इमारत कोसळली, तर रामपूरमध्ये ढगफुटीमध्ये एका शेडमधील अनेक गायी वाहून गेल्या. चमियाना सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्यावरील माथु कॉलनी येथील इमारत कोसळली, मात्र कोणतीही जीवितहानी झाली नाही, कारण जिल्हा प्रशासनाने गंभीर धोका ओळखून कैद्यांना आधीच बाहेर काढले होते. मात्र, आजूबाजूच्या दोन इमारतीही धोक्यात आल्या आहेत.

## सामंजस्य करारामुळे आंध्रात साडेआठ लाख रोजगार



**अमरावती :** आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी रविवारी सांगितले की, सरकारने गुंतवणुकीशी संबंधित अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत, ज्यामुळे राज्यात साडेआठ लाख रोजगार निर्माण होतील. गुगल, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस), एलजी इलेक्ट्रॉनिक्स आणि आर्सेलर मित्तल या सारख्या कंपन्या राज्यात गुंतवणूक करणार आहेत, असे नायडू यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले. कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स, जिंदाल ग्रुप आणि इतरांनी रायलसीमा आणि उत्तर आंध्र प्रदेशात युनिट्स सुरू केल्याचा उल्लेख करताना नायडू म्हणाले, "गुंतवणूकदारांचा आंध्र प्रदेशाच्या स्थैर्य आणि क्षमतेवर विश्वास आहे.

## वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मालमत्तेवर छापे



**भुवनेश्वर :** बेहिशेबी मालमत्तेच्या चौकशीच्या अनुषंगाने ओडिशा दक्षता विभागाने सोमवारी तीन जिल्ह्यांतील आठ ठिकाणी सहसंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या मालमत्ता आणि कार्यालयावर एकाच वेळी छापे टाकले. मृद संधारण व पाणलोट विकास सहसंचालकांनी उत्पन्नापेक्षा अधिक संपत्ती जमविल्याचा आरोप झाल्यानंतर दक्षता विभागाने त्यांच्या मालमत्तेवर शोधमोहीम सुरू केली. हे अधिकारी रायगडयेथील पाणलोट विभागाचे माजी प्रकल्प संचालक (पीडी) होते.

## मालगाडीचे तीन डबे रुळावरून घसरले

**भुवनेश्वर :** ओडिशातील कटक रेल्वे स्थानकाजवळील यार्डात मालगाडीचे तीन रिकामे डबे रुळावरून घसरले. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून सकाळी साडेआठच्या सुमारास वॅगन रुळावरून घसरल्या असून यार्डातील लूप लाईनवर परिणाम झाला आहे. मशिन, साहित्य आणि मनुष्यबळासह मदत गाडी तैनात करण्यात आली असून यार्डातील लूप लाइन लवकरच पूर्ववत करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# नवीन गट आणि गण यांवर लक्ष

## इंदापूरातील इच्छुकांना जिल्हा परिषदेचे वेध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे दालन खुले झाले आहे. यामुळे गेली सव्वातीन वर्षे प्रशासकांच्या ताब्यात असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया मार्गी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर इंदापूर तालुक्यात एक नवीन जिल्हा परिषद गट आणि दोन नवीन पंचायत समिती गणांची भर पडणार असल्याने, संपूर्ण तालुक्याचे लक्ष या बदलाच्या प्रक्रियेवर केंद्रीत झाले आहे.

राज्यात निवडणुकींची प्रक्रिया पुन्हा सुरू होत असताना गट व गण रचना ही एक अत्यंत महत्त्वाची पायरी मानली जात आहे. याच प्रक्रियेवर भविष्यातील राजकीय वर्चस्व, संधी आणि आव्हानांचे गणित ठरणार आहे. प्रशासनाने १४ जुलैपर्यंत प्रारूप रचना प्रसिद्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, तर त्यानंतर १८ ऑगस्टपर्यंत अंतिम मंजुरी मिळवून प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

या प्रारूपावर इच्छुक उमेदवार, राजकीय गट आणि सामान्य नागरिक





हरकती, आक्षेप, सूचना देऊ शकतात. त्या तहसीलदार कार्यालयाकडून स्वीकारल्या जातील. नंतर जिल्हाधिकारी यावर अहवाल तयार करून विभागीय आयुक्तांकडे पाठवतील आणि अंतिम निर्णय आयुक्त सुनावणीद्वारे देतील.

२०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत इंदापूर तालुक्यात ७ जिल्हा परिषद गट आणि १४ पंचायत समिती गण होते. या निवडणुकीत क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांचे गट जिल्हा परिषदेवर प्रभावी होते, तर माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या समर्थकांचा पंचायत समितीत वरचष्मा होता. त्यामुळे आगामी निवडणुकीत नेमक्या कोणत्या भागात गट तयार होतात, कोणते भाग विभाजित होतात, यावर राजकीय समीकरणे ठरणार आहेत.



### नव्या संधी की जुनी घसरण?

- गट-गण रचनेनंतर अनेक संभाव्य इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीच्या तयारीस सुरुवात केली होती. काहींनी मतदारसंघात सेवा केली, संपर्क वाढवला, कार्यकर्ते बांधले. मात्र, आता मतदारसंघ रचना बदलल्याने अनेकांचा कार्यक्षेत्र बदलण्याची भीती आहे. आपण केलेली सेवा वाया तर जाणार नाही ना? असा प्रश्न अनेक कार्यकर्त्यांमध्ये ऐकायला मिळत आहे.

### कार्यक्रम

- १४ जुलै – प्रारूप गट/गण रचना प्रसिद्ध
- ८ ऑगस्ट – आक्षेप, हरकती, सूचना स्वीकारणे
- १८ ऑगस्ट – अंतिम मंजुरी व अधिसूचना

# खेड तालुक्याच्या विकासासाठी भरीव निधी मंजूर

## आमदार बाबाजी काळे यांची माहिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड तालुक्यातील विकास कामांसाठी पुणे जिल्हा नियोजन समिती कडून भरीव निधी मिळाला आहे. अंगणवाड्या, बंधारे, पाझरतलाव, प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती यांसाठी हा निधी मंजूर झाला आहे, अशी माहिती आमदार बाबाजी काळे यांनी दिली.

तालुक्यातील कडूस, आंबोली, वाडा, पाईट या चार प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींच्या विस्तारीकरणासाठी आणि देखभाल दुरुस्तीसाठी एकूण १० कोटी ६६ लाखांचा निधी मंजूर झाला आहे.

कडूस प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीसाठी २ कोटी ९६ लाख, पाईट प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीसाठी २ कोटी ९६ लाख, आंबोली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीसाठी २ कोटी ३६ लाख आणि वाडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीसाठी २ कोटी ३६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तालुक्यात नवीन अंगणवाड्या बांधण्यासाठी प्रत्येकी ११ लाख २५ हजारांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामध्ये निघोजे, निघोजे (कुरणवस्ती), सुरकुंडी (माझगाव), चऱ्होली खुर्द (विश्रांतवड), रासे (मुंगसेमळा), महाळुंगे (महाळुंगे १ व महाळुंगे २), कडूस (ढमालेशिवार), दावडी, कुरकुंडी (राळेवस्ती), कुडे बुद्रुक या अंगणवाड्यांसाठी एकूण १ कोटी २३ लाख रुपये मंजूर झाले आहेत. कन्हेरसर येथील पाझर तलाव दुरुस्तीसाठी ४५ लाख, भोसे येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी २० लाख, पाळू येथील निंबोडीच्या ओढ्यावर साठवण बंधारा बांधण्यासाठी ५१ लाख, घोटवडी येथील पालचोंडी डोहात साठवण बंधारा बांधण्यासाठी ३० लाख रुपये जिल्हा नियोजन समितीतून मंजूर झाले आहेत, असे आमदार काळे यांनी सांगितले.

# दौंडमध्ये वातावरण तापले; आक्षेपार्ह व्यक्तव्य केल्याने गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दौंड :** पुणे जिल्ह्यातील दौंडमध्ये राजकीय वातावरण तापले असून, दौंड नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष बादशहा शेख यांच्याविरोधात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहिल्यानगरचे आमदार संग्राम जगताप यांच्या कुटुंबातील महिलांविषयी तसेच आमदार गोपीचंद पडळकर आणि महेश लांडगे यांच्याविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचाआरोप त्यांच्यावर आहे. विशेष म्हणजे, शेखने या आमदारांना त्यांच्या मतदारसंघात जाऊन 'झोडपण्याची' थेट धमकी दिली होती,ही घटना २७ जून रोजी घडली, जेव्हा मुस्लिम समाजाच्या वतीने दौंड पोलिस ठाण्यावर एका निषेध मोर्चा काढण्यात आला होता.

राज्यातील काही आमदार आणि भाजप पदाधिकारी मुस्लिम समाजाविषयी वादग्रस्त विधाने करत असल्याच्या निषेधार्थ हा मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चा दरम्यान बोलताना बादशहा शेख यांनी संतप्त भाषणात ही आक्षेपार्ह विधाने केली. अहिल्यानगरचे आमदार संग्राम जगताप यांच्या कुटुंबातील महिलांविषयी अत्यंत आक्षेपार्ह विधान केल्याचा आणि त्यांना झोडपण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. आमदार गोपीचंद पडळकर आणि भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्याविषयीही त्यांनी अपशब्द वापरले, तसेच गलिच्छ, आक्षेपार्ह भाषेत भाषण केल्यामुळे समाजात दंगलसदृश परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेल्याचा आरोप आहे. बादशहा शेखचा समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणावर प्रसारित झालेला व्हिडिओ पाहिल्यानंतर नीलेश बांगरे यांनी २८ जून रोजी अहिल्यानगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. दौंड पोलिसांनी २८ जूनपर्यंत ठोस कारवाई केली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. सध्या, अहिल्यानगर पोलिसांचे पथक बादशहा शेखच्या शोधात असून, ते फरार आहेत.

# मंचर येथे फ्लॉवरला चांगला भाव



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** मंचर बाजार समितीत फ्लॉवरची आवक घटल्यामुळे फ्लॉवरला चांगले बाजार भाव मिळत आहे तर इतर भाज्यांचे बाजारभाव समाधान कारक असल्याची माहिती सभापती निलेश थोरात यांनी दिली. मंचर कृषि उत्पन्न बाजार समिती येथे रविवारी तरकारी शेतमालाची एकूण ९४७१ डाग इतकी आवक झाली. फ्लॉवरला दहा किलोला दोनशे ऐंशी असा बाजार भाव मिळाला आहे.

मंचर बाजार समितीमध्ये आज भाजी पाल्याला १० किलोला मिळालेला बाजारभाव

कारले ३५०-५७०, गवार ५००-१०००, घेवडा ५००- १०००, चवळी ३००-५००, ढोबळी मिरची ३००-६२५, मेंडी ४००-७५१, फरशी ५००-, फ्लॉवर २००-२८०, मुईमुगशेंगा २५१-५५०, दोडका ३५०-६५०, मिरची ३००- ६५०, तोंडली २००- ४८०, शेवगा ४००- ८००, लिंबू ३०० - ४००, काकडी २००- ३५०, कोबी ७०-१६०, वांगी ३००-६००, दुधीभोपळा १५०-३००, बीट १५०-२५१, आले ३००, टोमेटो २००-३७०, मका ५०-१६०, कैरी २००-४००, पापडी ७००-९००, डांगर भोपळा १००. या प्रमाणे मंचर बाजार समितीत शेतमालाला बाजारभाव मिळाला असे बाजार समितीचे उपसभापती सचिन पानसरे यांनी सांगितले.

फ्लॉवर पिकाला चांगला बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना नफा मिळू लागला आहे. वीस रुपये किलो या भावाने फ्लॉवर पीक विकले जात असून शेतकऱ्यांना अजून बाजार वाढण्याची अपेक्षा आहे. पाण्याचा तुटवडा भासत असताना अनेक शेतकरी फ्लॉवर पिकाचे यशस्वी उत्पादन घेतले आहे.

आंबेगाव तालुक्यातील पिंपळगाव, खडकी, निरगुडसर, पारगाव, काठापूर, लाखनगाव, लांडेवाडी, मंचर, अवसरी, कळंब, चास या परिसरात उन्हाळी हंगामात गेल्या काही वर्षांपासून फ्लॉवर या पिकाचे उत्पादन शेतकरी घेत आहेत.

# जुन्नरच्या आंब्याला सोन्याचा दर्जा!

## 'जुन्नर गोल्ड' पेटंटसाठी केंद्राकडे मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** सध्या 'जुन्नर गोल्ड' नावाच्या आंब्याची जोरदार चर्चा सुरु आहे. जुन्नर तालुक्यातील बुचकेवाडी येथील भरत रेवजी जाधव या शेतकऱ्याने हा नवीन पद्धतीचा आंबा विकसित केला आहे. हा आंबा चवीला हापूस, केसर आणि राजापुरी सारखा आहे. जाधव यांनी या आंब्याचे पेटंट मिळवण्यासाठी दिल्ली येथील 'प्रोटेक्शन ऑफ प्लॅन्ट व्हायटी अँड फार्मर्स राइट्स ॲथॉरिटी'कडे प्रस्ताव पाठवला आहे. हा आंबा राजापुरी आंब्यासारखा दिसायला आहे. तर या आंब्याचे वजन ८०० ते १००० ग्रॅम आहे व कोईचे वजन ४० ते ५० ग्रॅम इतके आहे.

जाधव हे गेल्या २२ वर्षांपासून आंब्याच्या झाडांची लागवड करत आहेत. त्यांनी आंब्याच्या बागेत विविध जातींची जोपासना केली आहे. यात हापूस, केसर, राजापुरी, बदामी, लंगडा आदी वाणांची चारशेहून अधिक झाडे आहेत. तसेच सीताफळ आणि डाळिंब फळबाग केली आहे. त्यांनी लावलेल्या आंब्याच्या बागेत वेगळी वैशिष्ट्ये असलेली दोन झाडे आढळून आली. ज्याला जुन्नर गोल्ड आंबा नावाने प्रसिद्धी मिळाली आहे.

२०२४ मध्ये उपविभागीय कृषी अधिकारी सतीश शिरसाठ यांनी जाधव यांच्या आंबा बागेस भेट दिली. तेव्हा शिरसाठ यांना या बागेत नवीन पद्धतीचा विकसित झालेला आंब्याचा वाण पाहावयास मिळाला. या वाणाची पाहणी कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष कृषिरत्न अनिल तात्या मेहेर आणि अन्य काही अधिकाऱ्यांनी केली. कृषी विज्ञान केंद्रातील उद्यानविद्या विषयतज्ज्ञ भरत टेमकर आणि पीक संरक्षण विषयतज्ज्ञ डॉ. दत्तात्रेय गावडे यांनी बागेतील दोन्ही झाडांची प्रत्यक्ष पाहणी करून जाधव यांना पेटंटसाठी केंद्र सरकारच्या नवी दिल्ली येथील 'प्रोटेक्शन ऑफ प्लॅन्ट व्हायटी अँड फार्मर्स राइट्स ॲथॉरिटी'कडे प्रस्ताव पाठविण्याची सूचना केली. त्यावरून जाधव यांनी केंद्राकडे या वेगळ्या आंब्याच्या पेटंटची मागणी केली आहे.



# देवदर्शनाच्या नावाखाली भीमाशंकर येथे मोठी लूट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे मंदिरात पुजाऱ्यांचा सुळसुळाट झाला असून, काही पुजाऱ्यांकडून भाविकभक्तांची विविध धार्मिक कार्यक्रमाच्या, देवाच्या दर्शनाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत असल्याच्या घटना समाजमाध्यमांच्या माध्यमातून चव्हाट्यावर आल्या आहे.

काही पुजारी ओळखीच्या माध्यमातून एकमेकांना संपर्क करून भाविकभक्तांना मंदिरातून दर्शन घडवून आणतात. त्या बदल्यात पैसे घेत आहेत. मंदिरात विविध होम हवन करणे, देवाची पूजा करणे, अभिषेक करणे यासाठी २ ते ५ हजारांपर्यंत पैसे घेतले जात असल्याचा आरोप अनेकदा झाला आहे. तासनतास रांगेत उभे राहून अनेकांना दर्शन मिळत नाही; मात्र पुजाऱ्याची ओळख असेल तर पैसे देऊन तत्काळ दर्शन मिळत असल्याचे म्हटले जाते.

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे शनिवार, रविवार आणि सोमवार वगळता दिवसभरात ७० ते ८० हजार भाविक येतात, तर वरील तीन दिवशी येथे एक लाखापेक्षा अधिक भाविक दर्शनासाठी येतात. श्रावण महिन्यात ही संख्या दररोज दोन ते तीन लाखांपेक्षा अधिक असते. त्यावेळी मंदिरापासून तीन ते चार किलोमीटर दूरवर भाविकांच्या रांगा लागतात.

सुटीच्या दिवशीच मंदिरातील पुजारी गाभाऱ्यात भाविकांचे अभिषेक घालतात. यामुळे अनेक भाविक मंदिरात बसून राहतात व इतर भाविकांना दर्शन घेताना अडचण निर्माण होते. त्यामुळे शनिवार, रविवार व सोमवार या तीन दिवशी पुजाऱ्यांनी अभिषेक बंद ठेवावा व आलेल्या भाविकांना लवकरात लवकर दर्शन कसे मिळेल, यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## चांडोली येथे पाळीव कुत्र्यांवर बिबट्याचा हल्ला



**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील चांडोली बुद्रक येथे पाळीव कुत्र्यांवर शनिवारी दि. २८ रोजी हल्ला करून त्याला बिबट्याने जखमी केले. मावकरमळा, मुंजाबा मंदिराशेजारी आणि आमच्या घराजवळ बछडयासह बिबट् मादीला एका रात्रीत तीनवेळा पहिले आहे. बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी सुभाष विठ्ठल मावकर यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे. चांडोली बुद्रक येथील मावकरमळ्यात रविवारी दि. २९ रोजी रात्री आठ वाजता नारळाच्या झाडाखाली किरण मावकर, सोनाली पोखरकर, विठ्ठल नागटीळे आणि विनायक नागटीळे यांनी एक बछडा आणि बिबट्या बसल्याचे पाहिले. सुभाष मावकर व अन्य नागरिकांनी आरडाओरड केल्याने बिबट्या ज्वारीच्या शेतात निघून गेला. त्यानंतर किरण मावकर रात्री दहा वाजता घराबाहेर आले असता घरातील अंगणात दिसला. सुभाष मावकर यांनाही रात्री साडे अकरा वाजता मावकरमळा ते सहानेवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बसलेला दिसला. तसेच कैलास दत्तात्रेय मावकर यांच्या पाळीव कुत्र्यांवर बिबट्याने हल्ला करून त्याला जखमी केले आहे. वनरक्षक प्रदीप औटी आणि वनसेवक जालिंदर थोरात यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे.

## पारगाव मेमाणे येथे दिवसा घरफोडी



**जेजुरी :** जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतील पारगाव मेमाणे येथील कैलास गायकवाड यांच्या घराची कडी कोयंडा उचकटून घरातील सुमारे आठ तोळे सोन्याचे दागिने व ७० हजार रुपये रोख असा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतील पारगाव मेमाणे येथील कैलास नारायण गायकवाड यांच्या बंद घराचे भरदिवसा कडी कोयंडा उचकटून घराच्या कपातील एक तोळा वजनाची सोन्याची मोहन माळ, तीन तोळे वजनाचे सोन्याचे गंठण,दोन तोळे वजनाचे सोन्याचे आक्कासाहेब डोरले,दोन तोळे वजनाचे सोन्याचे चैन व रोख ७० हजार रुपये असे सुमारे साडे तीन लाख रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. २५ जून रोजी ही चोरीची घटना घडली असून दि. २९ रोजी गायकवाड यांनी जेजुरी पोलीस स्टेशन मध्ये याबाबत फिर्याद दिली आहे. या प्रकरणी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक महेश पाटील तपास करीत आहेत.

## वारकऱ्यांची चरण सेवा



**इंदापूर :** श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात अनेक दशकांपासून पंढरीची पायी वारी देहू आणि आळंदी पासून पंढरपुर पर्यंत असते त्यावेळी अनेक आबाल वृद्ध वारकऱ्यांना चालुन थकवा येतो. भरपूर अंतर चालल्यामुळे होणारा थकवा दूर व्हावा म्हणून या वर्षी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून वारकरी चरणसेवा हा उपक्रम घेण्याचे ठरवले. मुख्यमंत्र्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत अनुलोम संस्थेच्या माध्यमातून असंख्य अनुलोम मित्र सहभागी झाले. गेल्या काही वर्षात वारीमध्ये स्वच्छता राखली जावी म्हणून संघ आणि परिवाराच्या माध्यमातून "निर्मल वारी" हा उपक्रम राबवला जात आहे. यावेळी या उपक्रमास आवर्जून उपस्थित मुख्यमंत्री सहायता कक्षाचे प्रमुख साबळे व त्यांचे सहकारी अमित झागडे अनुलोम संस्थेचे विभाग प्रमुख शिरीष भालेकर, अनुलोम उपविभाग बापू खेत्रे, अनुलोम प्रमुख गोरख माने, अनुलोम मित्र राम वर्मा आसवे, अक्षय बांडे, यश खेडकर, रोहन घोगरे, सुनिता घोगरे, नाना गळके, अनुज हरणे, सचिन पवार, नंदकुमार गुटाळ यांच्या या उपक्रमामध्ये ३४० वारकऱ्यांनी चरण सेवेचा लाभ घेतला. ही सेवा पूर्ण होण्यासाठी अनुलोम संस्थेचे सर्व अनुलोम मित्र वस्ती मित्र अनुलोमचे सर्व सहकारी यांच्या संयुक्त सहकार्यातून चांगला उपक्रम राबविण्यात आला.

## इंडियाना ग्रीटिंग्स कंपनीच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**वाल्हे :** इंडियाना ग्रीटिंग्स कंपनीचे संस्थापक आणि प्रसिद्ध उद्योजक स्वर्गीय गोविंद हिंगोराणी यांच्या ८० व्या जयंतीनिमित्त, कंपनीच्या वतीने तसेच हडपसर येथील ओम ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिराचे आयोजन कंपनीच्या परिसरात करण्यात आले होते. या शिबिराला कंपनीतील कामगार, स्टाफ आणि व्यवस्थापनाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल २०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपले योगदान दिले. कार्यक्रमास कंपनीचे विद्यमान मालक प्रशांत गोविंद हिंगोराणी यांनी विशेष उपस्थिती दर्शवून रक्तदात्यांना प्रोत्साहन दिले. या उपक्रमाचे संपूर्ण नियोजन कंपनी व्यवस्थापन, एच.आर. विभाग, कामगार मंडळ, आणि ओम ब्लड बँक यांनी संयुक्तरित्या केले होते. ओम ब्लड बँकेचे गणेश पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिबिराचे वैद्यकीय व्यवस्थापन अत्यंत कौशल्याने पार पाडले.

# भीमाशंकर येथे कडेकोट बंदोबस्त ठेवा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भीमाशंकर येथे पर्यटक भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता चोख सुरक्षा व्यवस्था ठेवावी, त्यासाठी अतिरिक्त पोलिस चौकी या परिसरात उभारावी.तसेच अखंडित वीज पुरवठा सुविधा उपलब्धतेच्या दृष्टीने वीज उपकेंद्र ही याठिकाणी द्यावे, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखडा संदर्भातील आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंत्रणांना निर्देश दिले. बैठकीस सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार, आमदार दिलीप वळसे पाटील,खेडचे आमदार बाबाजी काळे, देवस्थानचे अध्यक्ष सुरेश कौदरे व समितीतील इतर सदस्य उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भीमाशंकर परिसराला लाभलेल्या नैसर्गिक सृष्टीसौंदर्याची पार्श्वभूमी लक्षात घेऊन येथे व्यापक प्रमाणात इको टुरिझम संकल्पना विकसित करण्यात यावी.

मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या वनराईचा उपयोग करून वनभ्रमण पथ तयार करावे.त्याचसोबत पर्यटक, भाविकांसाठी रोप वेची सुविधा विकसित करावी. निगडाळे या ठिकाणी पर्यटकांसाठी सोयीच्या ठरणाऱ्या सर्व सुविधा हॉटेल, रेस्टॉरंट त्याचसोबत इच्छुकांसाठी निवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. भीमाशंकर येथील दळणवळण सुविधा, वाहतूक मार्ग, अंतर्गत रस्ते यांच्या विकासास प्राधान्य द्यावे. तसेच याठिकाणी हेलीपॅड सुविधा उपलब्ध करुन देण्याचेही नियोजन करावे.

या परिसराचा विकास करताना स्थानिक व्यावसायिक, दुकानदारांना नवीन दुकाने उपलब्ध करुन द्यावीत.तसेच राजगुरुनगर-तळेघर-भीमाशंकर महामार्ग हा सुरळित वाहतूक व्यवस्थेसाठी उत्तम पर्याय आहे, त्यादृष्टीने त्याचा विकास करण्यात यावा.यावेळी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी श्री क्षेत्र भीमाशंकरच्या विकासकामांबाबत सविस्तर सादरीकरण केले. बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, तसेच संबंधित यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.

> श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखड्याची अंमलबजावणी तातडीने सुरू करुन कुंभमेळ्याच्या आधी या क्षेत्राचा सुनियोजितपणे दर्जेदार विकास करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली.तसेच यावेळी श्री क्षेत्र भीमांशकर विकास आराखडा (कुंभमेळा २०२७-गर्दी व्यवस्थापन व इतर सोयी सुविधा)२८८ कोटी १७ लाख रुपयांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली.
> — **दिलीप वळसे पाटील,** माजी गृहमंत्री.



# वाहतूककोंडी थांबणार कधी?

## आंबेठाण चौकात रोज होणाऱ्या वाहतूक कोंडीने चाकणकर नागरिक आले अक्षरशः रडकुंडीला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** आंबेठाण चौकात रोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे वाहतूक कोंडीने चाकणकर नागरिक अक्षरशः रडकुंडीला आले असून चाकणमधील वाहतूककोंडी थांबणार कधी? असा प्रश्न आता चाकणकर उपस्थित करत आहेत.

चाकण, आंबेठाण रस्ता, वासुलीफाटा, महाळुंगे,खालूंबरे, तळेगाव एमआयडीसीला जोडले असल्यामुळे या रस्त्यावर होणारी वाहतूक मोठया प्रमाणात असते. कामगार, शाळेच्या बसेस अशा इतर वाहनांबरोबर अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनाचे प्रमाण अधिक असल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असून या मार्गावरून जाणाऱ्या अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनांना वेळ मर्यादा ठरवून देऊन ही वाहतूक बिरदवडी मार्गे भाम येथे वळवून पुणे-नाशिक रस्त्यावर सोडण्यात यावी, अशा मागण्यांचे निवेदन चाकण शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने देण्यात आले.

चाकण शहर अध्यक्ष राम गोरे, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष मोबिन काझी, संजय वाघमारे, दत्ता चौधरी, कैलास थोरवे, अनिल देशमुख, दिलावर आतार आदींच्या वतीने चाकण शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक प्रकाश राठोड यांना निवेदन दिले.

**निवेदनात सुचवलेले मते**

चाकण-आंबेठाण रस्त्यावरील वाहतुकी कोंडी दिवसेंदिवस वाढत असल्या कारणामुळे रविवारी वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक प्रकाश राठोड यांची भेट घेतली व त्यांना प्रायोगिक तत्त्वावर जड वाहने ही सकाळी सात ते संध्याकाळी नऊ वाजेपर्यंत बिरदवडी मार्गे भामकडे मार्गक्रमण करणे तसेच बिरदवडी चौक आंबेठाण चौक व पुणे-नाशिक महामार्ग येथील भाम चौक या तिन्ही ठिकाणी चक्राकार पद्धतीने जड वाहनांची एकेरी पद्धतीने करण्यात यावी, असे निवेदन देण्यात आले. या संदर्भात पोलीस अधिकारी राठोड यांनी वरिष्ठाचे मार्गदर्शन घेऊन पुढील दोन ते दोन ते तीन दिवसांत याबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.



# कडेपठार गडावर स्वच्छता अभियान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** हभप बंडा तात्या कऱ्हाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य व्यसनमुक्त युवक विकास संघ अंतर्गत कार्यरत असलेल्या पुरंदर युवा छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी संकल्प स्वच्छतेचा या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या कडेपठार खंडोबा मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबविली.

युवा छावा संघटनेच्या वतीने प्रत्येक रविवारी श्रीक्षेत्र कडेपठार मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवले जाते. नुकत्याच झालेल्या गणपुजा सोहळ्यामुळे गडावर साठलेल्या पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक कचरा गोळा करून त्याचे निर्मूलन करण्यात आले तसेच गडाच्या पायथ्यापासून ते कडेपठार मंदिरा पर्यंत कार्यकर्त्यांनी स्वच्छता मोहीम राबविली.

युवकांनी सेवाकार्याचा आदर्श घडवला. या कार्यातून त्यांना अनुपम आनंद आणि समाधान लाभत आहे. प्रत्येक रविवार हा या युवा शिलेदारांसाठी स्वच्छता आणि समर्पणाचा दिवस आहे. ईश्वर त्यांच्याकडून हे पवित्र कार्य करवून घेत आहे, असे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तुषार देशमुख यांनी सांगितले.

# झेंडूच्या फुलांच्या बाजारभावात घसरण

## झेंडू उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** झेंडूच्या फुलांच्या बाजारभावात घसरण झाली आहे. त्यामुळे झेंडू उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण दिसत आहे. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या झेंडूच्या फुलांची तोडणी वेगात सुरू झाली आहे.

आगामी श्रावण महिन्यातील सण, धार्मिक कार्यक्रम डोळ्यासमोर ठेवून अनेक शेतकऱ्यांनी झेंडूचे पीक घेतले आहे. या परिसरात बहुतांशी शेतकरी झेंडूचे पीक हे मल्चिंग पेपरवर घेतात. त्याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होतो. मल्चिंगमुळे झेंडूची रोपे झाडे सशक्त राहतात. सध्या या परिसरातील रांजणी, वळती, नागापूर ,शिंगवे, पारगाव आदी परिसरात झेंडूच्या फुलांची तोडणी सुरू झाली आहे. परंतू यंदा अति पावसाचा फटका झेंडूच्या पिकाला मोठ्या प्रमाणावर बसला.सततच्या पावसामुळे झेंडू पिकाचे नुकसान झाले आहे.

सध्या झेंडूच्या फुलांना बाजारभाव अत्यंत कमी मिळत आहे. सध्या मिळणाऱ्या बाजारभावातून भांडवल दूर परंतू मजुरी, वाहतुकीचे भाडे देखील मिळत नाही. त्यामुळे झेंडू उत्पादकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

> दरवर्षी आम्ही श्रावण महिन्यातील सण, उत्सव डोळ्यांसमोर ठेवून झेंडूच्या फुलांची लागवड करतो. त्याला बाजारभावाची देखील चांगली साथ मिळते.लाखो रुपये झेंडूच्या फुलांच्या पिकातून मिळून जातात.परंतू यंदा अति पावसाचा फटका झेंडूच्या पिकाला बसला. झेंडूच्या फुलांवर काळीटिक पडत आहे. गेल्या आठ दिवसांपूर्वी पाच ते दहा रुपये किलो असा बाजारभाव झेंडूच्या फुलांना मिळत होता. त्यावेळी भांडवल दूर परंतू मजुरी, वाहतुकीचे भाडे देखील वसूल होत नव्हते. आता झेंडूच्या फुलांना किलोला पंचवीस रुपयांपर्यंत बाजारभाव मिळत आहे .हा बाजारभाव देखील न परवडणारा आहे.
> — **माधव निकम,** झेंडू उत्पादक शेतकरी, रांजणी



रांजणी (ता. आंबेगाव) येथे झेंडूच्या फुलांची तोडणी सुरू आहे.

# हिंदकेसरी शामा बैलाच्या निधनाने हळहळ



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** पुणे जिल्ह्यातील अनेक बैलगाडा शर्यतीच घाट गाजविणाऱ्या हिंदकेसरी शामा बैलाचे निधन झाले. या लाडक्या बैलाच्या अंत्यविधीला रांजणी (कारमळा) येथे अंत्यविधीसाठी बैलगाडा मालक व शौकिनांनी मोठी गर्दी केली होती.

रांजणी गावातील शेतकरी रत्नाकर वाघ, किरण वाघ, अविनाश वाघ यांनी पाच वर्षांपूर्वी आमदाबाद येथून हा बैल आणला होता. तो दिसायला देखणा होता. तो सरळ रेषेत धावायचा. त्याला शामा नावाने सर्वजण ओळखत होते. प्रत्येक घाटात तोच फायनलचा मानकरी ठरायचा. अनेक बक्षिसे त्याने मिळवून दिलेली आहेत. अनेक बैलगाडा शर्यतीच घाटात बैलगाडा मालकांचे व शौकीनांचे लक्ष तो वेधून घ्यायचा. शर्यत संपल्यानंतर तो स्वतःहून गाडीत जाऊन उभारायचा. मालकाने बोलल्यानंतर तो उठ - बस देखील करत होता. मात्र, पंधरा दिवसांपूर्वी शामा बैलाला लंपी या जीवघेण्या आजाराची लागण झाली. अनेक स्थानिक डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार केले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेर शामाचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्याच्या अंत्यविधीला कारमळा (रांजणी) येथे बैलगाडा मालक व शौकिनांनी मोठी गर्दी केली होती.

रांजणी गावातील माजी उपसरपंच व बैलगाडा मालक संतोष भोर यांच्यासह शिरूर, खेड, जुन्नर आंबेगाव तालुक्यातील गाडा मालकांनी येऊन वाघ कुटुंबाचे सांत्वन केले. जिवापाड जपणाऱ्या बैलाचा मृत्यू झाल्याने परिसरातील गाडा मालक मंगेश भोर, सागर वाघ, एकनाथ वाघ, शिवाजी वाघ, उमेश वाघ, भाऊसाहेब हांडे, बाळासाहेब नरवडे, संकेत वाघ, अक्षय भोर, किसन भोर, प्रशांत कोल्हे, विलास कोल्हे आदी गाडा मालक अंत्यविधीसाठी उपस्थित होते.

# चैतन्य विद्यालयात गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्कार



**ओतूर :** येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयात मार्च २०२५ मध्ये झालेल्या एसएससी परीक्षेतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ अतिशय थाटामाटात संपन्न झाल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. दरवर्षी ग्रामविकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयाच्या वतीने एसएससी परीक्षेत ९०% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा यथोचित सत्कार समारंभ आयोजित केला जातो. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे होते. व्यासपीठावर संस्थेचे खजिनदार रघुनाथ तांबे, सचिव प्रदीप गाढवे, सहसचिव पंकज घोलप, संचालक रोहिदास घुले, शांताराम पानसरे, संजय वल्हवणकर, नितीन तांबे, अमोल डुंबरे, अशोक अहिनवे, भिवाजी माळवे, इंदुमती डुंबरे, सीमा तांबे, शरद माळवे, संजय हिरे, मधुकर मोरे, कैलास वारुळे, लहू भालेराव, सुनील चौधरी, शुभांगी हांडे, सचिन पानसरे आदि पदाधिकारी व पालक वर्ग,सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या २३ विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. ओतूर ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी विस्तार अधिकारी रामदास ज्ञानेश्वर डुंबरे यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तालुका क्रीडा अधिकारी म्हणून नियुक्ती झालेल्या विजय काकडे सर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक अनिल उकिरडे यांनी तर आभारप्रदर्शन मिलिंद खेत्री यांनी केले. अजित डांगे यांनी सूत्रसंचालन केले.

# खंडोबा देवस्थानच्या कार्यात समरसता, सद्भावना



**जेजुरी :** जेजुरीचा खंडोबा हे अठरापगड जातीचे कुलदैवत असून खंडोबा देवस्थान करीत असलेल्या कार्यात सामाजिक समरसता व सद्भावना दिसून येत आहे. धार्मिक मंदिरांमध्ये देवाच्या सेवेबरोबरच समाज जोडण्याचे काम झाले पाहिजे. असे विचार कुटुंब प्रबोधन विभागाचे प्रांत संयोजक नरेश करपे यांनी जेजुरी येथे व्यक्त केले. जेजुरीच्या खंडोबा गडावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कुटुंब प्रबोधन पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या कार्यकर्त्यांचा दोन दिवसाचा अभ्यास वर्ग सासवड येथे आयोजित करण्यात आला होता. जेजुरीच्या खंडोबा गडावर परिक्रमा करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. राज्याच्या विविध भागातून आलेले कार्यकर्ते यात सहभागी झाले होते. श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. देवदर्शनानंतर कुलधर्म कुलाचारनुसार तळी भंडारा आदी विधी करण्यात आले. राज्याच्या विविध भागात कुटुंबप्रबोधनचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा खंडोबा प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. तर कुटुंब प्रबोधनच्यावतीने भारत मातेची प्रतिमा देवस्थानला भेट देण्यात आली. यावेळी कुटुंब प्रबोधन कार्यकर्ते प्रकाश खाडे, श्री मार्तंड देवसंस्थानचे विश्वस्त मंगेश घोणे, विश्वस्त ॲड. विश्वास पानसे, पोपट खोमणे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नितीन केंजळे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन कुटुंब प्रबोधनचे प्रांत सदस्य प्रमोद खळदकर, विजय जगताप, राजाभाऊ चौधरी, किरण बारभाई, वैभव लांघी , डॉ.शामा केंजळे, नेहा खाडे यांनी केले .

# पिंपरे खुर्द येथे घरफोडी



**जेजुरी :** जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतील पिंपरे खुर्द येथील दिलीप सोनवणे यांचे बंद घर उघडून अज्ञात चोरट्याने सुमारे ६३ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की पिंपरे खुर्द येथील दिलीप महादेव सोनवणे यांचे गावातील मराठी शाळेजवळ असणारे घराचे कुलूप कशाने तरी उघडून अज्ञात चोरट्यांनी घरातील ३२ हजार रुपये किमतीचा ४२ इंची टिव्ही, १० हजार रुपये किमतीचे चांदीचे पैंजण, ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कर्णफुल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना दिनांक ५ ते ६ जून दरम्यान घडली असून दिनांक २९ रोजी जेजुरी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे तपास करीत आहेत.

आईसलँड हा युरोप खंडातला एक देश. या देशाचं नावच आईसलँड आहे. इथलं तापमान उणे दहा अंशांपेक्षा खालीच असतं. इथल्या ग्लेशियर गुहा खूपच अनोख्या आहेत. हा गुहा म्हणजे जगातलं एक आश्चर्यच आहे.



# पार्सलमधून आला नाग!



आजकाल ऑनलाईन खरेदीचा जमाना आहे. आपल्यापैकी अनेक जण बरेच सामान ऑनलाइन ऑर्डर करत असतात. बंगळुरूमधील एक जोडप्यानेही ऑनलाइन सामान मागवले. पण डिलिव्हरी झाल्यावर त्यांनी सामानाचा बॉक्स उघडला, तेव्हा समोरचं दृश्य पाहून त्यांची दातखिळीच बसली. बॉक्स उघडताच त्यांच्यासमोर एक कोब्रा फुत्कार टाकताना दिसला. ते पाहून जोडप्याची भीतीने गाळण उडाली.

अ‍ॅमेझॉनवरून आलेल्या सामानात साप असल्याचा दावा त्या जोडप्याने केला असून त्याबद्दल त्यांनी 'सोशल मीडिया'वर पोस्टही शेअर केली. नशीबाने तो साप त्या बॉक्सच्या चिकटपट्टीला चिकटला होता. त्यामुळे त्यांना इजा झाली नाही. तो मोकळा असता तर कोणाला चावूही शकला असता. या घटनेमुळे ई-कॉमर्स कंपन्यांचे पॅकेजिंक आणि डिलीव्हरी प्रक्रियेवरून नवा वाद सुरू झाला आहे.

त्यांच्या सांगण्यानुसार, दोन दिवसांपूर्वी अ‍ॅमेझॉनवरून एक्सबॉक्स कंट्रोलर मागवला होता. परंतु त्यांनी पॅकेट उघडल्यानंतर आतमध्ये जिवंत साप पाहून त्यांना धक्काच बसला. सुदैवाने साप पॅकेजिंग टेपमध्ये अडकला. अन्यथा आमच्या घरातील किंवा अपार्टमेंटमधील इतर लोकांना त्रास होऊ शकला असता. एवढ्या निष्काळजीपणानंतरही अ‍ॅमेझॉन त्यांचे ऐकत नसल्याचा आरोप केला. कस्टमर केअरच्या कर्मचाऱ्यांनीही त्यांना दोन तास फोनवर अडकवून ठेवले. त्यामुळे मध्यरात्रीच्या सुमारास त्यांना नाहक त्रासाचा सामना करावा लागला. ई-कॉमर्स कंपन्यांनी त्यांचे पॅकेजिंग आणि वितरण प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशी मागणी या घटनेनंतर केली गेली.

# इमारती चोरांच्या ताब्यात!

स्पेनसारख्या प्रगत देशातल्या काही इमारतींचं बांधकाम अपूर्ण असून त्या चोरांच्या ताब्यात आहेत, यावर अनेकांचा विश्वास बसणार नाही. पण हे खरं आहे. २००८ मध्ये आलेल्या आर्थिक मंदीचा भारत, अमेरिकेसह अनेक देशांवर परिणाम झाला. बरेच देश या धक्क्यातून सावरले. पण स्पेनवर या मंदीचा परिणाम दिर्घकाळ राहिला. इथल्या बांधकाम व्यावसायिकांनी त्या काळात दर्जेदार गृहप्रकल्पांच्या बांधकामांना सुरूवात केली होती. पण मंदीमुळे काम थांबलं. यामुळे जवळपास सर्व बिल्डर्सचं दिवाळं निघालं. अपूर्ण इमारती कोणीही खरेदी केल्या नाहीत. इथल्या वॅलेंसिया शहरातल्या अनेक इमारती तशाच पडून आहेत. अंदाजानुसार देशभरातली तब्बल ३४ लाख घरं अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे कोणी त्यांना हात लावायला तयार नाही. यात वॅलेंसियातल्या हाउसिंग सोसायटीतली घरंही आहेत. या घरांची एकूण किंमत भारतीय चलनात ३.५ लाख कोटी रुपयांच्या आसपास असल्याचं बोललं जातं. आता ही घरं पाडून टाकायचा सरकारचा विचार आहे. पण त्याला प्रचंड खर्च येणार आहे. या प्रकल्पांचा लिलाव करण्याचीही बँकांची तयारी नाही. इथल्या मालमत्तेच्या किंमती खूप घसरल्याने खरेदीदार मिळण्याची शक्यताही खूप कमी आहे. म्हणूनच घरांवर चोरांनी ताबा मिळवला आहे. चोर घरांमधले नळ, कॉपर वायरिंग तसंच इतर वस्तू काढून बाजारात विकतात. वॅलेसियामध्ये मालमत्तेच्या किंमती ५० टक्क्यांनी घटल्या आहेत.



# आकाशगंगा पाहायची? येथे जा!

मुंबई, दिल्ली किंवा चेन्नईसारख्या महानगरातील वाढत्या प्रदुषणामुळे आकाशातील तारे दिसतच नाहीत. आता मॉन्सून सुरू झाल्याने ढगांमुळे आकाश दिसत नाही; परंतु देशातील एक गाव असे आहे जेथे आपल्याला आकाशगंगा दिसते.

आकाशगंगा पाहण्यासाठी येथे पर्यटक जमतात. वाढत्या प्रदूषणाने तारे दिसत नाहीत. या गावाला जगातील सर्वात उंच गाव म्हटले जाते. आपला भारत इतका विशाल आहे, की येथे एकाच देशात अनेक प्रकारचे हवामान आणि भौगोलिक रचना पाहायला मिळत असते. हिमाचल प्रदेशातील स्पिती जिल्ह्यामध्ये हे गाव आहे. या गावाला जगातील सर्वात उंच गाव म्हटले जाते. या गावाचे नाव कौमिक गाव. येथे आपल्या उघड्या डोळ्यांनी आकाशगंगा पाहायला मिळते. ते पाहण्यासाठी दुर्बिणीची गरज नसते. रात्रीच्या अंधारात तारे असे चमकतात की आपण विश्वास ठेवू शकणार नाही. याचा अनुभव घेण्यासाठी या गावात जायलाच हवे.



कौमिक गाव समुद्रसपाटीपासून सुमारे १५ हजार २७ फूट उंचीवर वसलेले आहे. तिथे मोटर बाइकने सहज जाता येते. यामुळेच या गावात पर्यटकांचा राबता असतो. या गावात जून महिन्यातील तापमान सात ते नऊ अंश सेल्सियसपर्यंत खाली उतरलेले असते. थंडीत इथली घरेदेखील रिकामी असतात. कारण एवढ्या थंडीत गावात राहाणे शक्य नसते. दरम्यान, गावकरी पायथ्याशी असलेल्या घरांमध्ये राहतात. थंडी गेली की पुन्हा ते आपल्या गावातील मूळ घरात येतात. कौमिक गावाची आशियातील नव्हे, तर जगातील सर्वात उंच

# आपले हात

हात हा माणसाचा अत्यंत महत्त्वाचा अवयव. हात नसतील तर माणूस काहीही करू शकणार नाही. त्यातही उजवा हात म्हणजे माणसाचं सर्वस्व. म्हणूनच आपला हात जगन्नाथ ही म्हण अस्तित्त्वात आली असावी. तर अशा या हातांशी संबंधित गंमतीशीर बाबी आपण जाणून घेऊ या.



आपल्या बोटांत स्नायू नसतात. ज्या स्नायूंमुळे बोटं हलतात ते हाताच्या पंजात असतात. हे स्नायू बोटांशी जोडलेले असतात. १२.६ टक्के पुरूष तर ९.९ टक्के महिला डावखुऱ्या असतात. खेळाडूंना होणाऱ्या एक चर्तुथांश जखमा हात किंवा मनगटाशी संबंधित असतात. पंजा ओला राहिला तर त्यावरची त्वचा सुरकुतते. यामागचं नेमकं कारण माहीत नसलं तरी नसांमुळे असं होत असल्याचा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. अंगठ्यावर एकूण नऊ स्नायू नियंत्रण ठेवतात. या स्नायूंवर हातांशी संबंधित तीन नसांचं नियंत्रण असतं. प्रत्येक हातात छोटी मोठी २९ हाडं असतात. २९ मुख्य सांधे, बोटं हलवणारे ३४ स्नायू, ४८ नसा आणि ३० रक्तवाहिन्या असतात. एक हजार लोकांमध्ये एक जण दोन्ही हातांचा एकसारख्या पद्धतीने वापर करु शकतो. स्पर्शामुळे ऑक्सिटॉसिन हार्मोन्सची निर्मिती होते. या हार्मोन्समुळे आपल्याला बरं वाटतं. हात धरल्यामुळे स्ट्रेस हार्मोन्सचं प्रमाण कमी होतं.

# ट्रॅफिक टाळण्यासाठी हेलिकॉप्टरने प्रवास

जगाची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्याच वेगाने शहरांमधील रहदारीही वाढत आहे. अशा परिस्थितीत कार किंवा बाईकने बाहेर पडल्यास तासनतास ट्रॅफिक जॅममध्ये अडकण्याचा दैनंदिन अनुभव असतो. ऑफिसला जाणाऱ्यांना स्वत:च्या वाहनाने जाणे अधिक कठीण झाले आहे. म्हणूनच बहुतेक लोक मेट्रोमध्ये प्रवास करणे योग्य मानतात. असेच एक प्रकरण अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातून समोर आले आहे. तिथे एका महिलेने ट्रॅफिक टाळण्यासाठी अनोखा उपाय योजला आणि हेलिकॉप्टरने आपले कार्यालय गाठले.

अमेरिकेतील न्यू यॉर्कमध्ये राहणारी भारतीय वंशाची महिला खुशी सूरीने तिच्या एक्स अकाउंटवरून एक स्क्रिनशॉट शेअर केला आहे. खुशीला काही कामानिमित्त बाहेर जायचे होते आणि तिला न्यूयॉर्कच्या ट्रॅफिकची चांगलीच कल्पना होती. तिने कॅब बुक करण्यास सुरुवात केली, तेव्हा तिच्याकडे त्यासाठी १३० डॉलरची मागणी करण्यात आली आणि तिला एक तासाची वेळ सांगण्यात आली. हे पाहून खुशीने कॅब राइड रद्द केली आणि



ब्लेड या साईटचा आधार घेतला. ही साईट अमेरिकेत हेलिकॉप्टर कॅब सुविधा प्रदान करते. खुशीने हेलिकॉप्टर राईडचा दर पाहिला, तेव्हा तो कारपेक्षा फक्त तीस डॉलर जास्त होता आणि राईड केवळ पाच मिनिटांत पूर्ण झाली. त्यामुळे खुशीने कॅबऐवजी हेलिकॉप्टरने जाण्याचा निर्णय घेतला.

खुशीने हा अनुभव सोशल मीडियावर शेअर केला आहे. तिच्या पोस्टवर यूजर्सने कमेंट केल्या आहेत. एका यूजरने लिहिले, की १६० डॉलर्स खूप आहेत. भारतातील अनेक लोकांचा हा पगार आहे. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, की इतके पैसे देण्यापेक्षा मी पायी चालणे पसंत करेन, तर दुसऱ्या यूजरने लिहिले, की दीदी फक्त राईडसाठी १३ हजार देत आहे, मग ती किती कमावते?

# माणसं पिंजऱ्यात, प्राणी स्वातंत्र्यात

प्राणीसंग्रहालयात प्राणी पिंजऱ्यात असतात आणि पर्यटक बाहेरून त्यांना न्याहाळत असतात. पण चीनमधल्या एका प्राणीसंग्रहालयात माणसं पिंजऱ्यात बंदिस्त होऊन फिरतात तर प्राणी मोकळेपणाने बाहेर फिरत असतात. 'लेहे लेदू वाईल्डलाईफ झू' असं या ठिकाणाचं नाव आहे. इथे प्राण्यांना पूर्ण मोकळीक देण्यात आली आहे. माणसं पिंजरा असणाऱ्या गाडीत बसतात. ही गाडी त्यांना प्राणीसंग्रहालय फिरवून आणते. चीनमधल्या चाँगक्विंग शहरातलं हे स्थान पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र बनलं आहे. २०१५ मध्ये ते सुरू करण्यात आलं. यामुळे पर्यटक प्राण्यांना खूप जवळून बघू शकतात. पर्यटकांनी भरलेला पिंजरा प्राण्यांजवळ नेला जातो. शिकार बघून प्राणी जवळ येतात. मग त्यांना अन्नही देता येतं. हा थरार अनुभवण्याची मजा निराळीच आहे. जंगली श्वापदं पिंजऱ्यावर चढून बसतात. यावेळी पर्यटकही श्वास रोखून धरतात. पण पिंजऱ्याच्या आत ते पूर्णपणे सुरक्षित असतात. इथलं प्रशासन सुरक्षेच्या बाबतीत सर्वतोपरी काळजी घेतं. लोकांना सूचनाही दिल्या जातात. बोटंही बाहेर न काढण्याचं आवाहन केलं जातं. जनावराने पाठलाग सुरु केल्यानंतर काय वाटू शकतं याची जाणीव करून देण्याचा हा एक प्रयत्न असल्याचं इथल्या प्रशासनाचं म्हणणं आहे. पांढरा वाघ, पट्टेदार वाघ, सिंह, अस्वल अशी श्वापदं इथे मुक्तपणे फिरत असतात.



# ...म्हणून ती पोलिसात गेली




दही किंवा कोणताही पदार्थ कोणी खाल्ला म्हणून कोणी थेट पोलिसात तक्रार करायला जात नाही. पण तैवानमधल्या एका मुलीने अवघं १०० रुपयांचं दही चोरीला गेल्याची तक्रार केली. इतकंच नाही तर आरोपीला शोधण्यासाठी पोलिसांनी काही हजार रुपये खर्च केले. त्याचं झालं असं की होस्टेलमध्ये राहणाऱ्या एका तरूणीने फ्रीजमध्ये दही ठेवलं होतं. पण ते कोणी तरी खाऊन टाकलं. तिने काही मुलींकडे चौकशी केली. पण हाती काहीच लागलं नाही. मग तिने थेट तैपई पोलिसात तक्रार केली. सुरूवातीला पोलिसांनाही धक्का बसला. पण नंतर त्यांनी तिची तक्रार नोंदवून घेतली. दह्याच्या पाकिटावरच्या ओलसरपणामुळे त्यावर हाताचे ठसे उमटले नव्हते. त्यामुळे दोषींना पकडताना त्यांना बऱ्याच अडचणी येत होत्या. अशा वेळी तरूणीने पोलिसांना फॉरेन्सिक टीमची मदत घेण्याचा सल्ला दिला. मग या टीमने एका तरूणीसह सहा लोकांची डीएनए चाचणी केली. या चाचणीच्या निकालांवरून पोलिसांनी आरोपीला पकडलं खरं पण या चौकशीसाठी तब्बल ४२ हजार रुपये खर्च झाले. एका माणसाच्या डीएनए चाचणीसाठी पोलिसांनी तीन हजार तैवानी डॉलर म्हणजे तब्बल ७ हजार रुपये खर्च केले. अर्थात या प्रकरणाबद्दल तैवानी नागरिकांनी नापसंती व्यक्त केली आहे. एवढ्याशा घटनेसाठी करदात्यांचे पैसे फुकट घालवण्याची काहीच गरज नव्हती, असं लोकांचं म्हणणं आहे. चार आण्याची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला असाच हा प्रकार म्हटला पाहिजे.


रोबो ही संकल्पना आता अनोखी राहिलेली नाही. परदेशात सुरक्षारक्षक किंवा कर्मचारी म्हणून रोबोंची नेमणूक करण्यात येत असल्याचं तुम्ही ऐकलं असेल. ते घरकामासह विविध प्रकारची कामं करू शकतात. असाच एक रोबो अमेरिकेतल्या सॅन फॅन्सिस्कोमधल्या रेस्तराँमध्ये काम करतो. 'क्रिएटर' असं त्याचं नाव. हा 'क्रिएटर' बर्गर बनवतो. तो बर्गर बनवणारा जगातला पहिलाच स्वयंचलित रोबो असल्याचं 'फोर्ब्ज'चं म्हणणं आहे. तो ताजा, लुशलुशीत आणि चविष्ट बर्गर बनवतो. इतकंच नाही तर एका वेळी भरपूर बर्गर तयार करू शकतो. 'क्रिएटर' एकाच आकारात कांदा, टोमॅटो, काकडीच्या चकत्या कापू शकतो. पनीर, चिकनचे समान तुकडे करू शकतो. चिकन किंवा व्हेज पॅटिस भाजू शकतो. बर्गरचा ब्रेड कापून यात हे सगळं साहित्य एकावर एक ठेऊ शकतो. ही कामं करताना 'क्रिएटर' अजिबात गोंधळत नाही. त्याच्याकडून चूकही होत नाही. याचं कारण म्हणजे प्रोग्रामिंगचं तंत्रज्ञान. या तंत्रज्ञानामुळे तो सगळी कामं वेगात आणि अचूक करू शकतो. यासोबतच ग्राहकांच्या आवडीनुसार तो मसाले घालून बर्गरमधलं पॅटिस कडक किंवा मऊ भाजून देतो. शास्त्रज्ञांनी त्यादृष्टीनेच 'क्रिएटर'ची रचना केली आहे. हा रोबो एका तासात १२० बर्गर तयार करतो. त्याच्यात थर्मल सेंसरवर चालणारं यंत्र बसवण्यात आलं आहे. क्रिएटरमध्ये तब्बल ३५० सेंसर्स असून २० कॉम्प्युटर्सच्या मदतीने तो काम करतो. त्याने तयार केलेल्या बर्गरना भरपूर मागणी असून ६ डॉलर एवढी एका बर्गरची किंमत आहे. असा हा अनोखा 'क्रिएटर' सोशल मीडियावर बराच लोकप्रिय झाला.


# बर्गर बनवणारा 'क्रिएटर'



# चित्र-विचित्र शिक्षा

शिक्षा म्हणजे नेमकं काय या प्रश्नाचं उत्तर आपल्याला न आवडणारी गोष्ट करावी लागणं हे असू शकतं. शिक्षा म्हटली की आपल्याला तुरूंग दिसतो. पण जगभरात वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षा देण्यात येतात. काही शिक्षा इतक्या गमतीशीर आहेत की त्यांच्याबद्दल ऐकल्यानंतर आपण पोट धरून हसू. अमेरिकेतल्या मिसौरीतल्या डेव्हिड बेरीला हरणांची शिकार केल्याप्रकरणी दोषी धरण्यात आलं, तुरूंगात टाकण्यात आलं. पण इथे डिज्नेचं बाम्बी कार्टून बघण्याची शिक्षा त्याला देण्यात आली. २००३ मध्ये शिकागोतल्या दोन तरूणांना ४५ दिवसांचा तुरूंगवास ठोठावण्यात आला होता. ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला येशूची मूर्ती चोरल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. या दोघांची गाढवावरुन धिंड काढण्यात आली. मूर्खपणाच्या गुन्ह्यासाठी आम्ही माफी मागतो, असं पोस्टर त्यांना लिहावं लागलं. स्पेनमधल्या एका तरूणाने पॉकेटमनी बंद केल्यामुळे आईवडिलांना कोर्टात खेचलं. पण न्यायालयाने उलट या मुलालाच शिक्षा ठोठावली. आईवडिलांच्या घरातून बाहेर पडून स्वत:च्या पायावर उभं राहून दाखवण्याची शिक्षा त्याला देण्यात आली. २००८ मध्ये अँड्रू वेक्टरला ध्वनी प्रदुषणाबद्दल १२० पाउंड भरण्याची शिक्षा देण्यात आली. तो रॅप संगीत ऐकत होता. यासोबत त्याला शास्त्रीय संगीत ऐकायची शिक्षा देण्यात आली. नावडतं संगीत ऐकताना किती त्रास होतो याची जाणीव करवून देण्याच्या उद्देशाने वेक्टरला ही शिक्षा देण्यात आली होती. तो फक्त १५ मिनिटं ते संगीत ऐकू शकला.







## पाक टेस्ट टीम प्रशिक्षकपदी अझहर महमूद

माजी अष्टपैलू खेळाडू अझहर महमूद यांची पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. ते यापूर्वी संघाचे सहाय्यक प्रशिक्षक होते. सोमवारी, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) एका निवेदनात म्हटले आहे की, अझहर महमूद यांनी सहाय्यक प्रशिक्षक म्हणून काम केले आहे आणि ते बराच काळ संघाच्या मुख्य गटाचा भाग आहेत. त्यांना खेळाची आणि आंतरराष्ट्रीय अनुभवाची सखोल समज आहे. अझहरमध्ये मुख्य प्रशिक्षक होण्यासाठी आवश्यक असलेले सर्व गुण आहेत. जेसन गिलेस्पी यांनी पद सोडल्यानंतर ही जबाबदारी सांभाळणाऱ्या माजी वेगवान गोलंदाज आकिब जावेद यांची जागा अझहर महमूद घेतील. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये गिलेस्पींनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यांचा कार्यकाळ २०२६ मध्ये संपणार होता. संघ निवड आणि खेळपट्टी तयार करण्याचे अधिकार काढून घेतल्याबद्दल गिलेस्पी पीसीबीवर नाराज होते. पीसीबीने गेल्या वर्षी एप्रिलमध्ये अझहर महमूद यांची सहाय्यक प्रशिक्षक म्हणून दोन वर्षांसाठी नियुक्ती केली होती.

# ईशान खांडेकरला तिहेरी मुकुट

## स्वरदा साने हिचा दुहेरी धमाका : तनय इंगवले व शरण्या पटवर्धन यांचीही विजेतेपदावर मोहोर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** ईशान खांडेकर (टॉस अकादमी) याने तीन गटात विजेतेपद पटकाविले तर स्वरदा साने हिने दोन गटात विजेतेपद पटकाविले आणि शारदा सेंटर आयोजित शारदा जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत वर्चस्व गाजविले. तनय इंगवले व शरण्या पटवर्धन यांनी अनुक्रमे ११ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात विजेतेपदावर मोहोर उमटवली.

ही स्पर्धा शारदा समूह आणि डेक्कन डाईज व केमिकल्स यांनी पुरस्कृत केली आहे.पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने शारदा सेंटर येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेतील महिलांच्या एकेरीत स्पर्धा स्वरदा साने (टॉस अकादमी) हिने अंतिम सामन्यात रुचिता दारवटकर हिच्यावर ११-७,११-७, १२-१०, ११-९ अशी मात केली. तिने टॉप स्पिन फटक्यांचा बहारदार खेळ केला. स्वरदाने याआधी या स्पर्धेतील मुलींच्या सतरा वर्षाखालील गटातही विजेतेपद पटकावले होते.

पुरुषांच्या एकेरीत ईशान याने अंतिम लढतीत एकम क्लबचा अग्रमानांकित खेळाडू अमिष आठवले याच्यावर आश्चर्यकारक विजय मिळवला. अटीतटीने झालेला हा सामना त्याने १०-१२,११-६, ११-६,६-११,६-११,११-७ असा जिंकला. दुहेरीत ईशान खांडेकर व प्रणव घोलकर या जोडीने अजिंक्यपद पटकावले. अंतिम सामन्यात त्यांनी वैभव दहिभाते व शुभंकर रानडे यांचा ९-११,११-९,११-९, ११-६ असा पराभव केला. पहिली गेम गमावल्यानंतर ईशान व प्रणव यांनी अष्टपैलू खेळ करीत उर्वरित तीनही गेम्स घेतल्या आणि विजय मिळविला. ईशान याने त्याआधी १७ वर्षाखालील मुलांच्या गटाचे विजेतेपद पटकावले होते.

मुलांच्या अकरा वर्षाखालील गटात तनय इंगवले याने तृतीय मानांकित स्वयम कोठावळे याचा पराभव केला. चौथ्या मानांकित तनय याने हा सामना ११–९, १७-१५,११-८ असा जिंकताना अष्टपैलू खेळ केला.

मुलींच्या अकरा वर्षाखालील गटात मार्तंड बिनीवाले अकादमीची खेळाडू शरण्या पटवर्धन हिने अंतिम सामन्यात अग्रमानांकित खेळाडू अहाना गोडबोले हिचा पराभव करीत अनपेक्षित धक्का दिला हा सामना तिने १-११,११-८,११-९,११-७ असा जिंकताना काउंटर अटॅक पद्धतीचा सुरेख खेळ केला. तिला दुसरे मानांकन देण्यात आले होते.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ ज्येष्ठ संघटक राजीव बोडस, स्मिता बोडस, आशिष बोडस, अरविंद नातू, उदय भालचंद्र , श्रीकांत अंतुरकर , अविनाश जोशी , सुरेंद्र देशपांडे , उपेंद्र मुळये यांच्या हस्ते झाला.

## प्रो हॉकीत भारताचा सलग सातवा पराभव



**बर्लिन :** भारतीय महिला हॉकी संघाच्या पराभवाचे शुक्लकाष्ठ कायम राहिले. प्रो लीग हॉकी स्पर्धेतील युरोपियन टप्प्यात आज भारतीय संघाचा चीनकडून ०-३ असा पराभव झाला. भारताचा हा स्पर्धेतील सातवा पराभव आहे. पराभवांच्या या मालिकेमुळे भारतीय संघ १५ सामन्यांतून १० गुणांसह नऊ संघांमध्ये तळाच्या स्थानावर आहे. इंग्लंडचा संघ जर्मनीविरुद्ध सलग दोन दिवसांत दोन सामने खेळणार आहे. ते गुणतक्त्यात भारताच्या पुढे आहेत. भारतीय संघ तळातच राहिला तर प्रो लीगमधून भारतीय संघ बाहेर जाईल आणि त्यांना नेशन्स करंडक स्पर्धा खेळावी लागेल. आजच्या सामन्यात चीनकडून चेन यंग (२१वे मिनिट), झेंग यिंग (२४) यांनी पेनल्टी कॉर्नरवर गोल केले तर अनहुन यू हिने ४५व्या मिनिटाला मैदानी गोल केला. भारताने या सामन्यात चांगली सुरुवात केली होती; परंतु गोल करण्यात अपयश आले. बलजीत कौरला तिसऱ्याच मिनिटाला सुवर्णसंधी मिळाली होती; परंतु तिने मारलेला फटका गोलजाळ्याच्या बाहेरून गेला.

## स्मृती मानधनाचे तुफानी शतक; भारताकडून इंग्लंडचा धुव्वा



**नॉटिंगहॅम :** नेतृत्व करीत असलेल्या स्मृती मानधनाने झळकावलेल्या वेगवान शतकाच्या जोरावर द्विशतकी धावा करणाऱ्या भारताने पहिल्या ट्वेन्टी-२० सामन्यात इंग्लंडचा ९७ धावांनी धुव्वा उडवला. कसोटी, एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० अशा तिन्ही प्रकारांत शतक करण्याचा पराक्रम स्मृतीने केला. तिने आज ५१ चेंडूंत शतक केले. तिची एकूण खेळी ६२ चेंडूंत ११२ धावांची होती, त्यात तिने १५ चौकार आणि तीन षटकार मारले. प्रदीर्घ काळानंतर संघात परतणाऱ्या शेफाली वर्मासह स्मृतीने ७७ धावांची सलामी दिली. शेफालीची खेळी काहीशी संथ होती. २० धावांसाठी तिने २२ चेंडू घेतले; परंतु दुसऱ्या बाजूने स्मृतीचा धडाका सुरू असल्याने भारताच्या वाटचालीवर परिणाम झाला नाही. शेफाली बाद झाल्यानंतर आलेल्या हर्लिन देओलने २३ चेंडूंत ४३ धावा तडकावल्या. भारताचे हे द्विशतकी आव्हान इंग्लंडला झेपलेच नाही. पहिल्या षटकापासून त्यांची घसरगुंडी सुरू झाली. दोन बाद नऊ अशा अवस्थेनंतर कर्णधार नॅट सायव्हर ब्रंटने ४२ चेंडूंत ६६ धावा फटकावल्या. श्री चरणी हिने केवळ १२ धावांत चार विकेट मिळवल्या, तर दीप्ती शर्मा आणि राधा यादव या फिरकी गोलंदाजांनी प्रत्येकी दोन विकेट मिळवल्या.

## चाळीशीत फॅफ ड्यू प्लेसिसचे वादळी शतक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** फॅफ ड्यू प्लेसिसच्या वादळी शतकाच्या जोरावर टेक्सास सुपर किंग्स संघाने मेजर लीग क्रिकेटमध्ये सोमवारी एमआय न्यू यॉर्क संघावर दणदणीत विजयाची नोंद केली. ४० वर्षीय फॅफने मुंबई इंडियन्स फ्रँचायझीच्या संघातील गोलंदाजांची धुलाई करताना शतक झळकावले आणि अनेक विक्रमांना गवसणी घातली.

सुपर किंग्सच्या डावाची सुरुवात करताना फॅफने ५३ चेंडूत नाबाद १०३ धावा केल्या. त्याने ५ चौकार आणि ९ षटकार खेचून १४ चेंडूंत ७४ धावा कुटल्या. फॅफचा स्ट्राईक रेट १९४.३४ एवढा होता. सुपर किंग्जने २० षटकांत ४ फलंदाज गमावून २२३ धावा केल्या. डोनोव्हन फरेराने २० चेंडूंत ३ चौकार व ५ षटकारांसह ५३ धावांची वादळी खेळी केली. मुंबईच्या संघाला २० षटकांत ९ बाद १८४ धावा करता आल्या. मुंबईच्या संघाकडून किरॉन पोलार्डने ३९ चेंडूंत ५ चौकार व ५ षटकारांसह ७० धावांची खेळी केली. टेक्सास सुपर किंग्जने हा सामना ३९ धावांनी जिंकला.

फॅफचे हे ट्वेंटी-२० कारकिर्दीतील ८ वे शतक ठरले. या शतकासह तो ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके करणाऱ्यांच्या यादीत संयुक्तपणे चौथ्या क्रमांकांवर पोहोचला आहे. त्याने या बाबतीत मायकेल क्लिंगर, आरोन फिंच, जॉस बटलर, रोहित शर्मा, डेव्हिड वॉर्नर आणि ग्लेन मॅक्सवेल यांची बरोबरी केली आहे. या सर्व खेळाडूंनी प्रत्येकी ८ शतके केली आहेत. वेस्ट इंडिजचा माजी क्रिकेटपटू ख्रिस गेल (२२), बाबर आझम (११), दक्षिण आफ्रिकेचा रिले रुसो आणि भारताचा विराट कोहली ( प्रत्येकी ९) हे आघाडीवर आहेत. एमआय न्यू यॉर्क विरुद्ध फॅफची नाबाद १०३ धावांची खेळी ही MLC मधील त्याची तिसरी शतकी खेळी ठरली. या स्पर्धेच्या इतिहासात सर्वाधिक शतके करणारा तो फलंदाज आहे.

## दृष्टीहीनांनी कारचालकांना दाखवला 'डोळस' मार्ग; राउंड टेबल इंडियातर्फे 'बियाँड साइट'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हातात स्मार्टफोन, कानावर पडणाऱ्या सूचना, त्यानुसार कारचालकांना चतुरपणाने मार्ग दाखवत, २२ किलोमीटरची रॅली 'डोळस' पूर्ण करत दृष्टीहीन बांधवांनी आनंद साजरा केला. ५० दृष्टीहीन बांधवांनी कारचालकांना गाडी चालवण्याचा मार्ग दाखवत आपण सक्षम आहोत, याची जाणीव करून दिली. 'अपंगत्व म्हणजे असमर्थता नव्हे' हा सामाजिक संदेशही यातून दिला गेला.

निमित्त होते, सामाजिक समावेशकतेला चालना देण्यासाठी राउंड टेबल इंडिया या संस्थेतर्फे दृष्टीहिनांसाठी आयोजित 'बियॉंड साईट', या आगळ्यावेगळ्या कार रॅलीचे! नेक्सा-महालक्ष्मी ऑटो येथून निघालेली ही रॅली अमनोरा पार्क, खराडी बायपास, शक्ती स्पोर्ट्स, हयात इन्स्टा, गोल्ड ॲडलॅब चौक, वर्दे सोसायटी, गुंजन टॉकीज, कोरेगाव पार्क, वेस्टीन हॉटेल, मुंढवा चौक, मगरपट्टामार्गे द फर्न क्लब, अमनोरा पार्क येथे समाप्त झाली.

राउंड टेबल इंडियाचे (एरिया १५) अध्यक्ष अंशुल मंगल, पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशनच्या शेनाज पन्नू, राउंड टेबल इंडियाचे कीर्ती रुईया, सुमित गुप्ता, ऋषभ पतोडीया, रोनक पतोडीया, मनन शहा, गौरव अग्रवाल, गुरप्रीत सिंग, 'नेक्सा'चे तरुण सिंग आदी उपस्थित होते. सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या 'एक्झीम'चे संचालक पीसी नाम्बियार व अंशुल मंगल यांच्या हस्ते झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात झाली.


अंशुल मंगल म्हणाले, "राउंड टेबल इंडियाच्या वतीने पुण्यात प्रथमच या अनोख्या कार रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीमध्ये ५० कारचालक सहभागी झाले होते. त्यांना दृष्टिहीन व्यक्ती स्मार्टफोनवरून मिळणाऱ्या सूचना ऐकून मार्ग दाखवत होते. राउंड टेबल इंडियाच्या सदस्यांनी या कारमध्ये बसून प्रवास केला. दीड तासाच्या या रॅलीत २२ किलोमीटरचे अंतर यशस्वीपणे पूर्ण केले. 'बियाँड साइट' ही केवळ स्पर्धा नाही, तर दृष्टिहीन व्यक्तींच्या कौशल्यावर विश्वास दाखवण्यासह त्यांच्याविषयी असलेल्या रूढ कल्पनांना छेद देणारा उपक्रम आहे. दृष्टिहीन व्यक्तींची दिशा ज्ञान, स्थानिक समज आणि संवाद कौशल्ये अफाट असल्याचे यातून दिसले."

दृष्टीहीन तरुण-तरुणींनी या रॅलीचा मनसोक्त आनंद घेतला. त्यांनाही याबाबत खूप उत्सुकता होती. दृष्टिहीनांच्या अद्भुत कौशल्यांना चालना देणारा हा उपक्रम आहे. 'बियाँड साइट'च्या माध्यमातून अनेकांचे दृष्टिकोन बदलतील आणि दृष्टिहीनांसाठी अधिक समावेशक संधी निर्माण होतील, अशी आशा आहे," असे शेनाज पन्नू यांनी सांगितले.

सहभागी दृष्टीहीन मुलामुलींनी भावना व्यक्त करताना हा अद्भुत अनुभव असल्याचे सांगितले. यातून खूप गोष्टी शिकता आल्या. कार चालवल्याचे समाधान लाभले.

## अल्काराझचे ध्येय जेतेपदाच्या हॅट्ट्रिकचे

**लंडन :** हिरवळीच्या कोर्टवर खेळल्या जाणाऱ्या विम्बल्डन या अत्यंत प्रतिष्ठेच्या टेनिस स्पर्धेला उद्यापासून (ता. ३०) सुरुवात होत आहे. पुरुषांच्या एकेरी विभागात स्पेनचा कार्लोस अल्काराझ व महिला एकेरी विभागात बेलारूसची अरीना सबलेंका हिच्याकडे जेतेपदासाठी प्रबळ दावेदार म्हणून बघितले जात आहे. अल्काराझ सलग तिसऱ्यांदा या स्पर्धेच्या जेतेपदाला गवसणी घालण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करताना दिसणार आहे. कार्लोस अल्काराझ याने २०२४ व २०२५ मध्ये फ्रेंच ओपन ग्रँडस्लॅम जेतेपदावर मोहर उमटवली. त्याने २०२२ मध्ये अमेरिकन ग्रँडस्लॅम अजिंक्यपदाला गवसणी घातली. अल्काराझ याने मागील दोन मोसमात विम्बल्डन ग्रँडस्लॅमचे जेतेपद अगदी रुबाबात पटकावले आहे. यावर्षी त्याने इटलीच्या यानिक सिनरला पराभूत करून फ्रेंच ओपन या मानाच्या स्पर्धा विजेतेपदाची माळ आपल्या गळ्यात घातली होती. हाच फॉर्म तो कायम राखण्यासाठी जीवाचे रान करताना दिसणार आहे. सोमवारी होत असलेल्या सलामीच्या लढतीत त्याच्यासमोर इटलीच्या फॅबियो फोगनीनी याचे आव्हान असणार आहे. इटलीच्या यानिक सिनर याला विम्बल्डन या ग्रँडस्लॅमसाठी अव्वल मानांकन देण्यात आले आहे. सर्बियाचा महान टेनिसपटू नोवाक जोकोविच याला सहावे मानांकन देण्यात आले आहे. सिनरला सलामीच्या लढतीत लुका नॉर्डीचा सामना करावा लागणार आहे. जोकोविचला फ्रान्सच्या ॲलेक्झँड्रे म्युलर याच्याशी दोन हात करावे लागणार आहेत. सिनर व जोकोविच यांच्या लढतींचा निकाल अपेक्षेनुसार लागल्यास हे दोन्ही खेळाडू उपांत्य फेरीत एकमेकांसमोर उभे ठाकताना दिसतील.



## एनएससीबीएमएस, एसएनबीपी (रहाटणी) संघांना १७ वर्षांखालील फुटबॉल जेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** एसएनबीपी आंतरशालेय जिल्हास्तरीय क्रीडा अजिंक्यपद २०२५-२६ स्पर्धेमध्ये नेताजी सुभाष चंद्र बोस मिलिटरी स्कूल (पुलगाव) आणि एसएनबीपी इंटरनॅशनल स्कूल (रहाटणी) संघांनी १७ वर्षांखालील मुलांच्या फुटबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावले.

रविवारी एसएनबीपी इंटरनॅशनल स्कूलच्या (चिखली) आर्टिफिशियल टर्फवर सुरू असलेल्या स्पर्धेच्या १७ वर्षांखालील गटाच्या अंतिम सामन्यात रविवारी एनएससीबीएमएसने एसएनबीपी इंटरनॅशनल स्कूल, चिखली संघावर २-० असा विजय मिळवला. जॉय चिंग याने (आठवे आणि २८ वे मिनिट) दोन्ही गोल करून त्यात मोलाचा वाटा उचलला.

एनएससीबीएमएसचे या स्पर्धेतील फुटबॉल प्रकारातील हे तिसरे विजेतेपद आहे. यापूर्वी, त्यांनी १२ वर्षांखालील आणि १४ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद बाजी मारली आहे.

मुली गटाच्या अंतिम सामन्यात, एसएनबीपी इंटरनॅशनल स्कूल, रहाटणीने अकॅडमी स्कूलचा दोन गोलने (२-०) पराभव केला. अस्मी गोळे (१२ व्या मिनिटाला) आणि अनन्या यादवने (१२ व्या मिनिटाला) प्रत्येकी एक गोल करताना विजय सुकर केला.

मुलींच्या गटात एकूण १८ संघांनी भाग घेतला. या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुली हा मुलींचा एकमेव वयोगट होता.

## तन्वी, आयुष अंतिम फेरीत; ओपन बॅडमिंटन स्पर्धेमध्ये चमक



**नवी दिल्ली :** तन्वी शर्मा आणि आयुष शेट्टी या भारतीय बॅडमिंटनपटूंनी अमेरिकन ओपन बॅडमिंटन स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. तन्वी व आयुष या दोन्ही खेळाडूंनी अंतिम फेरीत धडक मारत जेतेपद पटकावण्याच्या दिशेने पाऊल टाकले.

१६ वर्षीय तन्वी शर्मा हिने महिला एकेरीमधील उपांत्य फेरीच्या लढतीत युक्रेनच्या सातव्या मानांकित पोलिना बुहरोवा हिच्यावर सरळ दोन गेममध्ये विजय साकारला. तन्वी हिने पोलिनावर २१-१४, २१-१६ असा सहज विजय नोंदवला. आता तन्वीसमोर अमेरिकेच्या बेईवेन झँगचे आव्हान असेल. आयुष याने उपांत्य फेरीच्या लढतीत अव्वल मानांकित चोऊ टिएन चेन याचे कडवे आव्हान परतवून लावले. आयुष याने चीन तैपईच्या खेळाडूचा कडवा संघर्ष तीन गेममध्ये परतवून लावला. आयुषने पहिला गेम २३-२१ असा गमावला. त्यानंतर मात्र त्याने पुढील दोन गेममध्ये २१-१५, २१-१४ असा विजय साकारला आगेकूच केली.

## अमानोरा स्कूलच्या विद्यार्थ्याला नॅशनल स्केटिंग स्पर्धेत रौप्यपदक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** विद्यार्थ्यांना मानसिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम बनवण्याबरोबरच जीवनमूल्यांचे शिक्षण देणाऱ्या अमानोरा स्कूलच्या विद्यार्थ्याने एक अनोखी कामगिरी बजावली आहे. अत्यंत कमी वयातच रौप्यपदक पटकावून त्याने शाळेचे नाव उज्वल केले आहे.

महाराष्ट्रातील पुणे शहरातील अमानोरा स्कूलमध्ये सातवीत शिकणाऱ्या मास्टर देवांश काळे याने नुकतेच कोलकाता येथे १९ ते २३ जून दरम्यान पार पडलेल्या ९व्या ओपन नॅशनल स्पीड स्केटिंग स्पर्धेत रौप्यपदक मिळवले आहे. रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित या स्पर्धेत देशभरातील विविध शाळांमधील शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत देवांशने उल्लेखनीय प्रदर्शन करत दुसरा क्रमांक मिळवत रौप्यपदक पटकावले.

त्याच्या या यशाबद्दल अमानोरा स्कूलतर्फे त्याचा सत्कार करण्यात आला असून, संपूर्ण शाळेने त्याचे अभिनंदन केले आहे.

## यु इन स्पोर्ट्स' बुद्धिबळ स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंचा बाज

# अथर्व मडकर ७.५ गुणांसह विजेता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघ, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना आणि पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या मान्यतेने सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयात 'यु इन स्पोर्ट्स' आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ मानांकन स्पर्धा पार पडली. ही स्पर्धा गेल्या सहा दिवसांपासून सुरु होती. अंतिम फेरी रविवारी खेळवण्यात आली आणि पारितोषिक वितरण समारंभही मोठ्या उत्साहात पार पडला.

या स्पर्धेत महाराष्ट्राच्या अथर्व मडकर याने ७.५ गुण मिळवत बाजी मारली आणि प्रथम क्रमांक पटकावला. त्याला रोख ७०,००० रुपये व चषक देण्यात आला. दुसऱ्या क्रमांकावर श्रीराज भोसले (७ गुण) तर तिसऱ्या क्रमांकावर शाश्वत गुप्ता (७ गुण) हे दोघेही महाराष्ट्राचेच खेळाडू ठरले.

**पारितोषिक वितरण सोहळा भव्य थाटात :** समारंभात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे खजिनदार मोहनराव देशमुख यांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली. अध्यक्षस्थानी मंडळाचे मानद सचिव संदीप कदम होते. यावेळी महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटनेचे सहसचिव राजेंद्र कोंडे, पीडीसीसीचे उपाध्यक्ष प्रकाश कुंटे, आंतरराष्ट्रीय पंच राजेंद्र शिदोरे, तसेच यु इन स्पोर्ट्सचे समन्वयक योगेश रवंदळे, मृणाल पाठक मॅडम व समन्वयिका डॉ. विद्या पाठारे उपस्थित होत्या. प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संगीता जगताप यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. विद्या पाठारे यांनी केले.